म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : १८१६८

IRBK-0118148

IRBK-0118148


रमेश मंत्री
पंवैरी

नाटक
१८९४८
६१९२१७९
वाचनालय

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 JAN 1980
FEB 1980
3 FEB 1980
6 FEB 1980
20/2
FEB 1980
MAR 1980
14 MAR 1980
1980

23 1983

(क्रु. मा. प.)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र ९८९४८ ... दि ६।१२।७९
वि. ... नाटक ...

# चंदेरी

रमेश मंत्री

IRBK-0118148
IRBK-0118148

अनमोल
अनमोल प्रकाशन, पुणे २

प्रकाशक :

मो. द. नांदुरकर,
अनमोल प्रकाशन,
६८३ बुधवार पेठ,
पुणे ४११००२.

प्रथमावृत्ती : ‘ विजयादशमी ’
११ ऑक्टोबर १९७८

परीक्षण मंडळ प्रमाणपत्र क्रमांक :
डी. आर्. एम्. ४९१/७८/२७५८,
दि. १८.७.७८

© सौ. रजनी मंत्री

या नाटकाच्या व्यावसायिक प्रयोगाचे सर्व हक्क ३० जुलै १९७८ पासून तीन वर्षांपर्यंत श्री. प्रभाकर राणे, नाट्यप्रभा, मुंबई ६० यांच्याकडे आहेत.

मूल्य सहा रुपये

मुद्रक :

चिं. स. लाटकर,
कल्पना मुद्रणालय,
४६१/४ सदाशिव पेठ,
पुणे ३०.

माझे स्नेही
प्रतिभावंत दिग्दर्शक
पुरुषोत्तम दारव्हेकर
यांना

'चंदेरी' या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग नाट्यप्रभा, मुंबई या संस्थेने नवीनभाई ठक्कर हॉल, विलेपार्ले, मुंबई येथे रविवार, ता. ६ ऑगस्ट १९७८ रोजी दुपारी ३॥ वाजता सादर केला.

| | | |
|---|---|---|
| लेखक | : | रमेश मंत्री |
| दिग्दर्शक | : | पुरुषोत्तम दारव्हेकर |
| नेपथ्य | : | दत्ता चौंडणकर |
| पार्श्वसंगीत | : | प्रभाकर साठे |
| प्रकाश-योजना | : | प्रफुल्ल संघाणी |
| सूत्रधार | : | विश्वास गाडे |
| निर्माता | : | प्रभाकर राणे |
| निर्मिति-प्रमुख | : | राम सावंत |

## पात्र परिचय

| | | |
|---|---|---|
| चंदेरी | : | नयनतारा |
| नील सामंत | : | मुकुंद गोखले |
| नानासाहेब | : | विश्वास गाडे |
| आक्कासाहेब | : | सरोज कोठीवान |
| यमुना | : | आरती कलवाग |
| चिकटे वकील | : | गणेश सोळंकी |
| गुरुनाथ | : | नाना शिंदे |
| बापूसाहेब | : | मोहन कोठीवान |
| तिलोत्तमा | : | लता अरुण |

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ बकुल येथील जहागीरदार बापूसाहेब पुरंदरे यांच्या बंगल्यातील पहिल्या मजल्यावरील दिवाणखाना. उंची फर्निचर. माजी जहागिरीचे अवशेष म्हणून तलवार, जुने शिल्प ठेवलेले. पडदा उघडतो, तेव्हा तिलोत्तमाबाई बसंत राग गात असल्याचं ऐकू येतं. त्या गाण्याच्या अखेरीस आल्या आहेत. पण रंगमंचावर नाहीत. गाणं संपता संपताच लांब चाललेल्या जत्रेतील कर्कश सूर मोठ्याने ऐकू येतात. तिलोत्तमाबाई गाणं थांबवतात.

नानासाहेब, वय ५८–६०, हातातले कागदपत्र चष्म्यातून पाहात प्रवेश करतात. त्यांच्या मागून यमुना, वय १८, कारवारी धाटणीची-प्रवेश करते. ती कारवारी हेल काढून बोलते. ]

**यमुना :** साहेब, आज शेवटचा दीस असा जत्रेचा. जरा कृपा करा, की—

**नानासाहेब :** नाही, म्हणजे नाही. बस्स ! पुन्हा विचारू नकोस. माय वर्ड इज ॲरो ऑफ रामा !

**यमुना :** म्हंजे हो ?

**नानासाहेब :** अग, म्हणजे माझा शब्द रामबाण आहे. चर्चिल काय म्हणाला, माहीत आहे ? ‘ ब्रिटिश साम्राज्याचं विसर्जन करायला मी पंतप्रधान झालो नाही. ’

**यमुना :** अग्गो, बया, तुमका म्हणालो ?

**नानासाहेब :** हो, तर ! मी बापूसाहेबांच्या वडलांच्या बरोबर इंग्लंडला गेलो होतो ना, तेव्हा चक्क मला बोलावून सांगितलंन् त्या शिंच्यानी. आणि पुन्हा सगळं इंग्रजीतून बोलला हां. काळेज् ट्रान्सलेशन न वाचता. म्हणाला, ' मी ब्रिटिश साम्राज्याचं— '

**यमुना :** पण, साहेब, मला ब्रिटिश साम्राज्य नको पाहिजे आहे. मला फक्त—

**नानासाहेब :** तेच तेच. अग, तुझ्यासारख्या नोकर-माणसांना जत्रेत मोकाट सोडण्यासाठी मी बापूसाहेबांचा कारभारी झालो नाही ! समजलीस ?

**यमुना :** पण चंदेरी गेलीय ना, साहेब. तिनं बाईसाहेबांची परवानगी काढलीय.

**नानासाहेब :** हां, चंदेरीचं मला सांगू नकोस. ती बाईसाहेबांच्या माहेरची. म्हणजे व्ही. आय्. पी. तिचं उदाहरण तुला लागू पडणार नाही.

**यमुना :** ( त्यांना खूश करण्यासाठी ) साहेब, तुम्ही इंग्लंडला गेला होता ना—

**नानासाहेब :** म्हणजे शंका आहे, की काय ? अजून बोटीचं तिकीट जपून टेवलं आहे. पी आणि ओ. अग, बोटीनं मुंबई बंदर सोडल्याबरोबर प्रत्येक पॅसेंजर ( मद्य पिण्याचा आविर्भाव करीत ) ' पी ' ॲन्ड दोन तासांनंतर—

[ आतून तिलोत्तमाबाईचा आवाज : नानासाहेब... ]

**नानासाहेब :** ( मोठ्याने ) ओ.

**यमुना :** ( ते जात असताना त्यांना अडवून ) साहेब, थोडा वेळ जाते ना. तुम्ही ते चर्चिलचं काय सांगत होता...?

**नानासाहेब :** अग, मी बापूसाहेबांच्या वडलांच्याबरोबर गेलो, तेव्हाच भारताचं स्वातंत्र्य चर्चिलच्या नाकावर टिच्चून घेऊन येणार होतो. पण गेल्याच्या दुसऱ्याच दिवशी आबासाहेब थंडीनं आजारी पडले ना ! म्हणून गेल्यापासून बत्तीस तासांत इंग्लंडहून परत यावं लागलं. पण येताना चर्चिलला ठणकावून सांगितलं,' इफ् माय हेड इज सेफ, आय विल गेट फिफ्टी हॅट्स् ! '

**यमुना :** म्हंजे ?

**नानासाहेब :** अग, शिर सलामत, तो पगडी पचास !

[ आतून तिलोत्तमाबाई : नानासाहेब, चंदा आली का ? ]

**नानासाहेब :** नाही, बाईसाहेब, पण येईल एवढ्यात. (यमुनेला) अग, चर्चिलचं एक सांगतो तुला भारी हुशार, हां.

**यमुना :** ( त्याला खूश करण्यासाठी ) म्हंजे ? तुमच्याइतको ?

**नानासाहेब :** जवळजवळ. अगदी माझ्याएवढा नाही. अग, लढाईत त्यानं भारतात रेशनिंग का सुरू केलं, माहीत आहे?

**यमुना :** नाही, बाई. का?

**नानासाहेब :** अग, या देशातला प्रत्येक माणूस कुठं राहतो नि किती खातो, याची बित्तंबातमी तो गुलाम राजाच्या टेबलावर ठेवायचा ना? म्हणजे असं बघ, सकाळी ब्रेकफास्ट घेताना सहावा जॉर्ज विचारत असे, 'विली'—म्हणजे विन्स्टन चर्चिल, हां—'अरे, मुंबईच्या गिरगावातल्या गोरेगावकर बिल्डिंग-मधल्या २१ नंबरच्या खोलीतला विष्णू रंगो भिडे किती धान्य खातो?' आपला विली चटकन् सांगायचा, 'नऊ औंस.' असं ज्ञान पाहिजे.

**यमुना :** मग मी जाऊ तर जत्रेला?

**नानासाहेब :** छे, छे! ब्रिटिश साम्राज्याचं विसर्जन—अग, आक्कासाहेब आल्या. पळ. काम कर काही तरी!

[ यमुना दचकून लगबगीनं आत जाते. नानासाहेब हातातले कागदपत्र चाळतात. आक्कासाहेब, वय ५२, भारदस्त, विधवा, बापूसाहेबांच्या मोठ्या भगिनी येतात. ]

**आक्कासाहेब :** काय, नानासाहेब, कारखान्याचं काम कुठवर आलं आहे?

**नानासाहेब :** ( लवून नमस्कार करीत ) आपल्या आशीर्वादानं चांगलं चाललं आहे, आक्कासाहेब. जागेचा सर्व्हे इंजीनियरांच्याकडून चालला आहे. आठ दिवसांत तो पूर्ण होईल. मी तिकडेच निघालो होतो. आपली काही आज्ञा—

**आक्कासाहेब :** अं...काही नाही. पण ( हातातला कागद देत ) डॉक्टरांनी हे औषध आणायला सांगितलं आहे, साईटवरून येताना—

**नानासाहेब :** ( कागद घेत ) हो. आणतोच. ( हातातले दोन लखोटे देत ) बापूसाहेब आल्यावर त्यांना एवढं द्या. मी निघालोच.

[ जातात. जत्रेतील वाद्यांचा आवाज. आक्कासाहेब खिडकीजवळ जाऊन कुतूहलानं पाहतात बाहेरून प्रकाशही कमी-अधिक होताना दिसतो तिलोत्तमा येते. वय ३५, सुंदर, शालीन. आक्कासाहेबांच्या मागे उभी राहून दूरवरची जत्रा पाहते. ]

**तिलोत्तमा :** अजून आली नाही का चंदा?

**आक्कासाहेब :** नाही. तुला काळजी वाटते का तिची?

**तिलोत्तमा :** हो, तर. मी म्हटलं, हौशी पोर आहे, पाच–दहा मिनिटं गेली, तर चालेल. पण ( हातातल्या घड्याळाकडे पाहात ) आता पाहा, पाऊण तास झाला; कुठून तिला जायला सांगितलं, असं वाटायला लागलंय मला आणि ह्यांना मी विचारलंही नाही. हे आल्यावर त्यांना कळलं, तर उगीच—

**आक्कासाहेब :** अग, मी सांगेन–हे बघ, बापूसाहेब गाडीतून उतरताहेत, येतीलच एवढ्यात.

**तिलोत्तमा :** मी पाहून येते त्या पोरटीला.

**आक्कासाहेब :** पण यमूला पाठव ना !

**तिलोत्तमा :** यमीला ऐकणार आहे का ती खट्याळ पोर ? दोघीही तोंडं उघडी टाकून जत्रा पाहात बसतील नि ह्यांची बोलणी खावी लागतील मला. आलेच मी आता.

[ घाईघाईनं बाहेर जायला निघते, एवढ्यात बापूसाहेब, वय ४५, रुबाबदार व्यक्तिमत्त्व. हातात ॲटॅची बॅग घेऊन येतात. तिलोत्तमा थबकते. ]

**बापूसाहेब :** अग, बँकेच्या जनरल मॅनेजरला आत्ताच भेटून आलो. आपल्या साखर कारखान्याला चांगली गती मिळाली आहे. मॅनेजर म्हणाले, ‘ पाच कोटींचं शेअर भांडवल जमलं, तर बँक वीस कोटींची व्यवस्था सहज करू शकेल. ’ बरं का, तिलोत्तमा, तुला गंमत सांगायची म्हणजे—

**तिलोत्तमा :** मी आता येते जरा बाहेर जाऊन.

**बापूसाहेब :** आत्ता ? या वेळी तू बाहेर कुठं—( जत्रेतील आवाज फारच मोठ्यानं ऐकू येतो. खिडकीचं दार बंद करीत ) काय शिंचा त्रास आहे हा ! एक शब्द बोललेला ऐकू येईल, तर शपथ. दर वर्षी नवरात्र–दसरा आला, की ही कटकट असतेच. जत्रा म्हणे, जत्रा ! नॉन्सेन्स ! तर तुला काय सांगत होतो, की पाच कोटी शेअर भांडवल ( तिलोत्तमाबाई बाहेर जाण्यासाठी अस्वस्थ होतात) अग,.. ...पण कुठं चाललीस तू रात्रीच्या वेळी ?

**तिलोत्तमा :** जत्रेला.

**बापूसाहेब :** जत्रा बघायला ? काय वेडबीड लागलंय, की काय तुला ? पुरंदरच्या जहागीरदारीण, बिगरीतल्या मुलीसारख्या जत्रा बघायला निघाल्या आहेत !

**आक्कासाहेब :** बापू , अरे, चंदेरी गेलीय तिकडे, तिला परत आणायला चाललीय ती. मीच म्हटलं, तुझ्याशिवाय येणार नाही ती पोरटी. जाऊ दे तिला.

**बापूसाहेब :** ( आक्कासाहेबांना ) आता तूच परवानगी दिल्यावर – बरं, ( तिलोत्तमेला ) जा, पण लवकर ये तिला घेऊन.

**तिलोत्तमा :** (आनंदानं) लगेच येते. ( घाईघाईनं जाते. )

**बापूसाहेब :** (उसन्या उत्साहानं ) तर, आक्कासाहेब, जनरल मॅनेजर खूश आहे हं आपल्या योजनेवर. त्यानं मला अगदी...

**आक्कासाहेब :** ( लखोटे त्यांच्या हाती देत ) तुझी नि नानासाहेबांची चुकामूक झाली असेल. त्यांनी हे दिले आहेत. ते तुला भेटायला साईटवर गेले आहेत.

**बापूसाहेब :** ( खुर्चीवर अंग टाकून लखोटे उघडीत ) दमलो, बुवा, आपण. या कारखान्याचं काम होईपर्यंत – ( लखोटा वाचीत ) अरे, वाः ! बरं का, आक्का, आणखी साठ एकर जमीन आपल्याला उसासाठी मिळणार आहे आणि त्याबरोबरच साठ हजार रुपयांचं भाग भांडवलही !

**आक्कासाहेब :** ( त्यांच्या जवळ जाऊन ) बापू , तू आता खूप दमला आहेस. आत जाऊन कपडे बदल. मी तुझ्या खोलीत छान, गरम जेवण पाठवते. तुझ्या आवडीची भाजी करायला सांगितलीय मी आज – मसाला वांग्याची.

**बापूसाहेब :** ( उत्तेजित होऊन ) वाः ! आक्का, असं काम करून दमून आलं ना, की तुझा हा प्रेमळ आग्रह सारा शीण घालवून टाकतो बघ. ( आत जाता जाता ) पंधरा मिनिटांत पाठव जेवण वर – माझ्या खोलीतच. ( जातात. )

[ जत्रेतल्या वाद्यांचा आवाज. अंधार पडतो. पुन्हा उजेड येतो. दरम्यान साधारण पाऊण तासाचा वेळ गेला आहे. वाद्यांचा आवाज कमी होतो. आक्कासाहेब कुतूहलाने खिडकी उघडून पाहतात. इतक्यात तिलोत्तमा येते. तिचा चेहरा विलक्षण प्रसन्न, आनंदी आहे. ]

**तिलोत्तमा :** आक्कासाहेब, काय छान आहे, हो, ती जत्रा आणि पाळणा ! गावात प्रथमच आला आहे पाळणा. सारीजणं किती आनंदात होती. आमचा हा दर्जा. आमची प्रतिष्ठा आड येते ना ! नाही तर, आक्कासाहेब, मलासुद्धा वाटलं. आपण सारं मोठेपण विसरून जावं आणि लहान होऊन त्या पाळण्यात बसून सुसाट वेगानं झोके घ्यावेत ! ( टाळी वाजवून ) ओह ! हाऊ वंडरफुल !

**आक्कासाहेब :** ए वंडरफुल, अग, तू गेली होतीस, त्या कामाचं काय झालं ?

**तिलोत्तमा :** ( आपल्याच नादात ) बाहेर हवा तर काय मस्त, मोकळी आहे. जग आनंदी आहे, उत्साह कसा काठोकाठ भरून वाहतो आहे..!

**आक्कासाहेब :** ( कौतुकानं ) त्या जत्रेनं तुलासुद्धा भारून टाकलं हं, तिलोत्तमा. अग, पण चंदेरीला आणलंस का परत ?

**तिलोत्तमा :** ( भानावर येऊन ) अय्या ! खरंच की, आक्कासाहेब, चंदेरी येतेय थोड्या वेळात.

**आक्कासाहेब :** अग, पण रात्र झाली, अजून लहान आहे ती. तुझ्याबरोबर नाही का आणलंस तिला ?

**तिलोत्तमा :** खरं सांगू का, आक्कासाहेब ? मी तिला इतक्या आनंदात, इतक्या बेहोशीत पाहिली, की तिला त्या स्वर्गातून ओढून या रुक्ष जीवनात आणणं अगदी जिवावर आलं माझ्या.

**आक्कासाहेब :** अग, मुलांच्या हूडपणाला आपण मोठ्या माणसांनी धरबंध घालायचा, तर तूच त्या जत्रेत वाहून गेलीस म्हणायची ?

**तिलोत्तमा :** कधी कधी वाटतं, असं वाहून जाण्यातच आयुष्याचं सार्थक असतं.

**आक्कासाहेब :** पण एकटी पोर येईल का रात्रीच्या वेळी ?

**तिलोत्तमा :** एकटी नाही ती.

**आक्कासाहेब :** म्हणजे ? घरातून तर एकटी गेली होती.

**तिलोत्तमा :** तिथं कुणा तरी तरुणाबरोबर ओळख झाली असावी तिची. तोही तिच्याबरोबर पाळण्यात बसला होता.

**आक्कासाहेब :** कमाल आहे एवढ्याशा पोरटीची !...नि तू तिला असं परक्या तरुणाबरोबर खुशाल सोडून आलीस ? या गडीमाणसांना एवढीशी सवलत दिली—

**तिलोत्तमा :** आपल्याला माहीतच आहे, आक्कासाहेब. चंदेरी आपल्याकडे काम करते. पण तशी ती गडीमाणूस नाही. माझ्या गरीब मैत्रिणीची मुलगी आहे ती.

**आक्कासाहेब :** म्हणून तर फक्त तिलाच जत्रेला जायला परवानगी मिळाली. अग, पण तो तरुण कोण, कुठला, त्याची नि हिची ओळख किती नि कुठवर आहे, याची चौकशी तरी केलीस का तू ? बापूला हे कळलं, तर धारेवर धरील हं तुला—नि मलासुद्धा.

**तिलोत्तमा :** तसं काळजी करण्यासारखं काही नाही, हो. तिथं हजारो माणसांच्या समोर दोघंजण पाळण्यात बसली, तर काय झालं ? त्याची नि तिची ओळख कशी झाली, ते माहीत नाही मला. पण तो काही आजूबाजूचा, खेडवळ भागातला दिसत नाही. चांगला अपटुडेट पोशाख केलेला, पुण्या-मुंबईचा

दिसतोय.

**आक्कासाहेब :** हो, का ? मग निकाल लागला पोरीचा ! अग, या अपटुडेट पोशाखातल्या पुरुषांच्यासारखा धोकादायक प्राणी दुसरा कोणी नसेल.

**तिलोत्तमा :** असं अगदीच सरधोपट बोलून कसं चालेल, आक्कासाहेब ? खरं म्हणाल, तर त्या धाडसी तरुणानंच माझा प्राण वाचवला आज.

**आक्कासाहेब :** असं ? तो कसा काय ?

**तिलोत्तमा :** मी चंदेरीला 'लगेच परत ये', असं बजावीत होते, एवढ्यात उधळलेला एक बैल एकदम माझ्या मागे धावत आला. मी त्याला पाहिलंच नाही. पण चंदाच्या बरोबरच्या तरुणानं मात्र त्या पाळण्यातून ताडकन् उडी टाकली आणि मला जोरानं धरून बाजूला केलं. ( आठवणीनं अंग शहारून ) अग, बाई ! त्यानं मला बाजूला ओढलं नसतं, तर काय झालं असतं, त्याची कल्पनाच करता येत नाही.

**आक्कासाहेब :** बरं झालं, बाई. पण म्हणून मी म्हणत होते, तू जाऊ नकोस.

**तिलोत्तमा :** मी त्याचे आभार मानले. तो म्हणाला, 'बाईसाहेब, चंदेरीनं मला आपल्याबद्दल खूप सांगितलं आहे. तुम्हांला तर ती देवताच मानते. तिला उशीर झाला, त्याबद्दल मात्र तिला दोष देऊ नका हं. मीच तिला आणखी एकदा पाळण्यात बसायचा आग्रह केला.' त्याच्या त्या मर्यादशील बोलण्यावर त्याला कठोर ताडन करावं, असं मला वाटेच ना, आक्कासाहेब...आणि त्यानं नुकतंच मला मृत्यूसमोरून ओढून घेतल्यानंतर तर मी अधिकच शरमिंधी झाले होते. मला तरी तो अगदी मर्यादशील, सज्जन दिसला.

**आक्कासाहेब :** ( उत्साहानं ) आणि त्यानं चंदाला 'स्वतः आणून पोचवतो', म्हणून सांगितलं असेल.

**तिलोत्तमा :** हो. आपल्याला कसं समजलं ?

**आक्कासाहेब :** अग, तुला बाहेरच्या जगाची कल्पना नाही. याच मार्गानं पुरुष मुलींच्यावर छाप पाडतात.

**तिलोत्तमा :** पण त्याची नि चंदाची भेट व्हायचा प्रसंगच पुन्हा कुठं येणार आहे ? आज जत्रेचा शेवटचा दिवस. उद्यापासून तिला...

[ चंदेरी, वय १९, छानसा, ठेवणीतला पोशाख केलेली, भाबडी, उत्साही मुलगी धावत येते. ]

**चंदेरी :** ( तिलोत्तमेस ) बाईसाहेब, बाईसाहेब, काय मस्त आहे, हो, तो

पाळणा ! तुम्ही इतक्या जवळ आला होता...एकदा बसून पाहायचं होतं पाळण्यात आणि किनई, तो पाळणा बघा, उंच उंच जातो. पुन्हा वेगानं खाली येतो अगदी सुसाट. तो बेफाट वारा, ती छातीतली धडधड आणि ते हसू अजून...

**आक्कासाहेब :** चंदा, तुला इतका वेळ का लागला, ते बाईंना सांग, आणि मग कौतुक कर त्या पाळण्याचं आणि पुन्हा तसल्या पुरुषांच्या बरोबर...

**तिलोत्तमा :** मी पाहते, आक्कासाहेब. हिला नीट समजावून द्यायला पाहिजेत या गोष्टी. प्रथमच एकटी बाहेर पडली ना ती ?

**आक्कासाहेब :** ( नाइलाजानं ) ठीक. पण आपल्या घरचे रिवाज कळायला हवेत तिला. मी वर दिवाणखान्यात बापूला सांगते, ती आलीय म्हणून. ( जातात. )

**तिलोत्तमा :** ( चंदेरीची निर्भर्त्सना करीत ) पाहिलंस ? तुझ्यामुळं मला ही बोलणी खावी लागतात. आता मला सगळं काही खरं खरं सांग.

**चंदेरी :** पण, बाई, खोटं सांगण्यासारखं अजून काही झालंच नाही !

**तिलोत्तमा :** जास्त बडबड करू नकोस. मी विचारलेल्या प्रश्नांची नीट उत्तरं दे. तो तरुण कोण होता ?

**चंदेरी :** त्याचं नाव नील सामंत. मुंबईचा आहे तो.

**तिलोत्तमा :** काय करतो तो ?

**चंदेरी :** मला काय माहीत ? मी विचारलंच नाही त्याला.

**तिलोत्तमा :** तुझी नि त्याची ओळख कशी झाली ?

**चंदेरी :** तुम्ही मला पाळण्यात बसायला एक रुपाया दिला होता ना, तो घेऊन मी रांगेत उभी राहिले. माझ्या पुढंच त्याचा नंबर होता. आता, बाईसाहेब, पाळण्यात दोघां दोघांचं बाक होतं ना, तर माझ्याच बाकावर त्याचा नंबर आला. ( एकदम मधेच ) का हो, बाईसाहेब ? तुम्हांला नाही का आवडला तो उमदा तरुण ? किती छान होता, हो !

**तिलोत्तमा :** हे बघ, ही तुझी चौकशी चालू आहे, माझी नाही. माझ्या बाबतीत कुठलाही पुरुष आवडण्याचा प्रश्नच येत नाही. बरं, त्या अनोळखी माणसाच्या पैशावर तू पाळण्यात आणखी एकदा बसलीस ना ?

**चंदेरी :** छेः, बाई !

**तिलोत्तमा :** खोटं बोलू नको. त्यानं स्वतःच मला सांगितलं.

**चंदेरी :** तसं नाही, बाई मी दुसऱ्यांदा पाळण्यात बसले, ते कबूल आहे ना मला. पण दुसऱ्यांदा बसले, तेव्हा तो अनोळखी पुरुष नव्हता, बाई. पहिल्या प्रवासात ओळख झाली की आमची.

**तिलोत्तमा :** अस्सं ! तेवढी ओळख तुला पुरे झाली वाटतं ? आणि काय, ग, त्यानं तुला जवळ घ्यायचा, शारीरिक लगट करायचा प्रयत्न केला, की नाही ? खरं सांग.

**चंदेरी :** नाही, बाई. मीच त्याला मिठी मारली.

**तिलोत्तमा :** ( आश्चर्यानं ) तू...तू त्या परपुरुषाला मिठी मारलीस ? आपण होऊन ?

**चंदेरी :** मघाशी म्हटलं ना, बाई, तो ओळखीचा होता. परपुरुष नव्हता ना. आणि बघा, पाळणा अगदी उंच गेल्यावर मी भीतीनं मिठी मारली त्याला.

**तिलोत्तमा :** अस्सं. त्या पाळण्यानं चांगली सोय केली तुझी !

**चंदेरी :** तसं नाही, बाई, भीती वाटली नसती, तरी मिठी मारली असती मी. किती सुंदर, उमदा, तरणाबांड होता तो ! आणि दिलदार. तुम्हांला कसा वाटला तो ? सांगा ना, बाईसाहेब...

**तिलोत्तमा :** ( अडखळत ) मला तो...तरुण, काव्यमय, सुंदर...पण मघाशी सांगितलं ना ? मला त्याच्याबद्दल काही वाटण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आणि काय, ग, त्यानं तुला नुसतं जवळ घेतलं...की...

**चंदेरी :** म्हणजे काय, बाई ?

**तिलोत्तमा :** म्हणजे असं, की त्यानं आपण होऊन काही...अं...

**चंदेरी :** माझा मुका घेतला का, असंच विचारायचं आहे ना ? मग विचारा ना.

**तिलोत्तमा :** तुला प्रश्न समजला आहे. आता तू उत्तर द्यायचं आहेस.

**चंदेरी :** हो. घेतला, की ! त्याच्या अंगाला अत्तराचा छान वास येत होता ( स्वप्नाळूपणे ) आणि, बाई, त्याचे हात इतके मऊ, त्याचा स्पर्श..

**तिलोत्तमा :** ( स्वतःला त्याने स्पर्श केल्याची आठवण होऊन, आपलाच हात एका हाताने कुरवाळीत ) हो, त्याचा स्पर्श– ( एकदम, कठोर शिस्तीने ) पण, चंदा, आपण इथं त्याचं कौतुक करायला जमलेलो नाही. तुझ्या प्रमादाची, गुन्ह्याची चौकशी करायची आहे मला.

**चंदेरी :** ( ओशाळलेपणाने ) होय, बाई. त्याला भेटायचा, त्याला जवळ घ्यायचा गुन्हा केला मी. असा गोड गुन्हा कोण करणार नाही ?

**तिलोत्तमा :** या घराण्याचे, प्रतिष्ठेचे रिवाज समजायला हवेत तुला, चंदेरी. हा तुझा पहिलाच गुन्हा आहे, म्हणून माफ करते मी आणि तोही योगायोगानं, चुकून घडला, म्हणून. पण यापुढं ...

**चंदेरी :** बाईसाहेब, एक मागणं मागू का ? पुन्हा कधी नाही काही मागणार.

**तिलोत्तमा :** ( त्रासिकपणानं ) आता काय हवंय तुला आणखी ?

चंदेरी : बाई, पुन्हा तोच गुन्हा करावासा वाटतो, हो. उद्या संध्याकाळी त्यानं बोलावलं आहे मला. परवा सकाळी तर तो मुंबईला परत जाणार. बाई, पहिला गुन्हा तुम्ही माफ केलाच आहे. ह्या दुसऱ्या गुन्ह्याबद्दल काय शिक्षा करायची, ती करा मग.

तिलोत्तमा : ( आवाज चढवून ) चंदा, तू अगदी निर्लज्ज बनत चाललीस !

चंदेरी : ( अजीजीने ) बाईसाहेब, माझ्या तरी नशिबात असा जंटलमन तरुण पुन्हा कुठून येणार ? एकदा...बाई, पुन्हा नाही विचारणार. एकदाच. सकाळी घरात काम करीन मी. दुपारी चारला बाहेर जाईन नि अंधार पडायच्या आत परत येईन. बाई –

तिलोत्तमा : हे बघ, उद्या दुपारला अजून खूप वेळ आहे. अग, पण हा कोण नील, की नीळकंठ ? त्याची आधी ओळख नाही, देख नाही आणि त्याला एकट्याला भेटायला तू जाणार...मला हे प्रशस्त वाटत नाही. तुझ्या भवितव्याची सगळी जबाबदारी माझ्यावर आहे, चंदा.

चंदेरी : म्हणूनच पदर पसरते, बाईसाहेब.

तिलोत्तमा : अग, पण इतकी अजीजी करून मला अडचणीत टाकण्यापेक्षा त्या तरुणाचा विचारच तू डोक्यातून काढून टाकणं सोपं नाही का ?

चंदेरी : मुळीच नाही, बाई ! ( छातीवर हात ठेवून ) तो या माझ्या मनात भरला. आता त्याला तिथून काढून टाकणं सोपं नाही, बाई. तो कायमचा पोटभाडेकरू झाला !

तिलोत्तमा : च् च्! अग, तुला कसं समजत नाही, चंदा ? तो आज इथं आहे, आडबाजूच्या आपल्या या गावात त्याचा वेळ जात नाही, म्हणून तो तुला भेटतो. पण एकदा तो मुंबईला जाऊन आपल्या कामात रमून गेला, की तुझ्यासारख्या खेडवळ मुलीची आठवण तरी ठेवील का तो ?

चंदेरी : तो तसा नाही हं, बाई. मला पारख आहे ना, माणसाची. तुम्ही जर त्याच्याबरोबर दोन तास घालवले असते ना, बाई, तर तुमचीसुद्धा खात्री पटली असती.

तिलोत्तमा : तू या घरात कोण आहेस, काय करतेस, हे खरं खरं सांगितलंस ना त्यास ?

चंदेरी : हो, बाई. ‘ मी कामाची मुलगी आहे,’ असं सरळ सांगितलं. तर तो म्हणाला, ‘ असेनास का. जगात कुठलंच काम हलकं नसतं; काहीच काम न करणं मात्र हलक्या दर्ज्याचं असतं. ’

तिलोत्तमा : तुझ्यापेक्षा सुंदर, आधुनिक अशा किती तरी मुली त्यानं मुंबईत

पाहिल्या असतील.

**चंदेरी :** हो ना, बाई. तरी तो म्हणाला, ‘ मला साध्यासुध्या मुलीच आवडतात.’

**तिलोत्तमा :** न म्हणायला काय झालं ? तुझं मन जिंकायचं, तर त्यानं असंच काही तरी बोलायला नको का ? तुझ्यापेक्षा मला मुंबईची मॉडर्न मुलगी आवडते, असं त्यानं म्हटलं असतं, तर तू त्याला भेटायला अशी उतावीळ झाली असतीस का ?

**चंदेरी :** पण, बाई, मला तो मुलगा खोटा नाही वाटत, हो. (आतून आक्कासाहेबांची हाक येते : चंदेरी ) ( मोठ्याने ) हो, आले, आक्कासाहेब. ( तिलोत्तमेला आर्जवानं ) मग, बाई, उद्या—

**तिलोत्तमा :** ( हसून ) सकाळी सांगेन, जा. अगदी हट्टी पोरगी आहेस बघ तू !

[ चंदेरी घाईघाईनं जाते. तिलोत्तमा खिडकी उघडून जत्रेतील प्रकाशाकडे पाहात राहते. जत्रेतील आवाज येतात. त्यात ती रमून जाते. आतून आक्कासाहेब येतात. तिच्यामागे उभं राहून जत्रा पाहात राहतात. ]

**तिलोत्तमा :** तुम्हीसुद्धा लहानपणी जत्रेला जात असाल, नाही ?

**आक्कासाहेब :** हो, तर. लहानपणी बापूलाही जत्रा, लाकडी घोडे, चित्रं खूप खूप आवडायची.

**तिलोत्तमा :** पण आता मात्र त्यांना जरासुद्धा हे सहन होत नाही.

**आक्कासाहेब :** वयोमानाप्रमाणं आवडीनिवडी बदलतात माणसाच्या.

**तिलोत्तमा :** पुढच्या वर्षी आपण जाऊ, हं, जत्रेला. आपल्या गावी नको. हवं, तर लांब कुठल्या तरी जत्रेला जाऊ.

[ जत्रेतील वाद्यांचा आवाज मोठ्यानं येऊ लागतो, तोच बापूसाहेब येतात. त्यांनी सूट काढून घरगुती पायजमा, झब्बा असे कपडे घातले आहेत. ]

**बापूसाहेब :** ( त्रासिकपणानं ) काय कर्कश आवाज करताहेत हे जंगली लोक !

[ आक्का आणि तिलोत्तमा दचकून बाहेर पाहायचं थांबवतात आणि खिडकीचं दार झाकून घेतात. बापूसाहेबांनी बुद्धिबळाचा पट आणला आहे. ]

**बापूसाहेब :** अशा धांगडधिंग्यात काय सुख मिळतं या अडाण्यांना, कुणाला माहीत !

**आक्कासाहेब :** अरे, बापू , प्रत्येकाच्या सुखाच्या कल्पना वेगळया असतात. तुझ्या बायकोच्या रागदारी गाण्याबद्दल खेडुतांना तेच वाटत नसेल का ?

**बापूसाहेब :** आक्का, ती चंदी का येऊन रडत होती माझ्याकडे ?

**आक्कासाहेब :** ते तुझ्या बायकोलाच विचार, बाबा. नोकर-माणसाचे किती लाड करायचे, ते तिनंच ठरवायची वेळ आली आहे आता. ( फणकाऱ्यात आत जातात. )

**तिलोत्तमा :** ( अपराधीपणानं ) हो, मीच बोलले तिला जरा टाकून. अहो, पाच-दहा मिनिटं जत्रेला जा म्हटलं, तर तासभर तिकडेच गुल. म्हणून रडत असेल ती.

**बापूसाहेब :** ( छोट्या टेबलावर बुद्धिबळाचा डाव मांडीत ) नाही, ग. त्यासाठी नाही. तिला उद्या बाहेर जायचंय. मी म्हटलं, ' जा. '

**तिलोत्तमा :** ( डाव मांडताना एकदम थबकून ) आपण दिलीत परवानगी ?

**बापूसाहेब :** ( सहजपणे ) हो. काय चूक आहे त्यात ? घरातलं काम झाल्यावर नोकरांनी सुट्टीत काय करावं नि काय करू नये, हा त्यांचा खाजगी प्रश्न आहे. आपण त्यात फार मन घालू नये.

**तिलोत्तमा :** ( अडखळत ) तसं नाही, पण मघाशी जत्रेत तिची नि एका तरुणाची ओळख झालीय. उद्या ती त्यालाच भेटायला जात नसेल कशा-वरून ? अहो—

**बापूसाहेब :** तू सुरुवात कर.

**तिलोत्तमा :** ( एक प्यादं पुढं सरकवीत ) ती आता वयात आलेली मुलगी आहे; पण अजून अल्लड आहे. कुठं फसली बिसली, तर...

**बापूसाहेब :** ( प्यादं पुढं करीत ) छॅः ! अग, नोकर—माणसांच्या खाजगी भानगडींशी आपला काहीही संबंध नाही. तिचं नशीब तिच्याबरोबर. ( तिलोत्तमा घोडा चालवते. ) आणि नाही तरी तू तिच्याकडे फारच लक्ष देतेस. अग, तुझ्या मैत्रिणीची मुलगी असली, तरी चंदेरी म्हणजे एक ( हातानं एक प्यादं उचलून ठेवीत ) प्यादं आहे

**तिलोत्तमा :** पण, साहेब, प्यादं आपल्या कर्तबगारीनं पुढं सरकत गेलं, की शेवटच्या घरात त्याची राणी होते, वजीर होतो.

**बापूसाहेब :** ( बुद्धिबळातील पुढील चाल करीत ) होते; पण ती फक्त खेळातच. म्हणूनच त्याला खेळ म्हणतात. प्रत्यक्ष जीवनात प्याद्यानं आपली जागा सोडली, तर ( उंटानं प्यादं मारून ) त्याला ( प्यादं बाजूला ठेवीत ) पटावरून बाजूला व्हावं लागतं.

[ तिलोत्तमा आपली चाल करीत असतानाच हळूहळू प्रकाश कमी होतो. अंधार. ]

## प्रवेश दुसरा

[ दोन आठवड्यांनंतर. यमुना हातात आठ-दहा पत्रे घेऊन त्यांच्या-वरचे पत्ते पाहात येते. ]

**यमुना :** ( पत्रांची वर्गवारी करीत ) साहेब, साहेब, नानासाहेब...( एका पत्रा-वरचा पत्ता अविश्वासाने पुनः पुन्हा वाचीत ) आँ ? चंदी ? कुमारी चंदेरी पालवनकर, सरदार पुरंदरे यांचा बंगला ( इकडे तिकडे पाहात पटकन् पत्र ब्लाऊजमध्ये घालते. ) बाईसाहेब....

**नानासाहेब :** ( प्रवेश करीत ) यमने, टपाल आणतेस ना ?

**यमुना :** ( पत्र त्यांच्या हाती देत ) हे काय, साहेब, तुमच्याकडेच निघाले होते.

**नानासाहेब :** ( त्या पत्रांतील एक पत्र घाईघाईनं उघडून वाचीत ) अरे, वाः ! बापूसाहेबांना ही आनंदाची बातमी सांगितलीच पाहिजे. ( यमुनेस ) हे बघ, खंडू ड्रायव्हरला म्हणावं, आपली जीप काढ. मी आलोच. साहेबांना ताबड-तोब द्यायला हवं हे पत्र.

[ यमुना खिडकीतून बाहेर पाहते नानासाहेब दुसरं पत्र वाचीत आहेत, तोच ती परत येते. ]

**यमुना :** जीप तयार आहे, साहेब. ते माझ्या मंगळूरच्या मावशीचं काम—

**नानासाहेब :** अग, हाउसवर्क बिकेम लेस् अँड रिलेटिव्हज् सेंट अ हॉर्स.....

**यमुना :** म्हणजे, हो ?

**नानासाहेब :** घरचं झालं थोडं नि व्याह्यानं धाडलंन् घोडं, असं झालंय बघा बरं, बरं. उद्या बघू तुझ्या मावशीचं काम. ( जातात. )

[ यमुना ब्लाऊजमधून पत्र काढून पुन्हा पत्ता वाचते. ]

**यमुना :** अग, बया ! ह्या चंदीला पत्रं की, ग, यया यायला लागली ! मेलीला एक अक्षर वाचायला येत नाही, आणि हिच्या नावानं ( पाकिटावरचा शिक्का पाहात ) मुंबईहून कागद ?

[ आतून चंदेरीचा आवाजः यमने, काम टाकून कुठं गेलीस, ग ? एग्गो यमने—]

**यमुना** : चंदे, जरा इकडं ये बघू. ये, ये. साहेब नि नानासाहेब—दोघंही गेलेत बाहेर.

[ हातात झाडू घेऊन, पदर खोचलेल्या अवस्थेत चंदेरी येते. ]

**चंदेरी** : ( त्रासिकपणे ) काय, ग, तुझं कामाच्या वेळेला ?

**यमुना** : ( पत्र पुन्हा ब्लाऊजमध्ये लपवीत ) चंदे, तुला कधी कुणाचा कागद आलाय का, ग ?

**चंदेरी** : मला ? नाही, बाई. हां. आता एक आहे बघ. वर्षातनं एकदा मामाचं पत्र येतं, बाईसाहेबांना. 'बायको बाळंतपणात आहे. चंदेरीला आठ दिवस पाठवून द्या.' म्हणून. तेवढं मात्र दर वर्षाला न चुकता येतं नि मामाच्या घरात महिनाभर काम करून माझी कंबर मोडून जाते बघ.

**यमुना** : ( ब्लाऊजमधून पत्र काढून ) हां. हा कागद तसा नाही, हं. ( लांबून दाखवीत ) हा कागद आहे गुलाबी. पत्ता आहे : कुमारी चंदेरी पालवनकर, सरदार...

**चंदेरी** : ( एकदम हातातला झाडू टाकून आनंदातिशयानं ) खरंच ? अग, बघू, बघू !

[ यमुना फर्निचरभोवती धावते. तिच्या मागोमाग चंदेरी धावते. यमुना एका खुर्चीवर उभी राहून पत्र उंच धरते. चंदेरी उड्या मारून ते हस्तगत करण्याचा निष्फळ प्रयत्न करते. ]

**यमुना** : कुणाचं पत्र आहे, ते सांग.

**चंदेरी** : अग, पत्र वाचल्याशिवाय कसं सांगणार ?

**यमुना** : ( हिणवीत हसून ) अग, पण, तुला वाचायला कुठं येतंय ? ( पत्र फोडण्याचा आविर्भाव करीत ) मी दाखवू का वाचून ?

**चंदेरी** : ( रागाने ) यमने ! माझं पत्र फोडशील, तर डोकंच फोडीन तुझं. मी घेईन बाईसाहेबांच्याकडून वाचून.

**यमुना** : ते तुझ्या त्या तरुण मित्राचंच आहे, की नाही ? सांग, सांग. कबूल कर.

**चंदेरी** : ( पुन्हा उडी मारीत ) यमने—

[ इतक्यात तिलोत्तमा येते. दोघींचंही तिच्याकडे लक्ष नाही. ]

**तिलोत्तमा :** ( रागानं ) यमने, चंदे ! काय चाललंय हे ? खुर्चीवर उभं राहायचं असतं का, ग ? काय, ग, गडबड आहे ?

[ यमुना चटकन् उतरते, हळूच चंदेरीच्या हाती पत्र देते. ]

**यमुना :** काही नाही, बाईसाहेब.

**चंदेरी :** खरंच काही नाही.

**तिलोत्तमा :** यमने, तू तुझ्या कामाला जा पाहू. पुन्हा खुर्चीवर उभी राहिलीस, तर याद राख. ( यमुना खाली मान घालून जाते; चंदेरीला ) तूसुद्धा जा, ग. दिवाणखाना ही काय खेळायची जागा आहे ? आणि मी आले, तेव्हा काय चाललं होतं दोघींचं ?

**चंदेरी :** मघाशी मी म्हटलं ना, काही नाही म्हणून....

**तिलोत्तमा :** हो, मग ?

**चंदेरी :** पण ते खरं नाही, बाईसाहेब. काही तरी आहे.

**तिलोत्तमा :** ( हसून ) चंदे, तू मोठी गोड पोरगी आहेस बघ. म्हणून तुझ्यावर रागावणं मला जमतच नाही. अग, काही तरी आहे, हे काय उत्तर झालं ?

**चंदेरी :** तसं नाही, बाईसाहेब, ( लाजत ) मला की नाही, पत्र आलं आहे.

**तिलोत्तमा :** ( आश्चर्यानं ) अग, तुझी मामी एवढ्यात पुन्हा बाळंत झाली का ? कमाल आहे ! हल्ली घड्याळंसुद्धा इतकी नियमित् चालत नाहीत !

**चंदेरी :** ( हसून ) नाही नाही, बाईसाहेब, हे मामाचं पत्र नाही, दुसरंच आहे. ( हळूच ब्लाऊजमधून पत्र काढते. ) आणि मला तर वाचता येत नाही.

**तिलोत्तमा :** अग, तुला मुळाक्षरं गिरवायला दिली होती, अंकलिपी आणून दिली होती अजून शिकली नाहीस का ?

**चंदेरी :** म्हणजे, बाई, छापलेलं अक्षर लागतं ना एक एक. क म ळ, ग ण प त, स म ई. बाई, परवाच्या दिवशी मी झब्ल्यापर्यंतसुद्धा आले.

**तिलोत्तमा :** ( कपाळाला हात लावीत ) अग, अठरावं संपून एकोणिसावं वर्ष लागलं तुला नि अजून तू झबल्यापर्यंत आले, म्हणून फुशारकी सांगतेस ? झबली शिवायला घ्यायचं वय झालं तुझं, चंदे ! ( प्रेमळ रागानं ) चल. काही सांगू नकोस मला. पत्र आलं असलं, तर यमनीकडून नाही तर खंडूकडून वाचून घे.

**चंदेरी :** ( लोचटपणे ) नाही, बाई. यमनीनं वाचण्यासारखं पत्र नाहीय हे. ते 'त्यांचं' आहे. ( पत्र छातीशी धरीत ) नील सामंताचं आहे. ( तिलोत्तमेची

पाठ फिरताच पत्राचं चुंबन घेते ) ते वाटेल त्या फालतू माणसानं वाचून चालायचं नाही, बाई.

**तिलोत्तमा :** ( कुतूहलानं ) असं ? ( हात पुढे करून ) मग आण तर. मी वाचून दाखवीन तुला.

**चंदेरी :** ( पत्र पुन्हा मागे घेत ) छेः, छेः ! बाईसाहेब, आमच्यांतल्या अगदी खाजगी गोष्टी तुम्ही वाचायच्या, म्हणजे मला लाज वाटते, बाई.

**तिलोत्तमा :** ( किंचित निराशेने ) बरं, तर. दुसऱ्या कुणाकडून तरी वाचून घे. जा. आता आधी कामाला लाग. उचल तो झाडू. यमनी आत एकटीच काम करते आहे.

**चंदेरी :** नाही, नाही. बाई, पण मला तरी तुमच्याशिवाय कोण आहे, हो ? तुम्ही वाचून दाखवा ना मला. पण...कुणाला...बाहेर ( पत्र देते )...

**तिलोत्तमा :** ( हसून ) त्याची काळजी करू नकोस तू. या पत्रातला मजकूर मी कुणालाही सांगणार नाही. मग झालं ? वेडी कुठली. ( पत्र फोडून वाचू लागते. प्रथम मनाशीच वाचीत ) अरे, वा !

**चंदेरी :** ( उत्सुकतेने ) काय ? काय लिहिलंय, बाई ?

**तिलोत्तमा :** ( पत्र वाचीत ) हं. तुझा नील सामंत म्हणतो, 'प्रियतम चंदा,...'

**चंदेरी :** ( लाजेने तोंड झाकून घेत ) अय्या ! बाईसाहेब, पुढं काही चावट लिहिलं असलं, तर ? अंधारात काही करणं वेगळं आणि जगासमोर – इश्श ! तुम्हांला तोंड दाखवायला लाज वाटते, बाई.

**तिलोत्तमा :** हे बघ, तुला लाज वाटत असेल. तर तू माझ्याकडे पाठ करून उभी राहा बघू. मी मोठ्यानं वाचते. तू ऐक, म्हणजे झालं.

**चंदेरी :** बरं, बाईसाहेब.

[ चंदेरी पाठ करून उत्सुकतेने ऐकू लागते. ]

**तिलोत्तमा :** ( पत्र वाचते ) 'प्रियतम चंदा,...'

**चंदेरी :** ते झालं ना मघाशी, बाई. पुन्हा लिहिलंय ?

**तिलोत्तमा :** एकदाच लिहिलंय, ग. आता तू मधे मधे बोलू नकोस. नुसतं ऐक आणि निमूटपणे काय लाजायचं, ते लाज. हं. ( पत्र वाचते ) 'तू मला इतकी इतकी आवडतेस – आणि तरीही तू मला इतका मनस्ताप का बरं देतेस ?'

**चंदेरी :** मी कायसुद्धा केलं नाही हं, बाई.

**तिलोत्तमा :** हे बघ, लागलीस का तू बडबडायला ? सगळं ऐक आधी. हं. ( पत्र वाचते ) 'तुला भेटल्यापासून माझ्या मनाची शांतता ढळली. झोप उडाली.

रोज रात्री मला आशा वाटते, उद्या तरी हिचं पत्र येईल. एक एक दिवस वर्षासारखा लांबच लांब झाला. पण तुझं पत्र नाही. प्रिये, तू – '

**चंदेरी :** पुन्हा प्रिये लिहिलंय ? का तुम्ही आपल्या मनचं सांगता, बाई ?

**तिलोत्तमा :** ( त्रासिकपणे ) हे बघ, असं मधे मधे प्रश्न विचारू लागलीस, तर मी वाचून नाही हं दाखवणार.

**चंदेरी :** ( ओशाळून ) आता नाही हं बोलणार, बाई. हे बघा. ( पातळाचा पदर तोंडात कोंबून ) अं...अं...अं...

**तिलोत्तमा :** ( हसून ) ऐक तर, पोरी. ' दोन दिवसांत छान छान पत्र लिहायचं कबूल केलं होतंस ना तू, लाडके ? '

**चंदेरी :** ( तोंडात बोळा असतानाच ) अं ? अं...अं... ?

**तिलोत्तमा :** ( वाचते ) ' रागावलीस का माझ्यावर ? गेल्या दहा-बारा दिवसांत हज्जारदा मनात आलं असेल माझ्या, की आपल्या छोट्या लाडकीला पत्र लिहावं, पण सारखा विचार करीत होतो,तो तुझ्या सुंदर,शालीन बाईसाहेबांचा.'

**चंदेरी :** अं...अं...

**तिलोत्तमा :** (आनंदून वाचते ) '...तुझ्या बाईसाहेबांना आवडेल का ? मी फार उतावळा, उल्लू आहे, असं मत होईल का त्यांचं ? म्हणून लिहिलं नाही. पण आज शेवटी निर्धार केला. अग, तुझ्या बाईंना काय प्रेमाचा अनुभव नसेल ? त्यांनी काय प्रेमाच्या इंद्रधनुष्यावरून आकाशात सैरभैर प्रवास केला नसेल ? प्रेमानं माणूस कसा भान हरपतो, कसा वेडा होतो, हे काय तिलोत्तमाबाईंना माहीत नसेल ? म्हणून शेवटी धाडस केलं. तुझं पत्र प्रथम त्यांच्या हाती गेलं नि त्यांनी वाचलं, तरी बेहत्तर. पण आपल्या लाडक्या चंदाला पत्रानं तरी भेटायचंच. ( चंदेरी डोळ्यांतून ओघळणारे अश्रू पुसते. )

' चंदा, माझं तुझ्यावर खरंखुरं प्रेम आहे. तुझंही माझ्यावर तसंच प्रेम आहे, असं एकदा म्हण, आणि मला या क्लेशातून सोडव. तुझ्या प्रेमाचा शिडकाव घेतल्याशिवाय माझा उद्धार होणार नाही, म्हणून हे पत्र मिळाल्याबरोबर ताबडतोब उत्तर लिही आणि मला स्वर्गीय आनंदाचे दरवाजे खुले करून दे. तुझाच, तुझाच अगदी तुझाच, नील.'

हं. चंदा, आता तोंडातला बोळा काढ आणि सांग, तुझं काय म्हणणं आहे ?

[ पत्र परत देते. ]

**चंदेरी :** ( पत्र हातात घेऊन पत्राकडे निरखून पाहात ) बाई, हे पत्र तुम्हांला

लिहिलंय, का मला!

**तिलोत्तमा :** काय वेडी आहेस, ग, तू!

**चंदेरी :** बाई, आपण प्रेमात पडतो, तेव्हा आधीच थोडेसे वेडे झालेलो असतो. म्हणूनच आपली पायरी न ओळखता प्रेमात पडतो, नाही का?

**तिलोत्तमा :** ( ही जवळीक झटकून टाकीत ) मला नाही माहीत. पण हे पत्र लिहिताना मी का त्याच्या डोळ्यांसमोर असावी, हेच कळत नाही मला.

**चंदेरी :** म्हणूनच विचारलं ना मी, की हे पत्र तुम्हांला आहे, की मला?

**तिलोत्तमा :** छेः, छेः! माझा त्याचा संबंधच काय? दोन मिनिटं कुठं गर्दीत भेट झाली, तेव्हढीच. आता हे पत्र घेऊन जा आणि कामाला लाग बरं. आक्कासाहेब मला बोलतात तुझ्यासाठी, माहीत आहे? अग, पण ते पत्र तुला समजलं तरी का सगळं?

**चंदेरी :** थोडं थोडं समजलं बघा. म्हणजे त्याचं माझ्यावर प्रेम आहे, ते समजलं. पण तो पुन्हा कधी इथं भेटायला येणार आहे, ते नाही समजलं.

**तिलोत्तमा :** हे बघ, चंदा, त्यात काय लिहिलंय, ते वाचून दाखवायचं काम केलं आहे मी—आणि तेसुद्धा एकदाच. त्यात काय लिहिलेलं नाही, ते मला कसं कळणार?

**चंदेरी :** पण काय सुंदर पत्र लिहिलंय नाही, बाई? ( पत्र परत देते. ) आता एक कृपा करा ना, बाई....

**तिलोत्तमा :** आणखी काय हवंय तुला आता?

**चंदेरी :** या पत्राला उत्तर टाका ना, बाई. एवढी दया करा माझ्यावर!

**तिलोत्तमा :** ( आश्चर्याने ) छट्! काही तरीच काय? पत्र आलं, मी वाचून दाखवलं. आता ही भानगड कशी निस्तरायची, ते तुझं तू बघ.

**चंदेरी :** ही भानगड नाही, बाई. आमचं खरं प्रेम आहे एकमेकांवर.

**तिलोत्तमा :** हे बघ, ते प्रेमबिम काय, ते तुझं तूच बघ. तुला आता थोडं थोडं लिहायला येतंय. ( ड्रॉवरमधून वही काढून ) हे बघ, 'रामाने रावणाला मारले', असं सबंध वाक्य लिहिलं आहेस तू.

**चंदेरी :** नाही नाही, बाई, तेसुद्धा तुम्ही गिरवायला दिलं होतं, ते बघून काढलंय मी ( नीलचं पत्र दाखवीत ) पण हे पत्र वाचलंत ना तुम्ही? किती छान छान लिहिलंय. एवढ्या सुंदर पत्राला उत्तर म्हणून मी काय असं लिहू :
'प्रिय नील सामंत यांना–
रामाने रावणाला मारले. तुझी, चंदेरी.'

**तिलोत्तमा :** अग, तेच वाक्य लिहायला हवं, असं नाही. आपल्या भाषेत किती

तरी सुंदर वाक्यं असतात – त्या पत्रातल्यासारखी.

**चंदेरी :** आता कसं बोललात, बाई ! अहो, ती सगळी सुंदर वाक्यं तुमच्याकडेच आहेत ना. मग मी कशी लिहिणार ? मला बघा काय लिहायला येतंय आणखी ! ( वही वाचीत ) हां, 'बबन कमळ घर.'

**तिलोत्तमा :** ( तिची कीव करीत ) बरं, बाई, मी जरा विचार करते उत्तर लिहायला. पण हे बघ, मी जर तुझ्यासाठी– म्हणजे तुझंच – पत्र लिहायचं, तर तुमच्या दोघांत घडलेल्या सगळ्या गोष्टी मला कळल्या पाहिजेत, चंदा.

**चंदेरी :** ( हातांनी तोंड झाकून घेत ) सगळ्या ?

**तिलोत्तमा :** हो, सगळ्या ! तुला शरम वाटण्यासारखं काही—

**चंदेरी :** छे:, बाई ! जे घडलं, त्याची मुळीच शरम वाटत नाही. उलट अभिमानच वाटतो.

**तिलोत्तमा :** अस्सं ! पहिल्या दिवसाचं मला माहीत आहे. पण दुसऱ्या दिवशी तू त्याला भेटायला गेली होतीस, तेव्हा अभिमान वाटण्यासारखं काय काय केलंत तुम्ही ?

**चंदेरी :** ( स्वतःशीच, स्वप्नाळूपणानं ) अं...त्या दिवशी संध्याकाळी मी त्याला गावाबाहेरच्या विहिरीजवळ भेटले. मग आम्ही साकेरीच्या डोंगरावर गेलो. तिथं हातात हात घालून फिरलो. त्यानं खायला आणलं हो, ते खाल्लं. थर्मासमधून त्यानं चहा आणला होता, तो आम्ही प्यालो. मग सुंदरशा हिरवळीत आम्ही तासभर होतो.

**तिलोत्तमा :** असं ! काय काय बोलला तुम्ही ?

**चंदेरी :** बोललो ? बाई, तसं काही जास्त बोलायला मिळालंच नाही.

**तिलोत्तमा :** म्हणजे तू त्याच्याबरोबर—

**चंदेरी :** हो, बाई, नवरा-बायकोत जे जे होतं, ते सगळं झालं.

**तिलोत्तमा :** ( त्रस्त होऊन ) चंदा, तुझ्या प्रामाणिकपणाबद्दल धन्यवाद. पण, पोरी, काय केलंस हे तू ? आता वयात आली असशील तू—

**चंदेरी :** त्याला तीन वर्षं झाली की, बाई.

**तिलोत्तमा :** किती वर्षं झाली, हा प्रश्न महत्त्वाचा नाही, ग, पण या कोणा परक्या, नुकत्याच भेटलेल्या तरुणाबरोबर तू...त्या वेळी तू पूर्ण वाढीची झाली होतीस. ( कपाळाला हात लावून ) अग, पण पुढं कसं होणार तुझं, चंदा ?

**चंदेरी :** बाई, पुढं काय व्हायचं, हा विचारच आला नाही आमच्या मनात तेव्हा.

**तिलोत्तमा :** त्यानं पहिल्या वेळी तुला जरा जवळ घेतलं, अं...चुंबन देतो,

तेवढं पुरेसं होतं.

**चंदेरी :** नाही, बाई, तेवढं नाही पुरे होत.

**तिलोत्तमा :** पण...पण तू त्याला स्पष्ट नकार का नाही दिलास ?

**चंदेरी :** कसा देणार, बाई ? तरुण वय निसर्गाच्या विरुद्ध जायला मागतं का ? नदी खालीच वाहणार. ती जमिनीवरनं डोंगरावर जाते का ?

**तिलोत्तमा :** आणि यातून काही भलतंच झालं नि त्यानं जबाबदारी घ्यायची नाकारली, तर ?

**चंदेरी :** तो तशातला असता, तर त्यानं इतकं सुंदर सुंदर पत्र लिहिलं असतं का ?

**तिलोत्तमा :** या पत्रानं त्याची जबाबदारी मुळीच सिद्ध होत नाही. चंदा, आता आपल्याला एकच करता येईल. तुझ्या त्या साहसाचा काही दुष्परिणाम होऊ नये, म्हणून परमेश्वराची प्रार्थना करायची नि या नील सामंतला एकच उत्तर पाठवून हे प्रकरण संपवून टाकायचं. हं, काय लिहू ?

**चंदेरी :** छेः, छेः ! बाईसाहेब, हे प्रकरण संपवायचं, तर माझं जगणंच संपवलं पाहिजे. नाही, नाही, बाई ! मी आता त्याच्याशिवाय जगूच शकणार नाही. बाई, स्वर्ग म्हणजे काय, याची मला कल्पना नव्हती, तोपर्यंत मी केरकचरा काढून जगत होते. माझ्या दैवानं आता मला जे गवसलं, ते मी कध्धी कध्धी सोडणार नाही !

**तिलोत्तमा :** अगदी भोळी, भाबडी पोर आहेस तू, चंदा ! पहिलाच तरुण भेटला तो काय नि तू सारं आयुष्य त्याच्यासाठी वाऱ्यावर सोडायला निघालीस ती काय ! बरं, हे बघ. ( कागद, पेन काढून टेबलाजवळच्या खुर्चीवर बसत ) बापूसाहेबांच्या लेटरहेडवर अशी पत्र लिहिणं बरं नव्हे. या साध्या कागदावर लिहिते. हं, सांग. तुला काय लिहायचं आहे ?

**चंदेरी :** मला खूप खूप म्हणायचं आहे, हो. पण माझ्याजवळ चांगले चांगले शब्द नाहीत. ती वाक्यं म्हणता ना तुम्ही, ती वाक्यं नाहीत बघा. तुमच्याकडची घाला ना, बाई, थोडी वाक्यं. मग पुढं–मागं परत करीन मी तुमची.

**तिलोत्तमा :** हं. सुरुवात तर करू. ( नीलचे पत्र वाचीत ) त्यानं तुला प्रियतमा म्हटलंय, पण तू त्याला तसं लिहिणं जरा उतावळेपणाचं होईल. स्त्रीनं फार उत्सुकता दाखवू नये.

**चंदेरी :** का नको, बाई ? तुम्ही पण तसं काही तरी अवघड लिहा ना. बाई, तुम्ही प्रेम केलं असेल ना, तेव्हा काय लिहीत होता ?

**तिलोत्तमा :** हे बघ, माझी पत्रं लिहून दे, असं मी तुला सांगेन, तेव्हा हे विचार

मला. तूर्त तुझ्या प्रेमाचा पान्हा फुटू दे काय तो. ( विचार करीत ) लाडक्या, सजणा,...छे! नुसतं प्रिय –

**चंदेरी :** बाई, मला काही कळत नाही, पण नुसतं 'प्रियकरा,' असं म्हटलं, तर?

**तिलोत्तमा :** नाही चालणार. दुसरं काही सुचव.

**चंदेरी :** हां, बाई, 'माझ्या नील, माझ्या जिवा, माझ्या प्रियतमा'...असं सगळंच लिहिलं, तर?

**तिलोत्तमा :** अग, अशी सगळी फटाक्यांची माळच्या माळ लावायची पद्धत नसते, चंदा. उगीच काही तरी काय? बरं, सुरुवात आपण जरा सावध, शालीन करू? 'प्रिय नील....'

**चंदेरी :** ( नाराजीनं ) प्रिय? बरं. राहू दे. पुढं? 'तू मला भेटायला कधी येणार,' ते विचारा आधी त्याला. बाई, हे पत्राचं काही खरं नाही बघा. हाडामांसाचं माणूस आपल्या समोर पाहिजे. नाही का? ती कसली निवडणुकीची सभा नव्हती का? त्यातला तो बोलणारा माणूससुद्धा आम्हां सगळ्यांना म्हणत होता बघा, 'प्रिय भाईओं और बहनों!' ( थबकून ) बाई! प्रिय म्हणजे भाऊ-बहीण असा अर्थ होत नाही ना?

**तिलोत्तमा :** ( थांबून तिच्याकडे पाहात ) अग, तो आणि तू कोण आहात, ते मला माहीत नाही का? मग मी भगिनीचा अर्थ असलेला शब्द कसा लिहीन? हे बघ, आता पहिला मुद्दा...( नीलचे पत्र वाचीत ) म्हणजे तू इतके दिवस पत्र का पाठवलं नाहीस? खरं कारण तुला माहीत आहे. पण ते पत्रात लिहायचं का?

**चंदेरी :** छेः, छेः! बाई, अहो, मी अशिक्षित, अडाणी आहे, असं त्याला कळलं, तर सगळाच कारभार आटोपला की, हो! काही तरी लिहा ना, बाई – मी गावाला गेले होते, नाही तर कामात होते, असं काही तरी.

**तिलोत्तमा :** खोटं न लिहिता खरं सांगायचं नाही, ही एक मोठी कला आहे. तसं काही तरी––

[ पत्र लिहू लागते. ]

**चंदेरी :** बाई, 'तू मला खूप आवडतोस', म्हणून लिहा हं.

**तिलोत्तमा :** ( त्रासिकपणाने ) हे बघ, मला जरा शांतपणानं विचार करू दे. तू ही जबाबदारी माझ्यावर टाकली आहेस ना? मग मी छानसं पत्र लिहीन, पण त्यासाठी तू मला थोडा एकांत देशील तर ना? असं बघ, तू आत जाऊन काम कर. पत्र झालं, की हाक मारीन मी तुला. जा बरं आत.

**चंदेरी :** ( झाडू घेऊन आत जाता जाता ) गोड गोड लिहा हं, बाई !

[तिलोत्तमा खाली मान घालून लिहू लागते. चंदेरी पत्राच्या दिशेने चुंबन फेकते आणि आत जाते. तिलोत्तमा लिहीत असताना नाजूक पार्श्वसंगीत ऐकू येते. ती मधेच विचार करते. झरझर लिहिते. थांबते, पुन्हा लिहिते. थोड्या वेळानं पत्र पूर्ण करते. ]

**तिलोत्तमा :** चंदा, इकडे ये पाहू. ( चंदेरी उत्सुकतेने येते ) हं. आता मधे मधे वडबड न करता ऐक :

'प्रिय नील—

'तुझ्या पत्रानं माझ्या अंधाऱ्या जीवनात अचानक सूर्यप्रकाश आणला. तुझा स्पर्श झालेला तो संदेशवाहक कागद मी कुरवाळला आणि त्याच्याशी लाडे लाडे बोलू लागले.

'नील, मी तुला पत्र लिहायला हवं होतं, हे खरं. पण का लिहिलं नाही, सांगू ? मला वाटलं, एका लहानशा गावात घडीभरची मौज करायला आलेल्या नीलला मुंबईसारख्या अवाढव्य, घाईगर्दीच्या महानगरात गेल्यावर माझी बिचारीची आठवण तरी येईल का ? नाही तर मी मोठ्या प्रेमभरानं पत्र लिहायचं नि तू मात्र 'काय ही कटकट' म्हणून पत्र फाडून टाकायचं, असं व्हायला नको, म्हणून मी लिहिलं नाही.

'आता मात्र माझी खात्री झाली, की माझा नील तसा नाही. पण, नील, तुझ्या प्रेमाची ऊब नुसत्या पत्रानं भागत नाही. मला भेटायला लवकर लवकर ये. आणि कधी येणार, ते लगेच कळव. तुझ्या उत्तराची चातकासारखी वाट पाहणारी—

तुझी,<br>**चंदा** '

**चंदेरी :** कित्ती कित्ती छान लिहिलंत, बाई, तुम्ही ! तुमचे उपकार मी कध्धी कध्धी विसरणार नाही.

**तिलोत्तमा :** ( पत्राची घडी करीत ) बरं, आता हे खंडूजवळ दे, म्हणजे संध्याकाळी कारखान्याकडे जाताना पोस्टात टाकील तो.

**चंदेरी :** बाई, बाई ! बंद करू नका. अहो, ते चातक का काय लिहिलंय ना तुम्ही ? त्याचा अर्थ काही तरी चांगलाच आहे ना ?

**तिलोत्तमा :** हो, ग, हो. वाईट कशाला लिहू मी ?

[ पत्राची घडी करून पाकिटात घालते. ]

**चंदेरी :** ( लाजून ) बाई, त्यात चुंबनबिंबन काही तरी घाला की.

**तिलोत्तमा :** ( हसून ) अग, तसं मुलीनं लिहिणं बरं दिसत नाही. पुरुषानं या बाबतीत पुढाकार घ्यायचा, अशीच जुनी पद्धत आहे.

**चंदेरी :** (रुसव्यानं ) म्हणजे आम्ही काय नवी पद्धत पाडूच नये ? (पत्र घेत) आणि, बाई, हे पत्र मी दुसऱ्या कुणाच्या हातात देणार नाही. मी स्वतःच टाकणार ! आत्ता आले, हं.

[ पळत बाहेर जाते. ती गेल्यावर तिलोत्तमा नीलचे पत्र काढून पुन्हा वाचते. मधुर पार्श्वसंगीत. ]

**तिलोत्तमा :** 'तुझ्या बाईंना काय प्रेमाचा अनुभव नसेल ? त्यांनी काय प्रेमाच्या इंद्रधनुष्यावरून आकाशात सैरभैर प्रवास केला नसेल ? प्रेमानं माणूस...'

[ बाहेर मोटार थांबल्याचा आवाज. तिलोत्तमा एकदम पत्र पुस्तकात लपवते. संगीत थांबते. बाहेरून बापूसाहेबांचा आवाज : खंडू, गाडी बाळासाहेबांच्याकडे घेऊन जा. ]

**बापूसाहेब :** ( प्रवेश करून ) वाः ! काय वाचन जोरात चाललंय ! आणि ती चंदी कुठे गेली बाहेर पळत ?

**तिलोत्तमा :** मीच पाठवली तिला. दादाचं पत्र आलं नाही खूप दिवस, म्हणून मी लिहिलेलं पत्र टाकायला गेली होती.

**बापूसाहेब :** ( उत्तेजित होऊन ) कारखान्याचा जम बसत आला, हं. साईट पसंत केलीय् इंजीनियर्सनी. आपल्या कारखान्याच्या क्षेत्रात एक हजार एकर ऊस येईल. आता बँकेचीही तोंडी संमती मिळालीच आहे. लेखी हुकूम सुटायला ( तिलोत्तमा आपल्याच नादात काही तरी लिहीत असते ) फक्त दोन महिने लागतील. मग आपला शिवशंकर सहकारी साखर—अग, मी काय बोलतोय, लक्ष आहे ना तुझं ?

**तिलोत्तमा :** ( एकदम भानावर येऊन ) हो, तर. ते कारखान्याचं सांगत होतात ना....?

**बापूसाहेब :** मला वाटलं, तुझं लक्ष नसेल.

**तिलोत्तमा :** नसलं, तरी खात्री आहे ना माझी. झोपेतसुद्धा सांगेन मी.

**बापूसाहेब :** ( आश्चर्यानं ) काय ?

**तिलोत्तमा :** बायकोबरोबर तुम्ही कारखान्याशिवाय दुसऱ्या कशाबद्दल बोलणार ? कधी कधी वाटतं, मी माणूस होण्याऐवजी कारखाना झाले असते, तर तुम्ही माझी अधिक कदर केली असती.

[ बापूसाहेब आश्चर्यानं पाहतात. हळूहळू प्रकाश कमी होतो. अंधार. ]

## प्रवेश तिसरा

[ आणखी पाच आठवड्यांनी. वेळ सकाळी अकराची. आतून तिलोत्तमेच्या गाण्याचे सूर येत आहेत. पडदा उघडतो, तेव्हा रंगमंचावर चंदेरी चोरपावलाने येते. तिच्या हातात गजरा आहे. आपल्या ब्लाऊजमधून ती एक पत्र काढते. इकडे तिकडे पाहात ते पत्र खुर्चीवर टेवते. खुर्चीपुढे बसते. पत्राला गजरा घालते. देवाला करतात, तसा पत्राला नमस्कार करते. मागून यमुना येते. गाण्याचा आवाज कमी होतो. ]

**यमुना :** चंदे, काय, ग...? (चंदेरी पटकन् पत्र लपवते आणि गजरा तयार करीत असल्याचा आविर्भाव करते. ) हे बघ, आता लपवून काय उपयोग ? दर चार दिवसांनी तुका कागद यायला लागलो. गेल्या दीड दोन महिन्यांत आठ-दहा कागदा आली असतील तुझ्या याराची.

**चंदेरी :** यमुने, तोंड सांभाळून बोल. तुझ्या खंडूसारखा तो काही ड्रायव्हर नाही.

**यमुना :** बरं, बाई, मोठ्ठा इंजीनिअर, नाही तर बालिस्टर का असेना; पण असली माणसं चार दिवस मजा करून जातात. त्या रकमीचं काय झालं ? केलं का त्या मेल्यानं लग्न ? हे बघ, चंदे, या पत्राचित्रांच्या भानगडीत तरी तू पडू नकोस.

**चंदेरी :** का, ग ? माझ्या पत्रांनी काय घोडं मारलं तुझं ?

**यमुना :** आमच्या मंगरूळाक एक गंगम्मा म्हणून होतं बघ. त्येचं नवरं लगीन करून मुंबईला गेलं, ते तीन वरीस तिकडंच. दर म्हैन्याला नुसता कागद

आणि मनीऑर्डर पाठवायचं बायकोला. 'जागा नाही,' म्हणून लिहायचं बघ. मग गंगम्मानं एकच कागद पाठवून वजावलं, 'आता पोस्टमनाबरोबरच लगन करून न्हातो,' म्हणून. मग कुठं ते नवरं आलं नि नेलं बघ तिला.

**चंदेरी :** ( दबलेल्या आवाजात ) पळ ! बाईसाहेब आल्या !

[ यमुना घाईघाईनं आत जाते. चंदेरी गजरा करण्याच्या मिषानं उभी राहते. आक्कासाहेब येतात. ]

**चंदेरी :** आक्कासाहेब, आपला पारिजात काय मस्त फुललाय, हो ! कसा बहर आलाय त्याला !

**आक्कासाहेब :** पहिली फुलं देवाला घाल, ग.

**चंदेरी :** हो, बाईसाहेब.

[ जाते. बापूसाहेब हातात फायली घेऊन येतात. बाहेर जाणार, तोच थबकतात. बोलावं न बोलावं, याचा विचार करतात. ]

**आक्कासाहेब :** बापू, अरे, माझ्या मनात, कारखान्याला यश यावं, म्हणून सत्यनारायण घालायचा आहे.

**बापूसाहेब :** अग, तुला कुणी नको म्हटलं का ? नाना करतील सारी व्यवस्था.

**आक्कासाहेब :** अरे, तू आणि तिलोत्तमा पूजेला बसलात, तर बरं दिसेल ते.

**बापूसाहेब :** हॅं ! कारखाना म्हटलं, की हिच्या कपाळावर आठ्या चढतात. मला वाटलं होतं, चांगली शिकली-सवरलेली आहे. कारखान्याचे कागदपत्र वाचील, मला मदत करील. पण छे ! एकसारखी त्या मोलकरणीशी गुज-गोष्टी करीत बसते. आक्का, मी तुला कधी तरी सांगणारच होतो. पण मला काही चंदीला असं अवास्तव महत्त्व दिलेलं पसंत नाही.

**आक्कासाहेब :** बापू, तिलोत्तमेच्या एकाकी जीवनाची ती नाजूक गरज आहे. तूच बघ, तुमच्या लग्नाला आठ वर्षं झाली. मूल नाही, बाळ नाही. तिच्या-सारख्या तरुण, भावनाशील स्त्रीनं कशात मन रमवावं ? घरकाम करायला वाट्टेल तेवढी माणसं आहेत. चंदीला ती आपल्या मुलीच्याच जागी मानते आहे. दुधाची तहान ताकावर भागवते आहे आणि हल्ली ती खूप आनंदात असते, हे लक्षात आलं नाही का तुझ्या ? चंदामुळं का असेना, पण अलीकडं मी तिला खूप खुशीत असलेलं पाहिलं आहे.

**बापूसाहेब :** चंदी हिला जीव की प्राण वाटते आणि आपल्या सर्वांचं भवितव्य ज्या साखर कारखान्यावर, तो कारखाना तिच्या खिसगणतीतच नाही. का ?

संसारात काही पार्टनरशिप आहे, की नाही ?

**आक्कासाहेब :** हे बघ, बापू! अरे, तू गोड संसारातसुद्धा दुकान चालवल्यासारखा पार्टनरशिपची भाषा वापरतो आहेस. तिचं मन रमेल, तिला आवड निर्माण होईल, असं काही तरी काम काढ ना. तिला घेऊन कुठं काश्मीर-बंगलोरच्या सहलीला जा.

**बापूसाहेब :** छट्! गेली चार वर्षं या कारखान्याच्या कामात गळ्यापर्यंत रुतलो आहे मी. तो सुरू झाल्याशिवाय अगदी डोकं वर काढायला फुरसत नाही मला. ( घड्याळाकडे पाहात ) बरं, मला उशीर होतो आहे. आज एक महत्त्वाची मीटिंग आहे.

**आक्कासाहेब :** अरे, थांब. जाता जाता मला पार्वतीबाईंच्याकडे सोडून जा. खूप आजारी आहेत म्हणे त्या. ( आत पाहून ) तिलोत्तमा, मी पार्वतीबाईंच्याकडे जाऊन येते, ग.

[ तिलोत्तमा आतून 'बरं' म्हणते. आक्कासाहेब व बापूसाहेब जातात. तिलोत्तमा प्रवेश करते. तिच्या मागून चंदेरी येते. ]

**चंदेरी :** ( पत्र देत ) बाई, हे बघा. आत्ताच आलं.

**तिलोत्तमा :** अग, तू मामाकडे गेली होतीस ना, त्या मुदतीत त्याची आणखी दोन पत्रं आली होती. मी त्यांची उत्तरंही पाठवली.

**चंदेरी :** हो, बाई ? आज सकाळी मी गावाहून आल्यापासून विचारीन म्हणून म्हणत होते. पण तुम्ही एकट्या मिळालाच नाही मला. बाई, मला सगळी सगळी पत्रं वाचून दाखवा आणि तुम्ही काय काय लिहिलं माझ्या नीलला ?

**तिलोत्तमा :** अग, त्याची पत्रं वाचून दाखवीन मी. पण माझी—माझी म्हणजे तू लिहिलेली—पत्रं कशी वाचून दाखवणार मी ? मी काही त्याची कॉपी काढून ठेवलेली नाही. ( नवीन पत्र फोडून वाचते. )

'माझ्या हृदयाच्या गाभाऱ्यातल्या चदा,

'तुझ्या प्रत्येक पत्रानं मला नवं क्षितिज दाखवलं. कधी कधी स्वतःला माणूस कळत नाही. पण मी कसा आहे—निदान कसा असावा—हे तुझ्या सुसंस्कृत, उच्चशिक्षित पत्रातून जसं मला उमजलं, तसं पूर्वी कधीच उमजलं नव्हतं. तुझ्या प्रेमाचं अमृत प्याल्यावर आता मला मरणाचीही भीती नाही.

'लाडके चंदा, मागच्या पत्रात तू म्हटलं होतंस, 'वर्षानुवर्षं अडगळीत

पडलेल्या, बंद खोलीत असलेल्या दुबळ्या मनाला तू सामर्थ्य दिलंस. लाजाळू खारीला तू गरुडाचे पंख दिलेस.' खरंच, चंदा, किती काव्यमय, अपार्थिव लिहितेस तू ! ज्या कोमल् हातानं तू ही पत्रं लिहिलीस, त्या हाताची लक्ष लक्ष चुंबनं...'

**चंदेरी :** ( भांबावलेल्या नजरेनं मध्येच ) बाई, माझा नील कधी येणार, ते लिहिलंय का, हो ? हे गोड गोड शब्द ऐकायला बरे वाटतात. कळले नाहीत, तरी कानाला सुख देतात. पण, बाई, आता मला त्याची पत्रं नकोत. मला तो पाहिजे. तो पाहिजे ! ' या रविवारी येईन, ' असं लिहिलं होतं त्यानं.

**तिलोत्तमा :** अग, अशी अटीतटीला येऊ नकोस. पण थांब हं, इथं येण्याबद्दल काय लिहिलंय, ते पाहू. ( पत्रावरून नजर फिरवीत ) हं. तो म्हणतो : ' मी येत्या रविवारी येईन, असं म्हटलं होतं. पण ते मला शक्य नाही...'

**चंदेरी :** ( भावना दडपण्याचा प्रयत्न करीत ) अरे, देवा !

**तिलोत्तमा :** ( वाचते ) ' मी आज जरुरीच्या कामासाठी नागपूरला जातो आहे. तिथून भोपाळ, इंदूर, अकोला करून एक महिन्यानं मुंबईला येईन. इथं आल्याबरोबर पहिलीच गाडी धरून तुला भेटायला येईन. लाडके, आता फक्त एकच महिना थांब...'

**चंदेरी :** ( अस्पष्टपणे ) एक महिना ! नाही, हो—

[ घेरी येऊन पडणार, तोच तिलोत्तमा तिला सावरते. खुर्चीवर बसवते. तोंडावर पाण्याचा शिडकावा करते. चंदेरी डोळे उघडते. कशीबशी सावरून उभी राहते. ]

**तिलोत्तमा :** ( कठोरपणे ) चंदा, उगीच नाटकं करू नकोस. या सोंगाढोंगाचा काही उपयोग होणार नाही माझ्याजवळ. दोनदा वर वर भेटलेला कोणी पोरगा तो काय आणि त्याच्यासाठी अगदी जीव जातोय, असं तू दाखवायला लागलीस ! या घरातल्या कामाच्या मुलीनं सुद्धा प्रतिष्ठेनं वागलं पाहिजे, समजलीस ?

**चंदेरी :** मी...मी माझ्याकडून प्रयत्न करते आहे, बाईसाहेब. जमेल तेवढा करते आहे. पण त्याची ती सुंदर पत्रं आठवली, की...

**तिलोत्तमा :** ( काहीशा गर्वानं ) आणि, चंदे, त्याची ती सुंदर पत्रं काय तुला आली आहेत ?

**चंदेरी :** ( आश्चर्यानं ) म्हणजे ? मला, नाही तर कुणाला, बाईसाहेब ? पत्रावर

नाव तर माझंच असतं.

**तिलोत्तमा :** नुसत्या नावाला काहीच अर्थ नाही इथं. ती पत्रं कुणी लिहिली आहेत ?

**चंदेरी :** तुम्हीच, बाईसाहेब !

**तिलोत्तमा :** त्यांतल्या नाजूक, काव्यमय भावना कुणाच्या आहेत ?

**चंदेरी :** तुमच्याच ना, बाईसाहेब !

**तिलोत्तमा :** आणि त्यानं लिहिलेल्या पत्रातलं प्रेम कुणासाठी आहे ? त्याला पत्र लिहिणाऱ्या माझ्यासाठीच ना ?

**चंदेरी :** होय, बाईसाहेब.

**तिलोत्तमा :** ( विजयाच्या दिमाखानं ) चंदा, ती पत्रं माझी आहेत. माझ्याजवळच आहेत. त्यांतल्या भावना माझ्या आहेत. त्यांतलं प्रेम माझं आहे. तो मनोमनी माझा आहे, माझा आहे ! बोल, चंदा, तुझ्याजवळ त्याचं काही तरी आहे काय ?

**चंदेरी :** ( डोळ्यांतील अश्रू पुसत ) नाही ! बाई, त्याचं सारं आहे, ते तुमच्याजवळच आहे. माझ्याजवळ त्याचं एकच आहे, बाई, जे तुमच्याजवळ कधीही असणार नाही. या पोटात त्याचं बाळ आहे, बाई, ( हंबरडा फोडून ) बाळ आहे !

[ तिलोत्तमा प्रथम थक्क होऊन स्तब्ध उभी राहते. मग अतिशय संतापते. काठीच्या स्टँडवरची वेताची काठी उगारते. चंदेरीला मारण्यासाठी धावते. ]

**तिलोत्तमा :** चंदे, तुझी ही हिंमत ? या घरात मला उलट बोलतेस ?

[ काठीचा हात खाली करणार, तोच चंदेरी पोटावर दोन्ही हात टेकून पुढे होते. ]

**चंदेरी :** ( गाल पुढे करून ) बाई, मला मारा, पण या गालावर मारा. पाठीवर, पोटावर मारू नका हो, बाई. पाया पडते तुमच्या, पण ह्यांच्या बाळाला धक्का लावू नका !

[ तिलोत्तमेच्या हातातली काठी गळून पडते. ]

**तिलोत्तमा :** ( चंदेरीला प्रेमानं जवळ घेत ) माझी चंदा ती. तुझं बाळ, तेच माझं बाळ ! नाही धक्का लावणार मी त्याला, मुली.

—पडदा—

## अंक दुसरा

### प्रवेश पहिला

[ पंधरा दिवसांनंतर. बापूसाहेब दिवाणखान्यात फेऱ्या घालीत पत्रे सांगत आहेत. नानासाहेब ती लिहून घेत आहेत. ]

बापूसाहेब : (एका फायलीत पाहात, फेऱ्या घालीतच ) हं. आणि त्या नॅशनल मशिनरी कंपनीला चांगलं खडसावून पत्र लिहा. आम्ही त्यांच्याकडून उसाला पाणी देण्यासाठी सहा इंजिनं घेतली, त्यांपैकी दोन इंजिनं गेला दीड महिना बंद आहेत. दुरुस्तीसाठी त्यांचा माणूस आला नाही. 'नुकसान-भरपाई द्यावी लागेल,' असं खरमरीत लिहा.

नानासाहेब : ( उतरून घेत ) हो, तर. इंग्लंडमधल्या त्या मार्क स्पेन्स स्टोअर-वाल्याला खडसावलं, तसं त्याला विचारतोच, अरे, हॅव युई काऊंटेड् सीडस् ऑफ टॅमरिंड ?

बापूसाहेब : ( मध्येच थांबून ) म्हणजे काय ? नाही म्हटलं, माझ्या नावावर पत्र जाणार, तर त्याचा अर्थ आधी मला तरी कळला पाहिजे.

नानासाहेब : अर्थ सोपा आहे. अहो, आम्ही काय चिंचोके मोजलेत, की काय ? नुसतं इंग्रजीत म्हटलं, म्हणून जरा अवघड गेलं असेल. हॅव युई काऊंटेड् सीडस् ऑफ टॅमरिंड ?

बापूसाहेब : ( पुन्हा फाईल पाहात ) आणि त्या बी. एफ्. कंपनीला लिहा, तुम्हांला कारखान्याची कल्पना खरोखर पटत असेल, तरच माल पाठवा. उगीच, आम्ही म्हणतो, म्हणून आमच्या मागून येऊ नका.

**नानासाहेब :** ( लिहून घेत ) लिहितोच, उगीच ओ ओ, वफेलो, व्हेअर आर् यू टेकिंग मी, असं नको.

[ बापूसाहेब फेऱ्या घालायच्या थांबून प्रश्नार्थक मुद्रेने पाहतात. ]

**नानासाहेब :** सांगतो. म्हणजे 'अग अग, म्हशी, मला कुठे नेशी ?' असं नको. अहो, माझ्या इंग्लंड रिटर्नड्पणाची छाप दिसली पाहिजे पत्रव्यवहारात.

**बापूसाहेब :** दिसू देत. पण तुमच्या या गाई–म्हशी कारखान्याच्या दावणीला फार वेळ बांधू नका.

**नानासाहेब :** ( पत्र पाहात ) टेलिफोन कंपनीचं पत्र आहे. या बंगल्यासाठी फोनचं कनेक्शन मंजूर झालं आहे.

**बापूसाहेब :** अं...अर्ज केला, तेव्हा घरी फोन ठेवावा, असं वाटलं होतं. पण आता नकार कळवा. कारखान्याच्या ऑफिसात दोन फोन आहेत. साईट-वर एक आहेच. पुन्हा घरी आल्यावर त्याची कटकट नको. तिलोत्तमाही म्हणत होती, वेळी अवेळी घंटा वाजवून उठवणारा फोन—

**नानासाहेब :** नको ? बरं, कळवतो. ( घड्याळाकडे पाहात ) आपली आज कलेक्टरशी अपॉईंटमेंट आहे.

**बापूसाहेब :** अरे, हो. वेळ झालीच. चला. ( मोठ्याने, आत पाहात ) आम्ही बाहेर जाऊन येतो. जेवण बाहेरच घेऊ.

[ नानासाहेब जातात. ]

**तिलोत्तमा :** ( हातात एक पत्र घेऊन येते ) भाऊचं पत्र आलं आहे. तो आणि वहिनी महिन्याभरासाठी काश्मीरच्या सहलीला जाताहेत.

**बापूसाहेब :** कधी ?

**तिलोत्तमा :** आणखी दोन महिन्यांनी. आपल्याला आणि मला बोलावलंय त्यांनी या सहलीसाठी.

**बापूसाहेब :** छेः, छेः ! तिलोत्तमा ! आमची काय गडबड चाललीय पाहतेस ना तू ? वर्षभर—निदान दहा महिने तरी कामातून डोकं वर नाही काढता येणार मला. हं, तुला हवं, तर जायचा विचार कर.

**तिलोत्तमा :** छेः ! माझं एकटीचं काय ? विश्रांतीची खरी गरज आपल्याला आहे.

**बापूसाहेब :** काय करायचं, तिलोत्तमा ? आयुष्य इतकं धावपळीचं झालं आहे, की अशा चांगल्या गोष्टीसाठी वेळच मिळत नाही. कुठं तरी सहलीला

जाऊ या, असं मीच तुला सुचवणार होतो. पण गेल्या दोन वर्षांत वेळ मिळाला नाही. बरं, मी आल्यावर पाहू. आक्कासाहेबांना विचार, हवं तर.

[ बापूसाहेब व नानासाहेब जातात. तिलोत्तमा टेबलाजवळ येते. खणाला चावी लावून त्यातली पत्रं काढते. वाचू लागते. कोमल पार्श्वसंगीत. ]

**नीलचा आवाज :** प्रिये, तू म्हणतेस, ते अगदी खरं. प्रत्येकाच्या हृदयात एक वेल अशी असते, की ती प्रेमाच्या शिडकाव्यासाठी हपापलेली असते. तुझ्या अमर पत्रांनी माझ्या हृदयातल्या सिंचनोत्सुक वेलीला तुषार मिळाले. तुझी ही पत्रं मी सतत माझ्या हृदयाशी बाळगतो. आणि, लाडके, खरं सांगू का, तुझ्या आठवणी अनावर झाल्या, की या पत्रांचीच मी चुंबनं घेतो. हिमालयातून स्रवणाऱ्या अलकनंदा नदीसारख्या तुझ्या भाववाही कोमल हातातून ह्या दिव्य पत्रात उतरताना मला कधी तरी प्रत्यक्षच पाहायचं आहे.

[ पत्र वाचता वाचता तिलोत्तमेला भावना अनावर होतात आणि ती टेबलावर डोकं ठेवून रडू लागते. आक्कासाहेब येतात. ]

**आक्कासाहेब :** अग, काय झालं ? बरं नाही का तुला ?

**तिलोत्तमा :** ( डोळे पुसत ) तसं नाही, पण—

**आक्कासाहेब :** बापू काही बोलला का ? अग, हल्ली कामाचा खूप ताण असतो ना त्याच्यावर ? त्याचं इतकं मनावर घेऊ नकोस.

**तिलोत्तमा :** तेही कारण नव्हे. आक्कासाहेब, घरात सध्या काय भयंकर प्रकार घडतो आहे, याची कल्पना नाही आपल्याला.

**आक्कासाहेब :** का ? त्या चंदीनं काही घोटाळा केला, की काय ?

**तिलोत्तमा :** ( निःश्वास टाकून ) हं.

**आक्कासाहेब :** म्हणजे ? अग, नक्की काय झालं, ते सांग तरी.

**तिलोत्तमा :** पण कुठल्याही परिस्थितीत साहेबांच्यापर्यंत ही गोष्ट जाता कामा नये.

**आक्कासाहेब :** मी कुणालाही बोलणार नाही, मग तर झालं ?

**तिलोत्तमा :** चंदाला दिवस गेलेत.

**आक्कासाहेब :** ( धक्का बसून ) अग, बाई ! काय म्हणतेस काय ? खरं तरी आहे का हे ?

**तिलोत्तमा :** हो. खात्री झालीय माझी.

**आक्कासाहेब :** मग पोरीनं सगळ्यांच्याच गळ्याला फास लावला म्हणायचा.

पाहिलंस? तरी मी म्हणत होते तुला.—तिच्यात फार मन गुंतवू नकोस तू. या नोकर माणसांना कसली म्हणून कृतज्ञता राहिली नाही आज.

**तिलोत्तमा :** तशी चांगली आहे, हो, ती. पण तिच्या हातापलीकडे गोष्टी गेल्यावरच मला कळलं.

**आक्कासाहेब :** तिचा खूप राग आला असेल तुला. होय, ना?

**तिलोत्तमा :** नाही हो, आक्कासाहेब, तिच्याबद्दल राग नाही वाटत मला.

**आक्कासाहेब :** ( आश्चर्यानं ) मग?

**तिलोत्तमा :** ( रडत ) मला तिचा हेवा वाटतो, हो. हे मूल मला हवं होतं. माझा अधिकार आहे त्या मुलावर.

**आक्कासाहेब :** ( चकित होऊन ) तिलोत्तमा!

**तिलोत्तमा :** होय, आक्कासाहेब, तुम्हांला नाही समजायचं ते.

**आक्कासाहेब :** ( जवळ जाऊन तिच्या केसांवरून हात फिरवीत ) असं कसं म्हणतेस, मुली? अग, या वयात तुला मूल नसलं, तर आयुष्य किती उजाड, भयाण होतं, याची कल्पना नाही का मला? पण अजून मूल व्हायचं खूप वय आहे तुझं. बापूच्या मनावरचा या कारखान्याचा ताण जरा कमी झाला, की तुम्ही दोघंही कुठंतरी उटकमंड, काश्मीरला जा.

**तिलोत्तमा :** ( घुसमटलेल्या स्वरानं ) तसंही नाही, हो, आक्कासाहेब. पण चंदीचं हे मूल...( मन आवरून एकदम व्यवहाराकडे येत ) पण आता चंदीनं पुढं काय करायचं?

**आक्कासाहेब :** आपल्याही प्रतिष्ठेचा हा प्रश्न आहे. काही झालं, तरी तू तिला मुलीसारखी वाढवलीस. ती चुकलीमाकली, तरी आपल्याशिवाय कोण जवळ करणार तिला? तिचा मामा –

**तिलोत्तमा :** छे:, छे:! तो जंगली माणूस तिला मारहाण करून बाहेर घालवील. अशा कोवळ्या पोरीनं मग रस्त्यावर का दिवस काढायचे? आपणच त्यातून मार्ग काढू.

**आक्कासाहेब :** विश्वासातल्या डॉक्टरकडून –

**तिलोत्तमा :** नाही, नाही, आक्कासाहेब, तशा अघोरी मार्गानं तो अंकुर जाळून टाकायचा नाही. मी त्या बाळाला या जगात सन्मानानं आणण्यासाठी आकाश-पाताळ एक करीन, आक्कासाहेब! ह्यांना ते नाही आवडलं, तर ह्यांचा रोष पत्करेन. काहीही करेन. पण ते निष्पाप बाळ जगात मानानं आलं पाहिजे. कागदावरची अक्षरं जिवंत झालेली, नाचायला बागडायला लागलेली पाहायची आहेत मला.

आक्कासाहेब : काय म्हणालीस ?

तिलोत्तमा : ( भानावर येऊन ) काही नाही. माफ करा. काही तरीच बडबडत होते मी. पण गर्भपाताचा अगोचर मार्ग बंद झाल्यावर आपण चंदेरीसाठी इतर काय करू शकतो, याचा आता विचार केला पाहिजे.

आक्कासाहेब : तो पोरगा लग्न तर करणं अशक्य दिसतं.

तिलोत्तमा : कशावरून म्हणता आपण ?

आक्कासाहेब : अग, मुंबईच्या छानछोकीत वाढलेला, शिकलासवरलेला, उमदा तरुण तो. खेड्यात सहज आला, दोन घटका मौज मारली आणि पाखरासारखा दुसऱ्या डहाळीवर बसायला निघून गेला. त्याला जर जबाबदारीची जरासुद्धा जाणीव असती, तर इतक्या अल्पपरिचयात त्यानं शेवटची पायरी गाठली असती का ?

तिलोत्तमा : पण त्याची पत्रं आहेत चंदाकडे. एखाद्या वकिलाला विचारून पाहावं म्हणते. आपल्या चिकटेवकिलांना बोलावलंय मी. यायला हवेत ते एवढ्यात. हा कायद्याचा प्रश्न आहे. आपण दोघींनी कितीही भाकड चर्चा केली, तरी त्याचा काही उपयोग होणार आहे का ?

आक्कासाहेब : कायदा कदाचित त्याला जबरदस्तीनं लग्न करायला लावील, पण कायद्यानं प्रेम करण्याची सक्ती करता येईल का ?

तिलोत्तमा : केवळ लग्न झालं, म्हणून मनं जुळत नाहीत, हे आपण मला पटवून द्यायची गरज आहे का, आक्कासाहेब ?

आक्कासाहेब : ( चमकून ) अं ? म्हणजे तसं नव्हे, ग. पण चंदाचं लग्न होणं कसं शक्य आहे ? ती बोलूनचालून मोलकरीण, अशिक्षित. तिला मोठं घराणं नाही, नाव नाही, की काही नाही. आणि त्यात तिनं ही भानगड करून ठेवलीय.

तिलोत्तमा : आपण प्रयत्न तर करू.

आक्कासाहेब : हे बघ, लग्नाला त्यानं नकार दिला, तर निदान पोरीच्या नावावर दहा-पंधरा हजार रुपये तरी तो ठेवून देईल, असं काही तरी कर. फार तर पोराला अनाथाश्रमात ठेवून—

तिलोत्तमा : ( एकदम प्रक्षुब्ध होऊन ) नाही, ते कधीही होणे नाही. ते पोर नाही, आक्कासाहेब! ते एक अनाघ्रात, निष्पाप, गोड बाळ आहे. ते अनाथ नाही. त्याला एक नव्हे, दोन आया आहेत. नील सामंत चंदीशी लग्न करो, न करो, पण त्या मुलाची कधीही आबाळ होता कामा नये. मी त्याची आई होईन.

**यमुना :** ( बाहेरून येत ) चिकटे वकीलसाहेब आले आहेत.

**आक्कासाहेब :** ( तिलोत्तमेस ) मी जातेच कशी. हा सगळा गुंता तूच निर्माण केला आहेस, तूच सोडव. चल ग, यमने.

[ आक्कासाहेब व यमुना आत जातात. चिकटे वकील येतात. वय ५५, काळा कोट, हातात अॅटॅची. डोळ्यांवर चश्मा. तरतरीत. ]

**वकील :** नमस्कार, बाईसाहेब. या बंगल्यातली कायद्याची कामं वीस वर्षं करतोय मी. पण सगळी साहेबांची. आपलं काम प्रथमच येतं आहे. ( आभाळाकडे पाहात नमस्कार करीत ) परमेश्वराची कृपा. कसल्या अडचणीत सापडला आहात आपण ? आपला निरोप अगदी खाजगी होता, म्हणून विचारतो. कसली केस सोपवता ? सांगा. विजयाची गॅरंटी !

**तिलोत्तमा :** वकीलसाहेब, हे काम जरा अवघड आणि नाजूक आहे.

**वकील :** असू द्या ना, बाईसाहेब. केस जितकी अवघड, तितका आमच्या बुद्धिमत्तेला चॅलेंज मोठा. फीही मोठी. ती — धनाप्पा यल्लू विरुद्ध कोंडाप्पा कल्लू केस ऐकली असेल आपण. मीच चालवली. अहो, चक्क खुनाची केस ! मी आरोपीच्या बाजूनं. असं बघा, सगळ्यांच्या समोर मोटारस्टॅंडवर भर दिवसा खून झालेला. उलट बाजूचे अडुसष्ट साक्षीदार. एकूण एक पोखरले, सगळे फोडले. धनाप्पा कल्लूला फासावरून सोडवून आणला. तर अशी काही खुनाबिनाची केस काढा. पेपरला सेन्सेशन झालं पाहिजे. कलम ३०२, सेशन कमिट.

**तिलोत्तमा :** मला वाटतं, तुमच्या माझ्याबद्दलच्या अपेक्षा फार उच्च आहेत. माफ करा, पण मी खून करून आपलं समाधान करू शकत नाही.

**वकील :** छेः, छेः ! असं करू नका, बाईसाहेब. अहो, तीनशे दोनच्या, चारशे आठच्या, तीनशे ब्याणव कलमाच्या अशा सर्व केसेसमध्ये आरोपींना मी सोडवलं आहे, जगात असा एकच गुन्हा आहे, की त्यातून मी आरोपीला सोडवू शकत नाही.

**तिलोत्तमा** ( उत्सुकतेनं ) कोणता ?

**वकील :** (आंबट चेहरा करून ) आत्महत्येचा.

**तिलोत्तमा :** ( हसून ) त्या बाबतीतही मला आपली निराशाच करावी लागत आहे.

**वकील :** ( हात जोडून ) निदान खून करण्याच्या इराद्यानं केलेला हल्ला : कलम ३०२, शिक्षा : मरेपर्यंत फाशी; घरफोडी, दगेडा : ३९२, हायवे रॉबरी :

३९३, शिक्षा : दहा वर्षे सश्रम कारावास आणि दंड; दहा लाखांवरची अफरातफर : कलम ४०८, सात वर्षे शिक्षा अधिक दंड; किडनॅपिंग ए मायनर : कलम ३६६ ए, दहा वर्षे शिक्षा अधिक दंड—असं काही खटलं काढा. बाईसाहेब, आपल्या आणि माझ्या प्रतिष्ठेला शोभतील, अशी कामं द्या. निदान ते काम हायकोर्टातून पुढं सुप्रीमपर्यंत गेलं पाहिजे. दिल्लीला विमानातनं वाऱ्या झाल्या पाहिजेत. त्याशिवाय मोठ्या वकिलाचा आब राहात नाही कोर्टात.

**तिलोत्तमा :** मला वाटतं, आता आपल्याला फार वेळ संभ्रमात न ठेवता मी माझं काम सांगते. असं पाहा,...पण ही बाब अगदी गुप्त ठेवा, हं.

**वकील :** हंड्रेड परसेंट ! अहो, चंदनमल मारवाडी स्मगलिंगचा माल घेतो, विकतो. पण आपण ही माहिती अगदी गुप्त ठेवली. यापूर्वी बोललो का तुम्हांला ? सांगा. बंडू कदमाच्या मुलानं गुपचूप दुसरं लग्न केलं. मला माहीत, की नवराबायकोला माहीत, की भटजीला माहीत ! जिल्हा सहकारी बँकेत अफरातफर झ़ाली झाली, ही बातमी—

**तिलोत्तमा :** अहो, बँकेतल्या अफरातफरीला बातमी म्हणायचं का, वकीलसाहेब ? नवीन असते, ती बातमी असते. बरं, आधी माझं काम ऐका. असं झालंय, की माझ्या एका मैत्रिणीची मुलगी —

**वकील :** ( मध्येच ) घरातून पळून गेली असेल. अल्पवयीन मुलीला सक्तीनं पळवून नेणे : कलम ३६६ ए, १० वर्षे शिक्षा ! माझ्यावर सोपवा ते. मुलगी सज्ञान असली, तरी तिला कोर्टात आपण अल्पवयीन ठरवू. ते माझ्याकडं लागलं.

**तिलोत्तमा :** तसं काही नाही, हो. आता कृपा करून आधी नीट ऐका. माझं संपलं, की मग सल्ला द्या. हं, तर माझ्या मैत्रिणीची सज्ञान मुलगी एका तरुणाच्या प्रेमात पडली. तिला दिवस गेले. तो तरुण आहे परगावी त्याची पत्रं आहेत, पण या प्रकाराला तोच जबाबदार आहे, असं सिद्ध करण्या-सारखं त्या पत्रांत काही नाही. अशा परिस्थितीत त्यानं लग्न केलं नाही, तर काय करता येईल ?

**वकील :** बाईसाहेब, ही एम्.बी.बी.एस्.ची केस आहे. बी.ए. एल्एल्.बी.ची केस नाही ! डॉक्टरच सोडवील यातून वकील नाही.

**तिलोत्तमा :** तो विचार झाला आहे, आणि डॉक्टरांच्याकडे केस सोपवायची नाही, असा निर्णय मी...माझ्या मैत्रिणीनं घेतला आहे.

**वकील :** ठीक, ठीक. बरं, त्याची सांपत्तिक स्थिती काय आहे ? त्याचा बाप

कोणी प्रतिष्ठित, पुढारी, मंत्री, कारखानदार, भांडवलवाला, अन्नदार असा आहे का? मी सांगतो, बाईसाहेब, तसा कोणी असला, तर केस नुसती तयार करायची. कोर्टात ती फाईल करण्यापूर्वीच मुलाचा बाप पन्नास-साठ हजार रुपये गुपचूप आणून देईल.

**तिलोत्तमा :** त्याची सांपत्तिक स्थिती मला – म्हणजे माझ्या मैत्रिणीला नि तिच्या मुलीलाही माहीत नाही!

**वकील :** असं? कमाल आहे! अहो, मुलाची आर्थिक परिस्थिती आधी पाहिल्याशिवाय या पोरी कशा काय प्रेमात पडतात, बुवा? नाही तरी हल्लीच्या पोरी मूर्खच!

**तिलोत्तमा :** पुरुष अशी भुरळ पाडतात, की साध्या भोळ्या मुलीच्या मनात आर्थिक विचारच येऊ नयेत. बरं, तर अशा परिस्थितीत काय करायचं?

**वकील :** (कायद्याचं पुस्तक काढून ते चाळीत) बाईसाहेब, त्याला लग्न करायला भाग पाडाच. अहो, नुसते पैसे दिले, तरी मुलीच्या पुढच्या आयुष्याचं काय? त्यानं लग्न करावं, म्हणून त्याच्यापुढं कायद्याची ही कलमं टाका. (पुस्तकाची पानं पाहून) एक एक कलम म्हणजे हत्तीच्या पायाला बसणारा चाप आहे. हं, हे पाहा. (तिलोत्तमा कलमं उतरून घेते.) किडनॅपिंग ए मायनर : इंडियन पीनल कोड, थ्री सिक्ससिक्स ए — दहा वर्षे तुरुंगवास आणि वर दंड; अल्पवयीन मुलीवर बलात्कार : कलम थ्री-सेव्हन सिक्स, दहा वर्षे तुरुंगवास आणि दंड...आणि बरं का, बाईसाहेब, मुलगी सोळा वर्षांखालची असेल, तर तिनं संमती दिली असली, तरी आरोपीला शिक्षा होईल. त्यानं तिच्या अंगावरचे दागिने चोरले, असं सुद्धा सिद्ध करू आपण...ब्रीच ऑफ ट्रस्ट, थेफ्ट दाखवू. आणखी चार वर्षे जाईल तुरुंगात. नसले तिच्या अंगावर दागिने, तरी होतेच, असं दाखवायची जबाबदारी माझी! तो चारशे आठमध्ये अडकत असेल, तर पाहा. अफरातफरीचा सुद्धा आरोप ठेवू.

**तिलोत्तमा :** थांबा.

**वकील :** थांबा काय? बाईसाहेब, अजून या पुस्तकात चारसहाशे कलमं राहिली आहेत. त्यांतली दहा-वीस तरी लावू ना त्याला.

**तिलोत्तमा :** थँक यू, मिस्टर चिकटे. ही अगदी प्राथमिक अवस्था आहे. कदाचित पुढं मला आपली अधिक गरज लागेल. तेव्हा बोलावीनच मी आपल्याला.

**वकील :** बरं आहे, बाईसाहेब, पण एखादी खुनाखिनाची सोय होते का पाहा.

**तिलोत्तमा :** ( हसून ) बरं... मी खून करायचा ठरवलं, तर आपलीच आठवण ठेवीन मी !

**वकील :** नमस्कार; बाईसाहेब. ( जाता जाता थांबून ) असं करा, ही खूण घातली आहे, ते पुस्तक ठेवून घ्या. त्याचा अभ्यास करायला सांगा तुमच्या मैत्रिणीला. आठ दिवसांनी भेटतो मी तुम्हांला.

**तिलोत्तमा :** ( पुस्तक घेत ) थँक यू. गरज लागली, तर कळवीनच.

**वकील :** ( जाता जाता उत्साहाने ) का नाही लागणार ? आपण मनावर घेतलं, तर लगेच फौजदारी करू. शुभस्य शीघ्रम् !

[ नमस्कार करून जातात. ]

## प्रवेश दुसरा

[ आठ दिवसांनी. आक्कासाहेब पुस्तक वाचत आहेत. बापूसाहेब अस्वस्थपणे खिडकीतून बाहेर पाहात आहेत. ]

**बापूसाहेब :** आक्का, गेले काही दिवस तिलोत्तमाची चित्तवृत्ती नेहमीसारखी शांत, समाधानी दिसत नाही, असं मला जाणवू लागलं आहे.

**आक्कासाहेब :** ( जपून बोलत ) असं ? कशावरून म्हणतोस तू, बापू ? तुमचं दोघांचं ठीक आहे ना ?

**बापूसाहेब :** ( नाराजीनं ) हो. पण ठीक आहे, एवढंच.

**आक्कासाहेब :** म्हणजे ?

**बापूसाहेब :** या बायकांची मनं कधी कळतच नाहीत बघ. तिलोत्तमा गरीब घराण्यातली; पण सुंदर आणि गुणी, म्हणून मी लग्न केलं. आपल्याला आपल्या तोलाच्या मुली कमी का सांगून आल्या ? पण मी विचार केला, पैसा पैसा काय करायचा आहे ? देवानं दिलं आहे, ते खूप आहे. एखाद्या गरिबाची मुलगी जहागीरदाराच्या घरी पडली, तर तिचे गुण अधिकच फुलतील; पण—

**आक्कासाहेब :** अरे, मग ती काही वावगी वागते का ?

**बापूसाहेब :** तसंही नाही, ग, अक्का ! पण माझ्याशी ती अगदी जेवढ्यास तेवढं वागते. गेल्या दोन महिन्यांत तर आमच्यांतलं अंतर खूप खूप वाढलं आहे.

आम्ही दुरावलो आहोत, असं मला वाटू लागलं आहे.

**आक्कासाहेब :** मला तर अलीकडे ती खूप आनंदी दिसते आहे...बापू, खरं म्हणशील, तर लग्न झाल्यापासून हल्लीच ती मला उत्साही, टवटवीत दिसली.

**बापूसाहेब :** ( फुरंगटून ) माझ्यापेक्षा त्या मोलकरणीच्या पोरीचं अधिक कौतुक वाटतंय तिला !

**आक्कासाहेब :** चंदीबद्दल म्हणतोस का तू? अरे, ती आल्यापासून तर तिलोत्तमेला जीवनात काही तरी अर्थ मिळाल्यासारखं वाटतंय.

[ यमुना येते. ]

**यमुना :** बाहेर आहुजाशेठ आले आहेत.

**बापूसाहेब :** त्यांना सांग, त्यांचं काम होणार नाही. मी भेटू शकत नाही. ( यमुना जाते. आक्कासाहेबांना ) या आहुजानं एकच ठेका धरला आहे. साखरेबरोबर लिकर–उत्पादनाचा अर्ज करा, म्हणून. तो म्हणतो, आपल्या साखर कारखान्यात व्हिस्की, ब्रँडी, रम, तयार होणार असेल, तर त्याला त्याची सोल एजन्सी पाहिजे आहे. त्यासाठी तो दहा लाख रुपयांचे शेअर्स घ्यायला तयार आहे.

**आक्कासाहेब :** मग तू काय सांगितलंस त्याला ?

**बापूसाहेब :** मी तत्त्वाचा माणूस आहे. मी त्याला साफ सांगितलं, मी लिकर-उत्पादन करणार नाही. तुम्ही दहा लाखांचे शेअर्स नाही घेतले, तरी हरकत नाही. मी सौदेबाजी करीत नाही. यमने, माझी बॅग आण.

[ यमुना त्यांची ॲटॅची आणून देते. बापूसाहेब ती घेऊन जातात. यमुना परत जाते. आक्कासाहेब येतात व खिडकीजवळ जातात. मोटार सुरू झाल्याचा आवाज. तोच तिलोत्तमा हातात तार घेऊन येते. ]

**तिलोत्तमा :** आक्का, या वेळेपर्यंत तो यायला हवा होता—नील सामंत.

**आक्कासाहेब :** वकील काय म्हणत होते? त्याच्यावर फिर्याद करून काही हाती लागणार आहे का? तुझ्या या चंदीमुळं माझा जीव मात्र मधल्यामधे टांगणीला लागला आहे. बापू आज खोदून खोदून विचारीत होता – अलीकडे तू आपल्याच तंद्रीत असतेस, त्याच्यापासून मनानं दूर दूर असतेस ...ते का, म्हणून.

**तिलोत्तमा :** तुम्हांला माहीत आहे, आक्कासाहेब.

**आक्कासाहेब :** (अर्थपूर्ण नजरेने तिच्याकडे पाहात) बापूपेक्षा मला थोडं

अधिक माहीत आहे, इतकंच. पण मला अजून सगळं काही माहीत आहे, असं नाही.

**तिलोत्तमा :** आपल्याला माहीत नाही, असं फारसं नाहीच. पण...( हातातल्या घड्याळाकडे पाहात ) आज नील सामंत येणार आहे. त्याच्याशी बोलल्यावर अधिक सांगेन मी आपल्याला.

**आक्कासाहेब :** बघ, बाई ! काय करायचं, ते तुझं तूच ठरव ! ( बाहेरच्या दरवाज्याची घंटा वाजते. ) यमुने, कोण आलंय पाहा वरं. बरं, मी जाते. त्याला दोघींच्यासमोर बोलणी करायला संकोच वाटेल. पण बघ हं, तो लग्न तर करणार नाहीच, पण पोरीचं—

[ यमुना येते. ]

**यमुना :** बाहेर कोणी साहेब आले आहेत.

**तिलोत्तमा :** ( आक्कासाहेबांच्याकडे पाहात ) तोच असणार ! ( आक्कासाहेब जातात. यमुनेस ) पाठवून दे त्यांना आणि चहा आण.

[ यमुना बाहेर जाते. लगेच येते. तिच्या मागोमाग नील सामंत – वय २५, तरतरीत, देखणा, अद्ययावत कपडे घातलेला – येतो. यमुना आत जाते. ]

**नील :** नमस्कार. आपण...तिलोत्तमाबाई ना ?

**तिलोत्तमा :** नमस्ते... हो... बसा ना... केव्हा आलात ?

**नील :** तासाभरापूर्वीच. माझी तार मिळाली ना ?

**तिलोत्तमा :** हो. आपलीच वाट पाहात होते मी. अं...आपण चहा घेता ना ?

**नील :** हो.

**तिलोत्तमा :** प्रथम आपण आमच्या बकुल गावी आला होता, तेव्हा आपली थोडा वेळ भेट झाली होती.

**नील :** ( उत्तेजित होऊन ) होय. अगदी थोड्या वेळासाठी. ती क्षणकालाची भेट अजून आपल्या लक्षात आहे का ?

**तिलोत्तमा :** का नसणार ? एका भयंकर संकटातून वाचवलंत आपण मला.

**नील :** त्यात मी विशेष असं काय केलं ? माझ्या जागी इतर कुणी असतं, तरी त्यानंही...( यमुना चहा आणते आणि ठेवून जाते. तिलोत्तमा किटलीतून चहा ओतून तयार करू लागते. ) तेच केलं असतं.

**तिलोत्तमा :** आमचं बकुल गाव लहान आहे. मुंबईसारख्या मोठ्या शहरात राहणाऱ्याचं मन रमण्यासारखं काहीच नाही ना इथं ?

**नील :** वाः ! तसं नाही, हं. ( तिनं पुढे केलेला चहाचा कप घेत ) थँक यू. मला तर वाटतं, खरं सुख, समाधान, निवांतपणा लहान गावातच असतो. मुंबईसारखी मोठी शहरं म्हणजे नुसती डिपार्टमेंटल स्टोअर्स – अवाढव्य दुकानं झाली आहेत !

**तिलोत्तमा :** मग सुखाची ही माहेरं सोडून तुम्ही दुःख देणाऱ्या मोठ्या शहरात राहताच कशाला ?

**नील :** कारण, बाईसाहेब, ही शहरं दुःखाबरोबरच पैसाही देतात आणि कितीही तत्त्वज्ञानी माणूस असला, तरी त्याला जगण्यासाठी पैसा हवाच असतो, नाही का ?

**तिलोत्तमा :** हो, तेही खरंच. पण हा पैसा मिळवण्यासाठी तुम्ही मुंबईत काय करता ?...की अजून शिक्षणच चाललंय तुमचं ? तुम्ही अगदी तरुण आहात, म्हणून विचारलं.

**नील :** ( कप खाली ठेवीत ) मला वाटतं, माझ्याबद्दलची माहिती मीच सांगणं अधिक सोयीचं होईल. काही बाबी अशा आहेत, की त्यांबद्दल विचारणं आपल्या खानदानी शालीनतेला धरून होणार नाही. अं...माझं सबंध नाव नीलकंठ रघुनाथ सामंत. मी मूळचा कोकणातला; पण वडिलांच्या पिढीपासून मुंबईलाच असतो. मी शाळेत असतानाच वडील वारले. मग काकांनीच माझं शिक्षण केलं. वडिलांच्यानंतर दोन वर्षांनी आई वारली. हल्ली मी काकांच्याकडेच राहतो. पण लवकरच स्वतंत्र होण्याची माझी उमेद आहे.

**तिलोत्तमा :** मला वाटतं, आता आपण मुख्य विषयाकडे यायला हरकत नाही. चालेल ना ?

**नील :** ( उमदेपणाने ) चालेल म्हणजे काय ? अहो, मी मुंबईहून शे-दीडशे मैलांचा प्रवास करून इथं आलो, तो आपण सुचवता, त्या ‘मुख्य विषया’कडे वळण्यासाठीच.

**तिलोत्तमा :** ठीक तर. आमच्या चंदेरीची आणि आपली मैत्री—

**नील :** केवळ मैत्रीच नव्हे, आमचं प्रेम आहे. आमचं एकमेकांवर नितांत प्रेम आहे.

**तिलोत्तमा :** भावनेच्या जगात प्रेमाला खूप महत्त्व असेल, मिस्टर सामंत, पण व्यवहाराच्या आणि कायद्याच्या भाषेत प्रेमाला शून्य महत्त्व आहे.

**नील :** ज्या भाषेत प्रेमाला शून्य महत्त्व आहे, ती भाषा मला मुळीच जाणून घ्यायची नाही, बाईसाहेब.

**तिलोत्तमा :** ( कठोरपणे ) तुम्हांला काय हवं आहे, हा मुख्य प्रश्न नसून, आमच्या चंदाला काय हवंय, तिच्या आयुष्याचं पुढं काय करायचं, हा मुख्य प्रश्न आहे...आणि त्यासाठीच तुम्हांला तार करून मी बोलावून घेतलं आहे! ( कायद्याचं पुस्तक पुढं करीत ) मिस्टर सामंत, एखाद्या अजाण मुलीला फसवून तिच्या आयुष्याचा नाश करू पाहणाऱ्याला कायदा दया दाखवीत नाही.

**नील :** ( पुस्तकाची पानं चाळीत ) बाईसाहेब, मी आपल्याला नम्रपणे सांगतो, मी गेली चार वर्षे कायद्याचाच अभ्यास केला आहे. एल्‌एल्‌. बी. झाल्यावर मी एल्‌एल्‌. एम्‌. झालो आहे आणि सध्या हायकोर्टात बॅरिस्टर तनखी-वाला यांच्या हाताखाली मी प्रॅक्टिस करतो आहे. मी एल्‌एल्‌. एम्‌. मध्ये फर्स्टक्लास फर्स्ट आलो आहे.

**तिलोत्तमा :** ( दचकते ) अं?

**नील :** हो. पण आपल्यासारख्या स्वरूपसुंदर, अभिजात खानदानासमोर माझी शैक्षणिक पात्रता मांडणं मला उथळपणाचं वाटत होतं, म्हणूनच त्याचा उल्लेख मी प्रथम केला नव्हता. बाईसाहेब, कायद्याचा एवढा अभ्यास केल्यावर मी एकाच निष्कर्षाला आलो आहे, की आयुष्याचे प्रश्न केवळ कायद्यानं सुटले असते, तर आयुष्य फार सोपं झालं असतं. जीवन अवघड करण्याचं काम कायदा करतो, सोपं करण्याचं नव्हे.

**तिलोत्तमा :** ( कायद्याचं पुस्तक बाजूला ठेवीत ) कायद्याचा प्रश्न तर निकालात निघालाच. मग चंदाचं काय करायचं ठरवलंत तुम्ही? की दोन दिवस मजा मारल्यानंतर तिचा आपला काहीच संबंध नाही, असं म्हणायचंय आपल्याला?

**नील :** ( व्यथित होऊन ) आपण अशी आक्रमक भूमिका का घेता, हे मला समजत नाही, बाईसाहेब. तरी पण मी मात्र आपली नेहमीच कदर करतो, आदर दाखवितो. चंदेरीच्या पालक या नात्यानं आपण मला आणि तिलाही अतिशय पूजनीय आहात.

**तिलोत्तमा :** ( एकदम भावविवश होऊन ) तुम्हांला मी फक्त पूजनीय वाटा-यला नको आहे मला, नील! नील, मला हवंय...मला हवंय...

**नील :** ( चमकून ) मला काही म्हणालात, बाईसाहेब?

**तिलोत्तमा :** ( स्वतःला सावरून ) माफ करा, चंदेरीच्या चिंतेमुळं मी थोडी भांबावून गेले. पण...तिची आजची अवस्था तुम्हांला माहीतच आहे. पत्रातून जो संदिग्ध उल्लेख होता, त्याचा अर्थ—

**नील :** हो. माझ्या लक्षात आला.

**तिलोत्तमा :** तो केवळ लक्षात येऊन यापुढे गोष्टी निभणार नाहीत, मिस्टर सामंत. त्याची जबाबदारी तुमच्यावर आहे, हे तुम्ही कबूल करता काय? मला शब्दांचा फापटपसारा नको आहे. फक्त होय, की नाही, एवढं सांगा. म्हणजे आम्हांला आमच्या वकिलाकडे ही केस सोपवण्याचा विचार करावा लागेल.

**नील :** बाईसाहेब, प्रत्येक गोष्ट ही साक्षीदाराच्या पिंजऱ्यातून फक्त 'होय, की नाही' या एका शब्दात निर्णायक होऊ शकत नाही. आपल्याला शब्दाचा फापटपसारा नको आहे. पण त्याशिवाय मला माझा निर्णय सांगता येत नाही. कारण चंदेरीमुळं माझ्या जीवनाची जी अपूर्व गुंतागुंत झाली आहे, ती एका शब्दाच्या पार पलिकडची आहे. त्यासाठी मला थोडी गतकाळाची उजळणी करावी लागेल. चालेल?

**तिलोत्तमा :** तुम्हांला ती आवश्यक वाटत असेल, तरच.

**नील :** हो, वाटते! मी जेव्हा प्रथम या गावात आलो, तेव्हा सहज म्हणून जत्रेला गेलो. तिथं माझी नि चंदेरीची ओळख झाली. त्यावेळीच मला वाटलं होतं, ही ओळख जितक्या सहज झाली, तितक्याच सहजपणानं ती संपून जाणार नाही.

**तिलोत्तमा :** ओळख! म्हणजे तिच्याकडे तुम्ही गंभीरपणानं पाहात नव्हता— आणि तरीही अल्पपरिचयातच अखेरच्या पायरीपर्यंत तिला ओढून न्यायला तुम्हांला काहीच वाटलं नाही? आणि आता त्या जबाबदारीतून बाहेर पडण्यासाठी तुम्ही शब्दजंजाळ पसरीत आहात.

**नील :** तसं नाही, बाईसाहेब, शब्दांना जंजाळ म्हणू नका. त्या शब्दांनीच माझं सारं जीवन बदलून टाकलं आहे.

**तिलोत्तमा :** असं? पण चंदा तर म्हणत होती, की तुमच्या दोन्ही भेटींत तुम्ही दोघं फारसं काही बोललाच नाही!

**नील :** हो, तेही खरं आहे. शाळेतल्या दोन लहान मुलांची जशी मैत्री जमते, तितक्या सहजपणे, नैसर्गिकरीत्या आम्ही एकत्र आलो.

**तिलोत्तमा :** (उपहासानं) पण शाळेतल्या दोन मुलांच्या मैत्रीतून तिसऱ्या मुलाचा प्रश्न उत्पन्न होत नाही, मिस्टर सामंत.

**नील :** (किंचित रागाने) आपण मला त्याची वारंवार जाणीव करून देण्याची आवश्यकता नाही! बाईसाहेब, ते जे घडलं, ते अगदी पौर्णिमेच्या चांदण्याइतकं सहजसुंदर होतं. पण खरं जे घडलं, ते नंतरच. त्यानंतर मी तिला पत्र

पाठवलं आणि त्याला अविस्मरणीय, नितांत सुंदर उत्तर आलं. आपल्याला आमच्या पत्रव्यवहाराची कुठून कल्पना असणार, बाईसाहेब? पण... (खिशातून रेशमी रुमालात गुंडाळलेल्या पत्रांचा गठ्ठा काढून) या पत्रांनी चंदेरीच्या व्यक्तिमत्त्वाचं मला जे दर्शन घडलं, ते केवळ अभूतपूर्व आहे!

तिलोत्तमा : तुम्ही तिला गोड बोलून फसवलंत, तसं तिनंही तुम्हांला खूश करण्यासाठी गोड गोड थापा मारल्या नसतील कशावरून?

नील : (आत्मविश्वासाने) नाही, बाईसाहेब! अप्रामाणिक व्यक्तीचं हे अक्षर नाही, खोटंनाटं सांगणाऱ्याच्या या भावना नाहीत. हे आहे अस्सल, बावनकशी सोनं! ही पत्रं लिहिणाऱ्या व्यक्तीला अनृत माहीत नाही, पाप माहीत नाही, असुंदर असं काहीही अवगत नाही! (तिलोत्तमा आपल्या भावना दाबण्याचा प्रयत्न करते. नील त्या पत्रांच्या गठ्ठ्यातून एक पत्र काढून वाचू लागतो.) बरं का, बाईसाहेब, एका पत्रातून चंदेरीनं ही कविता पाठवली :

**'निळ्या निळ्या सागरात नील माझा हरपला**
**निळ्या अथांग आकाशात नील माझा गवसला**

**सागराला अंत आहे, अंत आकाशाला नाही,**
**नील माझा अनंत झाला, मला आता अंत नाही ...'**

ही पत्रं येण्यापूर्वी चंदेरीवर माझं प्रेम नव्हतं, असं नाही. पण ते साधं, बाळबोध, निसर्गजन्य प्रेम होतं. पण या पत्रांनी त्या प्रेमाला नवं परिमाण दिलं, नवं रूप दिलं, नवं स्वप्न दिलं.

तिलोत्तमा : (भावनावेग आवरीत) पुरे, पुरे. पण, मिस्टर सामंत, ही पत्रं लिहिणारीवर तुमचं प्रेम आहे, असं म्हणायचं आहे का तुम्हांला?

नील : अलबत्! एक वार नव्हे, हजार वेळ प्रेम आहे! त्या पत्रांनी माझ्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. तिची पत्रं येऊ लागल्यावर माझी खात्री झाली, आतापर्यंत मी अर्धवटच जीवन जगत होतो. मी पूर्वी व्यवहाराच्या रुक्ष पातळीवरच जगत होतो. या पत्रांतल्या अथांग भावनांनी मला एका अतींद्रिय, दिव्य जगतात नेऊन सोडलं आहे. आणि म्हणूनच, बाईसाहेब, मी चंदेरीबरोबर लग्न करायला तयार आहे–नव्हे, तिनं माझ्याशी लग्न करायला संमती दिली, तर मी स्वतःला धन्य समजेन!

तिलोत्तमा : (आश्चर्यानं) मिस्टर नील सामंत, तुम्ही–तुम्ही तिच्याशी लग्न करणार?

नील : होय ! तो माझा निश्चय आहे ! का ? तुमचा काही विरोध आहे का ?

तिलोत्तमा : छे:, छे: ! माझा विरोध कशासाठी असणार ? उलट, मला त्याचा आनंदच होईल. पण... नंतर तुम्ही तक्रार करू नये, म्हणून विचारते. ती कोण आहे, काय आहे, याची कल्पना आहे का तुम्हांला ?

नील : ( हसून ) हां हां. आत्ता आलं लक्षात. ती एक साधी कामवाली मुलगी आहे, म्हणून मी तिला कमी लेखेन, अशी शंका आली का तुमच्या मनात ? नाही, बाईसाहेब, मला त्याची मुळीच खंत वाटत नाही. मोठमोठ्या जागा अडवून बसलेल्या आणि श्रेष्ठ मानल्या गेलेल्या समाजातील व्यक्ती जर मनानं क्षुद्र असू शकतात, तर त्या उलट साधं घरकाम करणारी चंदेरी मनानं अत्यंत सुसंस्कृत, प्रगल्भ विचारांची का असू नये ? नव्हे, ती तशी आहेच, याबद्दल माझ्याकडे ( पत्रं दाखवीत ) हा लेखी पुरावा आहे. पांडवांनासुद्धा वनवासात विराटाघरी सेवा करावी लागलीच. त्यात कमीपणा कसला ?

तिलोत्तमा : नील, मघा मी तुम्हांला जरा टाकून बोलले, त्याबद्दल माफ करा हं. पण सौजन्यापेक्षा चंदेरीच्या जीवनाच्या प्रश्नांची कड लावणं हे तेव्हा मला अधिक अगत्याचं होतं.

नील : त्यात क्षमा मागण्यासारखं काय आहे, तिलोत्तमाबाई ? उलट, चंदेरीची तुम्ही किती काळजी घेता, तिच्या जीवनाशी तुम्ही किती एकरूप झाला आहात, हेच त्या किंचित कठोर शब्दांवरून सिद्ध होतं.

तिलोत्तमा : तिच्या वतीनं बोलणारं तिच्या घरचं कोणीच नाही, म्हणून मलाच ही बोलणी करावी लागत आहेत. तुम्ही जर लग्नाला तयार असाल, तर सध्याच्या परिस्थितीत हे लग्न शक्य तेवढं लवकर व्हावं, असं नाही का तुम्हांला वाटत ?

नील : अर्थातच वाटतं. आजपासून पंधरा दिवसांनी—रविवारी सकाळी लग्न करू.

तिलोत्तमा : लग्न मुंबईलाच करावं, असं घरातल्या वडील माणसांना वाटणार, नाही का ?

नील : इतर कुणाला काही वाटण्याचा या लग्नाशी संबंध नाही. माझ्या काकांना हे लग्न पसंत पडेल, असं मला वाटत नाही, पण त्याची मला पर्वा नाही. लग्न इथंच, आपल्या बंगल्यावर करू ! काकांची संमती मिळवण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन.

तिलोत्तमा : आणि त्या प्रयत्नांना यश आलं नाही, तर ?

नील : तर...मला आशा आहे, की माझे काका समजूतदारपणा दाखवतील. लग्न इथंच, आपल्या बंगल्यावर वैदिक पद्धतीनं करू. मुंबईला गेल्यावर आम्ही रजिस्टर करू, म्हणजे कायद्याच्या दृष्टीनं सोयीचं होईल.

तिलोत्तमा : पंधरा दिवसांत लग्न म्हणजे जरा घाई होते आहे, पण त्याला पर्याय नाही. लग्नानंतर आपण चंदेरीला लगेच घेऊन जाणार का ?

नील : होय. त्याचाही मी विचार केला आहे. लग्नानंतर मला काकांचं घर सोडावं लागलं, तर मुंबईच्या उपनगरात मी एक तात्पुरती जागाही पाहून ठेवली आहे. मी पंधरा दिवसांनंतर शनिवारी संध्याकाळी येईन. रविवारी सकाळी लग्न झाल्यावर लगेच दुपारी आम्ही दोघं मुंबईला जाऊ मात्र, बाईसाहेब, मी स्वतः चंदेरीला ही लग्नाची बातमी सांगितली, तर आपली काही हरकत नाही ना ?

तिलोत्तमा : मुळीच नाही. उलट, तुम्ही स्वतःच तिला सांगणं अधिक योग्य होईल. या अवस्थेत आपलं पुढं काय होईल, या काळजीनं पोर अगदी खचून गेली होती. आपण बसा हं. मी आत्ता पाठवते तिला.

[ जाते. नील पत्र वाचत लांब उभा राहतो. तिलोत्तमा व चंदेरी येतात. तिलोत्तमा परत जाते. नील रुसल्यासारखा उभा आहे. ]

चंदेरी : नील,...रागावलास माझ्यावर ?

नील : ( फुरंगटून ) हूं...

चंदेरी : बाईंनी तुला तार करून बोलावलं, म्हणून ?

नील : हूं...

चंदेरी : आता गेला राग ?

नील : अं...हं !

चंदेरी : आता राग जाण्यासाठी काय करावं माणसानं ?

नील : राग का गेला नाही, ते आधी विचारावं.

चंदेरी : ( भीत भीत ) का नाही गेला राग ?

नील : ( तिच्याकडे वळून हसत ) कारण राग आलाच नव्हता !

[ नील व चंदेरी एकमेकांना मिठी मारतात ]

चंदेरी : ( त्याला कुरवाळीत ) माझ्या राजा ! कधी येशील, कधी दिसशील, म्हणून माझा जीव अर्धा झाला होता बघ. किती किती वाट पाहायची ती. आम्ही नाही जा.

[ कृतक कोपानं दूर होते. ]

**नील :** चंदा, लाडके, आता तुला फार वेळ नाही वाट पाहावी लागणार. फक्त पंधरा – पण थांब. तू असं कर. ( तिला हाताला धरून खुर्चीवर बसवीत) इथं बैस. सारं कसं साग्रसंगीत, पद्धतशीर झालं पाहिजे.

**चंदेरी :** काय पद्धतशीर झालं पाहिजे ? ( लाजून ) त्या दिवशी काय धसमुसळ, घाई, नि आता म्हणे पद्धतशीर आणि निवांत.

**नील :** हे बघ, तू आता मधे मधे काही बोलायचं नाही. ( खुर्चीसमोर गुडघे टेकून बसतो. ) मला लग्नाची मागणी घालायची आहे तुला.

[ चंदेरी एकदम उभी राहते आणि जमिनीवर बसून त्याला मिठी मारते. ]

**चंदेरी :** अय्या ! खरंच ? माझ्या लाडक्या–

**नील :** ( तिला दूर करीत ) अग, पण मागणी घालायच्या आधीच अशी हुरळून गेल्यासारखी काय करतेस ? मुलीनं कसं शांतपणे बसायचं...मुलानं मागणी घातली, की ' विचार करीन ', म्हणून सांगायचं...आधी वर बैस बघू.

[ चंदेरी खुर्चीवर बसते. नील पुन्हा जमिनीवर गुडघे टेकून बसतो. ]

**चंदेरी :** ( खुर्चीवरची उशी त्याला देत ) अहो, ही उशी तरी घ्या पायाखाली. ( तो उशी घेऊन गुडघ्यांखाली ठेवतो. ) आणि लवकर घाला ना लग्नाची मागणी !

**नील :** कमाल आहे तुझी ! अग, मी तुला लग्नाचं विचारणार आहे, हे तुला माहीतच नाही, असं समजायचं असतं तू.

**चंदेरी :** ( त्याचे केस कुरवाळीत ) कप्पाळ तुमचं ! ( आपल्या वाढत्या पोटावर हात फिरवीत ) ' हे ' सुद्धा झालं. आता अजून काय माहिती व्हायची राहिलीय ?

**नील :** बरं, आता गंभीर हो हं, चंदे !... आणि नीट लक्ष देऊन ऐक. प्रिये —

**चंदेरी :** काय, प्राणनाथ ?

**नील :** ( कपाळावर हात मारून घेऊन ) ओः, गॉड ! प्राणनाथ ? एकदम एकोणिसावं शतक ! काही तरी चांगलं विशेषण वापर ना. ( खिशातून पत्र काढून दाखवीत ) या पत्रात तू किती चांगली चांगली विशेषणं वापरली आहेस. काय, ग, वाक्य लिहिताना तुझ्या मनात नक्की कोणता विचार होता ?

[ पत्रातील एक वाक्य दाखवतो. ]

चंदेरी : ( घाबरून ) कुठलं ? कुठलं वाक्य ? ( इकडे तिकडे पाहते. )

नील : अग, हे काय !

चंदेरी : हे...हे... ओः, गॉड ! किती अरसिक, रे, तू ?

नील : ( आश्चर्यानं ) मी ? मी...अरसिक ?

चंदेरी : ( लाडिकपणे ) तर काय, कित्ती दिवसांनंतर आपण असे समोरासमोर आलो आहोत. मग हा पत्रांचा आडपडदा आपल्यामध्ये कशाला ?

नील : ( पत्र खिशात घालून ) हे मात्र खरं हं.

चंदेरी : आता विचार ना, रे, मला लग्नाचं लवकर !

नील : अशी गुडघ्याला बाशिंग बांधून तयार होऊ नकोस. लाडके चंदा, तू माझ्याशी लग्न—

चंदेरी : ( एकदम उभी राहून ) हो हो हो ! मी लग्न करायला तयार आहे तुमच्याबरोबर ! चला, आता मुहूर्त काढा ! भटजी शोधा, अक्षता वाटा, हार आणा !

[ सनईचे सूर. हळू हळू अंधार होतो. ]

## प्रवेश तिसरा

[ उजेड येतो, तेव्हा नानासाहेब आतून तरातरा येतात. एका खुर्चीवर यमुना अभ्यासाची पुस्तकं घेऊन बसली आहे. समोरच्या खुर्चीवर पाटी, पेन्सिल व अभ्यासाची पुस्तकं आहेत. ]

नानासाहेब : यमने, घरातला केरकचरा काढायचा सोडून इथं इंग्लंडच्या राणीसारखी सिंहासनावर काय बसली आहेस ?

यमुना : ( घाबरून उभी राहून ) नाही, बाईसाहेबांनी अभ्यास घ्यायला सांगितला आहे.

नानासाहेब : अभ्यास ? कुणाचा ?

यमुना : चंदीचा.

नानासाहेब : छान ! घरकाम, धुणी-भांडी, केरकचरा करायचं सोडून ? राणी

चंदाबाई आता एम्. ए., पी. एच् डी. होणार, की बालिस्टर होणार? नाही तरी बाईसाहेब नोकर–माणसांचे फारच लाड करतात. यू मस्ट वेअर दि सँडल इन् युवर लेग ओन्ली.

**यमुना :** म्हंजे काय, नानासाहेब?

**नानासाहेब :** अग, म्हणजे पायातली वहाण पायातच ठेवली पाहिजे. नाही तर नोकरलोक डोक्यावर बसतात. आणि काय, ग, तू तिचा अभ्यास घेणार, ती तू तरी काय अशी प्रोफेसर आईन्स्टीन झाली आहेस?

**यमुना :** मी इंग्रजी दुसरी शिकलीय ना, साहेब, बेळगावला.

**नानासाहेब :** बरं, बरं. मोठी पंडिता रमाबाई झाली! हे बघ, मी तुला आणि चंदीला बरोबरच बजावतो. बाईसाहेब सांगतात, तर लिहा–वाचायला शिका. पण त्यासाठी घरकामातला वेळ काढू नका. पहाटे पाचला उठून आधी कामं करा नि मग हे चोचले करा. हां, सांगून ठेवतो!

[ बाहेर जातात. ]

**यमुना :** ( आत पाहून ) चंदे, ए, चंदे! अग, पुस्तक घेऊन येतेस ना? चंदेरी...

[ आतून : 'आले आले'. चंदेरी एका हातात पुस्तक घेऊन गाणं म्हणत येते. ]

**चंदेरी :** गप, ग. गाणं ऐक आधी. ( गाणं म्हणते. )

**झिम झिम बरसती श्रावणधारा**
**प्रियाविण उदास वाटे रात**

**यमुना :** अग, बाईनी हे बघितलं, तर तुझ्या नि माझ्या दोघींच्याही पाठीचं धिरडं करतील त्या! पुस्तक वाच आधी.

**चंदेरी :** जगन, घर बघ. शरद, घर बघ.
कमल, घर बघ. अभय, घर बघ.

**यमुना :** ( मोठ्यानं हसते. ) चंदे, कमाल झाली हं, बये, तुझी. अग, आता नवऱ्याबरोबर घर करून राह्यचे दिवस आले तुझे आणि अजून तू 'जगन, घर बघ,' असं किती वेळ घोकणार?

**चंदेरी :** ( जांभई देते ) अग, हे मराठी पुरे झालं नाही, म्हणून की काय, आता बाईनी हे ( इंग्रजीचं पुस्तक दाखवीत ) इंग्रजीसुद्धा शिकायला लावलंय.

**यमुना :** ( पुन्हा हसून ) इंग्रजी? चंदे, अग, तुला साधं मराठी यायची मारामार नि –

**चंदेरी :** यमने, यमने, हसू नको हां! हे बघ, मी तीन दिवसांत किती इंग्रजी शिकले – ( वाचते )

धिस इज नितिन
ही इज सिक्स
ही लिव्हज् इन् नासिक

**यमुना :** ( आश्चर्याने ) चंदे! अग, ए बी सी डी कधी केलंस, ग? का त्याच्या आधीच बालिस्टरासारखी फाड फाड इंग्रजी बोलायला लागलीस? बघू, बघू पुस्तक! ( तिच्या हातातलं पुस्तक काढून घेऊन पाहते आणि हसते. चंदेरीच्या पाठीत बुक्का मारून ) हात, मेले! हे तर इंग्रजीच्या खाली मराठीत लिहिलेलं वाचतेस – धिस इज नितिन! खरं, की नाही? कसा चोर पकडला!

**चंदेरी :** मग काय करू, ग? मला अभ्यास करायला लागल्यावर झोपच येते, अन् बाई म्हणतात, 'पंधरा दिवसांत सुशिक्षित हो!'

**यमुना :** का, ग? तुझ्या नवऱ्याला अशिक्षित बायको आवडत नाही का? शिकली नाही, तर बाईला काय मुलं होत नाहीत?

**चंदेरी :** अग, बिनशिकलेल्या बाईलाच जास्त मुलं होतात!

**यमुना :** चंदे, नवऱ्याचं नाव घे, की एक.

**चंदेरी :** ( लाजून ) मला नाही येत, जा.

**यमुना :** तुम्ही एकटं भेटल्यावर काय काय बोलता नि काय काय करता, ग? त्या हिंदी सिनेमातल्यासारखी मिठी मारतो का, ग, तो तुला? आणि मिठी मारल्यावर गाणं पण म्हणतो का, ग?—'मेरे सपनों की रानी...'

**चंदेरी :** चल! फाजीलपणा करू नकोस. बाईसाहेब येतील आत्ता बाहेरून. 'आज नेमून दिलेला अभ्यास नाही केला, तर अंगठे धरायला लावून उभी करीन,' म्हणून धमकी देऊन गेल्यात त्या. ( पान उलटीत ) मला हा धडा आवडतो, बाई.

खारूताई
सर सर झाडावर
झर झर खाली
घरांच्या कौलांवर

कौलांवरून अंगणात, ही पाहा खार.
खारूताई, खारूताई, थांबलात का ?
जेवायला लगेच बसलात का ?
शेंगाचा फराळ आवडला का ?

यमने, तुला नाही का, ग, लग्नाची भीती वाटत ?

**यमुना :** त्यात कसली, ग, भीती ? माझ्या नवऱ्याला मी अगदी मुठीत ठेवणार बघ. त्यालाच वाटू दे माझी भीती.

**यमुना :** तुझ्या त्या नीलसाहेबानं तुझं पहिलं चुंबन घेतलं, तेव्हा तुला काय वाटलं, ग, चंदे ?

**चंदेरी :** ( स्वप्नाळू नजरेने वर पाहात ) काय वाटलं ? अग, काही वाटण्याइतकी मी शुद्धीवरच नव्हते बघ. एका झाडाखाली चांदण्याच्या सावलीत आम्ही आल्यावर त्यानं मला एकदम जवळ ओढली. अगदी घट्ट घट्ट पकडली आणि...

[ तिलोत्तमा बाहेरून येते. या दोघींनी तिला पाहिलेलं नाही. ]

**तिलोत्तमा :** छान चाललाय हं अभ्यास !

[ दोघी एकदम दचकून अभ्यास केल्याचं सोंग करतात. ]

**चंदेरी:** धिस इज नितिन.

**यमुना :** ए बी सी डी ई एफ् – चंदे, तू आधी ही अक्षरं गिरव बरं.

**तिलोत्तमा :** यमुना, तू आत जाऊन काम कर. मी घेते हिचा अभ्यास. ( यमुना आत जाते. तिच्या खुर्चीवर बसून चंदाची वही तपासत नाराजीनं) चंदे, कसं होणार तुझं ? अजून इंग्रजी मूळाक्षरं नाही झाली तुझी. मराठीचं पहिलं पुस्तकच तू दोन वर्षं करते आहेस. हे तुझं अक्षर. हे जगन लिहिलंस, की जगत लिहिलंस, कळत नाही. ध आणि घ यांतला फरक तुला समजत नाही. आणि एल्एल्. एम्. मध्ये फर्स्टक्लास फर्स्ट आलेल्या बुद्धिमान वकिलाशी कसा संसार करणार तू ?

**चंदेरी :** ( ओशाळून ) बाई, लग्न झाल्यावर शिकेन मी. हे दिवसभर कोर्टात जातील, तेव्हा, तुमची शपथ, अभ्यास करीन मी, बाई !

**तिलोत्तमा :** नुसता अभ्यास करीन, असं म्हणून नाही चालणार, चंदा. त्यातून तू 'हा' उद्योग केला आहेस. किती दिवस रिकामी राहणार आहेस

स. ग्रं. ... शाखा.
९८१४८ ६।१२।७९
गा८०११



तू ? पण तुझ्यापेक्षा मला माझ्या सचोटीचा प्रश्न अधिक महत्त्वाचा वाटतो, चंदा.

**चंदेरी :** बाई, आमच्या लग्नाची तुम्हांला कसली आहे अडचण ? एकदा लग्न करून गेल्यावर पुन्हा नाही मी त्रास देणार तुम्हांला.

**तिलोत्तमा :** तुला नाही कळायचं, चंदा. अग, तो किती साधा, सरळ, निष्पाप आहे. माझ्या शब्दावर असीम विश्वास आहे त्याचा. तू अशिक्षित आहेस, खेडवळ आहेस, याचा सुगावा त्याला लागू न देता मी लग्नाच्या वाटाघाटी केल्या. मला आता त्याचा पश्चात्ताप होतो आहे.

**चंदेरी :** ( संशयाने, भीतीने ) म्हणजे ? काय मनात आहे तुमच्या, बाई ?

**तिलोत्तमा :** ( चंदेरीची वही निराशेने खाली टाकून ) आपण दोघींनी त्याला फसवलं, हे सांगून टाकावं त्याला, पत्र लिहून कळवावं, असं वाटतंय मला.

**चंदेरी :** ( घाबरून, एकदम तिच्या पाया पडते. ) नको, नको, बाई ! पाया पडते मी तुमच्या. ते कळल्यावर त्यानं मला पदरात घ्यायचं नाकारलं, तर कुठं जाऊ मी, बाई, कुठं जाऊ ? ह्या जगात मला कोणच उरणार नाही, हो. एवढं लग्न होऊ दे. मग मी जिवाचं रान करून त्याचा नि आमच्या बाळाचा संसार सुखी करीन.

**तिलोत्तमा :** ( तिला हातानं धरून जवळ घेत ) बेटा चंदा, पण या सगळ्यांचा मला किती मनस्ताप होतो, मला किती वेदना सहन कराव्या लागतात, याची कल्पना नाही तुला, ग !

**चंदेरी :** ( कपाळावर हात मारून घेत ) माझ्या मेलीचा जन्मच तुम्हांला त्रास द्यायला झाला आहे, बाई. हे पोटातलं बाळ नसतं, तर मी तुमच्या रस्त्यातून कधीच बाजूला झाले असते.

**तिलोत्तमा :** नको, नको ! चंदा, इतकं अखेरच्या टोकाला जायचं काही कारण नाही. मी आजपर्यंत खूप सहन केलं. आणखी आठ दहा दिवस सहन करीन. तू चिंता करू नकोस, चंदा ! पण, पोरी, तू शिकली नाहीस, तर तुझी धडगत नाही, ग !

**चंदेरी :** बाई, रामाची बायको कोण होती ?

**तिलोत्तमा :** ( आश्चर्याने ) कुठल्या ? रामायणातल्या का ? अग, इतका वेळ तुला रामायण सांगितलं, तरी रामाची बायको कोण म्हणून विचारतेस ? सीता.

**चंदेरी :** हां बघा, सीता. तिनं चौदा वर्षं नवऱ्यासाठी वनवास काढला आणि सरतेशेवटी तिनं नवऱ्यासाठी स्वतःला जाळून घेतलं, की नाही, बाई ?

**तिलोत्तमा :** होय, ग. पण आत्ता इथं काय संबंध आला त्याचा ?

**चंदेरी :** बाई, सीता किती शिकली होती? झाली होती का बी. ए., एम्. ए? ( तिलोत्तमा मानेनंच ' नाही ' म्हणते. ) आणि सांगा. आजच्या ग्रॅज्युएट बायका नवऱ्यासाठी चौदा वर्षं वनवास काढतील का? अहो, नवऱ्याला जेवायला यायला चौदा मिनिटं वेळ झाला, तर आपण चट्टामट्टा करून नवऱ्याचं जेवण झाकून ठेवतील आजच्या बायका!

**तिलोत्तमा :** चंदा, सीतेचं उदाहरण तू देऊ नकोस. सीता बी. ए. नव्हती, राम एम्. बी बी. एस्. नव्हता आणि रावण एस्. एस्. सी. झाला नव्हता. तो काळ वेगळा होता. आज नवऱ्याच्या बरोबरीने जगायचं, तर बायकोलाही जवळपास नवऱ्याएवढी कुवत हवी. तुझा नवरा जेट विमानाच्या वेगानं जाणारा, आणि तू, तू अजून बैलगाडीही हाकू शकत नाहीस. बरं, हे बघ, वर माझ्या खोलीत चल. माझंही काम मला करता येईल आणि तुझ्या अभ्यासावरही मला लक्ष ठेवता येईल.

[ चंदेरी पुस्तकं गोळा करू लागते. मधूनच वही काढून वाचते. ]

**चंदेरी :** थँक यू, बाई.

[ चंदेरी आत जाते. त्याच वेळी गुरुनाथ सामंत, वय ५८ येतात. ते जुन्या पद्धतीचे, मध्यमवर्गीय आहेत. काहीशा तिरसट, संशयी नजरेनं ते आजूबाजूला पाहतात. ]

**तिलोत्तमा :** कोण हवंय आपल्याला? आपण–

**गुरुनाथ :** नील सामंत यांना आपण ओळखता?

**तिलोत्तमा :** हो. आपण त्यांचे...

**गुरुनाथ :** मी त्याचा काका.

**तिलोत्तमा :** नमस्कार. आपण बसा ना.

**गुरुनाथ :** मी विश्रांती घेण्यासाठी आलो नाही. जाब विचारण्यासाठी आलो आहे. सरदार पुरंदरे यांच्या पत्नी आपणच का?

**तिलोत्तमा :** हो. आपण परगावहून आला आहात. घरातल्या स्वागताचा स्वीकार केल्यानंतरसुद्धा आपण काय हवं, ते विचारू शकता.

**गुरुनाथ :** श्रीमंतांच्या या जंजाळाला माझा पुतण्या नील फसला असेल; पण मी फसणारा नाही.

**तिलोत्तमा :** आपल्याला चहा, फराळाचं मागवते हं.

**गुरुनाथ :** ( तिरसटपणे ) नको. काही गरज नाही त्याची. आधी गोडधोड

खायला घालून मिंधं करायचं आणि मग तितकंच गोड बोलून भुरळ पाडायची, हे श्रीमंतांचे डावपेच माहीत आहेत मला. मी फक्त मुद्द्याचं बोलायला आलो आहे.

**तिलोत्तमा :** जशी आपली मर्जी. काय विचारायचं होतं आपल्याला ?

**गुरुनाथ :** चंदेरी या असामीला आपण ओळखता ?

**तिलोत्तमा :** अर्थातच. आत आहे ना ती. बोलावू का ?

**गुरुनाथ :** तूर्त नको. गरज पडली, तर सांगेन. आधी माझ्या प्रश्नांची सरळ उत्तरं मिळाली पाहिजेत मला.

**तिलोत्तमा :** ( करडेपणानं ) त्यासाठी आधी प्रश्न सरळ असले पाहिजेत, सरळ मनानं विचारले गेले पाहिजेत.

**गुरुनाथ :** ( खोचकपणे ) अस्सं ! ठीक. तुमच्या चंदेरीनं आमच्या नीलला गळ टाकून पकडलं, असं...

**तिलोत्तमा :** यात काही फसवणुकीचा प्रकार झाला, असं आपण सुचवता, ते सर्वथैव खोटं आहे. दोघांनी एकमेकांना पाहून, विचारून, बोलून चालून पसंत केलं आहे.

**गुरुनाथ :** अस्सं ! फसवणूक नाही म्हणता, जहागीरदारीणबाई, तर मला सांगा, हुंडा किती ठरला ? आपल्यासारख्या लक्षाधीशांनी इतका शिकलासवरलेला, सुंदर मुलगा निवडला, तो काही अगदीच फुकटाफाकटी नसेल.

**तिलोत्तमा :** हुंड्याचा प्रश्नच निघाला नाही. हा प्रेमविवाह आहे.

**गुरुनाथ :** बरोबर ! प्रेम हाच हुंडा ! तुमच्या मुलीला मोफत नवरा मिळाला. तुम्हांला सवलतीच्या दरात जावई मिळाला !

**तिलोत्तमा :** चंदेरी माझी मुलगी नाही.

**गुरुनाथ :** ( आश्चर्यानं ) काय ? चंदेरी...चंदेरी तुमची मुलगी नाही ?

**तिलोत्तमा :** नाही ! आम्हांला मूलबाळ नाही. चंदेरी आमच्याकडे घरकाम करते, पण घरच्यासारखीच आहे.

**गुरुनाथ :** ( आवाज चढवून ) काय ? म्हणजे चंदेरी ही तुमच्या घरची मोलकरीण आहे ? आणि एल्एल्. एम्.मध्ये फर्स्ट क्लास फर्स्ट आलेल्या माझ्या घरंदाज पुतण्याचं लग्न श्रीमंतांच्या मोलकरणीबरोबर ?

**तिलोत्तमा :** (समजावण्याच्या सुरात ) अहो, पण...काकासाहेब...

**बापूसाहेब :** ( प्रवेश करून ) कोण आलं आहे ?

**तिलोत्तमा :** आपल्या चंदेरीचं ज्यांच्याबरोबर लग्न ठरलं आहे, त्या नील सामंतांचे हे काका. ( गुरुनाथला ) हे जहागीरदारसाहेब.

बापूसाहेब : नमस्कार. काकासाहेब, आपण आलात, हे बरं झालं. मुला–मुलीनं लग्न जमवलं, तरी मोठ्यांचा आशीर्वाद मिळाला, तर त्यांचं जीवन अधिक सुखी होईल.

गुरुनाथ : तेच सांगायला आलो आहे मी. या लग्नाला आमचे आशीर्वाद नाहीत. एवढंच नव्हे, तर हे लग्न होणार नाही, त्रिवार नाही!

बापूसाहेब : का बरं? मोठ्या मंडळींनीच समजूतदारपणा दाखवायला नको का?

गुरुनाथ : हे बघा, जहागीरदारसाहेब, फुकटचा उपदेश करणं फार सोपं असतं. पण नील चार वर्षांचा होता, तेव्हाच त्याचा बाप–म्हणजे माझा भाऊ वारला. त्यानंतर मी आणि माझ्या बायकोनं नीलला स्वतःच्या मुलासारखा वाढवला. पै न् पैचा हिशोब ठेवला आहे मी. आतापर्यंत अठ्ठावीस हजार रुपये आम्ही त्याच्यावर खर्च केले. हे पैसे निढळाच्या घामानं मिळवले मी! पुरंदरे-ाहेब, लोडाला टेकून जहागिरीची खंडणी नाही घेतली आम्ही!

बापूसाहेब : तुमच्या बोलण्याचा रोख समजला. पण, मिस्टर सामंत, तुम्ही गरिबाच्या पोटी जन्मलात, यात तुमचा मोठेपणा नाही आणि मी जहागीर-दाराच्या घराण्यात जन्माला आलो, हा माझा गुन्हा नव्हे. जन्म देणं परमेश्वराच्या हाती. त्यानं दिलेल्या जन्माचा आपण कसा उपयोग करतो, एवढंच आपल्या हातात असतं—

गुरुनाथ : केवळ तत्त्वज्ञान सांगून पोट भरता आलं असतं, तर मी याहून उच्च प्रवचन दिलं असतं! पण प्रश्न व्यवहाराचा आहे. भाकरीचा प्रश्न कवितेने सुटत नाही.

[ तिलोत्तमा आत जाते व चंदेरीला घेऊन येते. ]

बापूसाहेब : आपलं नक्की काय म्हणणं आहे, ते स्वच्छ शब्दांत सांगा, म्हणजे मला उत्तर देणं शक्य होईल.

गुरुनाथ : मी माझ्या ओढाताणीच्या संसारात नीलसाठी हा न झेपणारा खर्च केला, तो एकाच आशेवर. अशा बावनकशी मुलाला चांगली श्रीमंत मुलगी मिळेल आणि ती खर्च भरून देईल, म्हणूनच. पुरंदरेसाहेब, चाळीस हजारांखाली एक पैसा सुद्धा कमी घेणार नाही मी. जमत नसेल, तर लग्न मोडलं.

बापूसाहेब : पैसा देऊन माणसं विकत घेण्याच्या विरुद्ध आहे मी! नील मिळवता होईल, तुमचं सर्व कर्ज फेडेल. पण त्यानं निवडलेल्या मुलीशीच त्याचं लग्न होऊ दे.

**गुरुनाथ :** त्यानं निवडलेल्या? की त्याच्या गळयात बांधलेल्या? चंदेरी ही मोलकरीण आहे, हे समजलं आहे मला.

**बापूसाहेब :** नाही. ती आम्हांला घरच्यासारखीच आहे. माझ्या बायकोला फार लळा आहे हिचा.

**गुरुनाथ :** ( खोचकपणाने ) अस्सं? मग त्या हौसेसाठी चाळीस हजार काही जास्त नाहीत तुम्हांला.

**बापूसाहेब :** योग्य कारणासाठी एक लाखही जास्त नाहीत आम्हांला. पण एका अश्राप मुलीला पदरात घेण्यासाठी तुम्ही ही लाच मागत असाल, तर एक रुपायाही मिळणार नाही.

**गुरुनाथ :** ठीक. मग माझं अखेरचं उत्तर ऐका—हे लग्न मोडलं. हाडाची काडं करून श्रमणाऱ्याच्या बाजूलाच परमेश्वर राहतो, हे लवकरच कळेल तुम्हांला!

**बापूसाहेब :** मिस्टर सामंत, परमेश्वर संसार मांडणाऱ्याची बाजू घेतो—मोडणाऱ्याची नव्हे!

**गुरुनाथ :** ते दिसेलच आता. ( जाऊ लागतो. )

**बापूसाहेब :** थांबा—तुम्हांला माहीत आहे काय? चंदेरी ही नीलच्या मुलाची आई होणार आहे!

**गुरुनाथ :** ( दचकून ) असं? इथपर्यंत मजल गेली का? सगळा डाव अगदी बरोबर टाकलेला दिसतो श्रीमंतांनी!

**बापूसाहेब :** हा डाव नाही! मी सत्य तेच सांगितलं—मला लपवाछपवी आवडत नाही. तुमच्या अखेरच्या उत्तरावर माझं अखेरचं उत्तर ऐका—कुठल्याही परिस्थितीत हे लग्न होणारच होणार!

**गुरुनाथ :** होईल. तुमच्या मोलकरणीचं लग्न होईल; पण ते माझ्या पुतण्याबरोबर नव्हे, एखाद्या रामा गड्याबरोबर होईल!

[ रागाने निघून जातो. ]

**पडदा**

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ पंधरा दिवसांनंतरची सकाळ. सनईचे सूर. घरात लग्नाची गडबड चालली आहे. पडदा उघडतो, तेव्हा यमुना तोरण बांधत असताना दिसते. काही तोरणे आधीच लावली आहेत. नानासाहेब व वकील येतात. ]

**नानासाहेब :** यमुने, अजून आटोपलं नाही ? तुझं, म्हणजे हार्स आफ्टर द मॅरेज – प्रोसेशन असं आहे.

**यमुना :** म्हणजे ?

**नानासाहेब :** म्हणजे वरातीमागून घोडं. उचल, उचल ते. लग्नाची वेळ होत आली.

[ यमुना तबक घेऊन आत जाते. ]

**नानासाहेब :** ( वकिलांना ) सगळी व्यवस्था अगदी बरोबर आहे, की नाही, वकीलसाहेब ? माझ्या इंग्लंडच्या मुक्कामात एक शिकलो बघा मी. शिस्त म्हणजे शिस्त. पण, वकीलसाहेब, सारं कसं सुरळीत असताना तुमचा चेहरा असा पडलेला का ?

**वकील :** का म्हणून काय विचारता ? अहो, जगात सगळ्या गोष्टी सुरळीत पार पडू लागल्या, की वकिलांचे चेहरे पडायचेच ! वकील आहे, तर जग आहे आणि भानगडी, लफडी, कुलंगडी, खून, बलात्कार आहेत, तरच वकील आहे !

**नानासाहेब :** छान! म्हणजे 'नारायणराव, प्लीज स्पीक ऑस्पिशस,' अशी तुमची गत दिसते.

**वकील :** म्हणजे?

**नानासाहेब :** अहो, 'शुभ बोल, रे, नान्या!'

**वकील :** बाकी, नानासाहेब, तुम्ही प्रत्येक गोष्ट अगदी वेळेवर पार पाडता हं!

**नानासाहेब :** म्हणजे? इंग्लंडला जाऊन आलो, तो उगीच, की काय? अहो, वकीलसाहेब, इंग्लंडमधला कावळासुद्धा अचूक, वेळेवर उडतो हं.

**वकील :** कमाल आहे! म्हणजे इंग्लंडातल्या प्रत्येक कावळ्याच्या गळ्यात एक एक घड्याळ बांधलेलं असतं, की काय?

**नानासाहेब :** अहो, सर्व कावळ्यांना अचूक वेळ कळावी, म्हणून तर पार्लमेंटवर बिग बेन घड्याळाचा प्रचंड मनोरा आहे ना! म्हणून तर प्रत्येक कावळा वक्तशीर ...

**वकील :** आमच्या बारमध्ये असेच एक नेने वकील म्हणून होते. त्यांना आम्ही 'टाईमशीर नेने' म्हणत असू. अहो, माणूस प्रत्येक गोष्ट आधीच ठरवून, बरोबर त्याच वेळेला करायचा. तो एका मुलीच्या प्रेमात पडला. तर त्यानं दुसऱ्या दिवशीच्या डायरीत लिहून ठेवलेलं : उद्या संध्याकाळी उषा काळेला रस्त्यात भेटणे.—५ वाजून १४ मिनिटांनी. मग ५–१६ ला तिच्याकडे पाहून स्मित करणे. ५–१७ ला मनात प्रेम उत्पन्न होणे. सात दिवसांनी ६–१८ ला हातात हात घेणे. ६–२४ ला पहिलं चुंबन.

**नानासाहेब :** छान! अशी शिस्त पाहिजे. मग झालं का लग्न?

**वकील :** झालं ना. नेन्या वकील हनिमूनला गेला, तरी उद्याची डायरी आजच लिहून तयार : रात्री नऊ वाजून आठ मिनिटांनी उषानं लाजत खोलीत येणे. नऊ वाजून अकरा मिनिटांनी तिला सुगंधी फुलांची वेणी देणे. नऊ वाजून चौदा मिनिटं—बायकोनं गोड लाजणे. पंधरा मिनिटं—बायकोला आलिंगन देणे. नऊ–सोळा दिवा मालवणे. नऊ सतरा—

**नानासाहेब :** पुरे, पुरे. आता दिवा मालवल्यानंतर पुढची सगळी घटना मिनिट टु मिनिट सांगू नका.

**वकील :** अहो, खरी गंमत पुढेच आहे!

**नानासाहेब :** दोन मुलांचा बाप आहे मी. दिवा मालवल्यानंतर गंमत असते, हे तुम्ही मला सांगताहात?

**वकील :** तसं नव्हे, नानासाहेब, टाईमशीर नेने वकिलाची पत्नी योग्य वेळी गरोदर राहून प्रसूतही झाली.

**नानासाहेब :** अहो, त्यात आश्चर्याची गोष्ट कसली ?

**वकील :** तसं नव्हे ! अहो, असं म्हणतात, की नेने वकील हॉस्पिटलमध्ये गेले आणि विचारू लागले, ' अहो, मुलगा झाला, की मुलगी ? ' डॉक्टर म्हणाले, ' सॉरी, तुम्हांला गजराचं घड्याळ झालं ! अगदी टाईमशीर चालणारं ! '

**नानासाहेब :** छान ! छान आहे हं तुमचा टाईमशीर नेने ! बरं, वकीलसाहेब, आता लेट अस ईट सम पेजीस्.

**वकील :** ईट पेजीस् ? म्हणजे ?

**नानासाहेब :** ( हसून ) अहो, पानं खाऊ या–विड्याची !

**वकील :** असं होय ? मला वाटलं, पुस्तकाची पानं खायचा विचार आहे, की काय, तुमचा !

[ बापूसाहेब व नील येतात, खुर्च्यांवर बसतात. वकिलांना घेऊन नानासाहेब खिडकीकडे जातात. ]

**बापूसाहेब :** कॉन्ग्रॅच्युलेशन्स्, यंग मॅन ! तुमचं डबल अभिनंदन करायला हवं !

**नील :** दोनदा ? का, बुवा ?

**बापूसाहेब :** अहो, म्हणजे असं बघा, चंदा ही आम्हांला घरच्यासारखी असली, तरी घरकाम करणारी. त्यातच हिचा हा असा प्रकार घडलेला. पण तरीही तुम्ही जबाबदारी झटकून नाही टाकलीत. तुम्ही तुमचं कर्तव्य बजावलंत.

**नील :** पण मी हे लग्न केवळ कर्तव्य म्हणून करीत नाही. चंदेरीला आणि मला एकत्र आणण्याचं खरं कारण भावनात्मक आहे. त्याच कारणामुळं आमचं एकमेकांवर नितांत प्रेम बसलं, वाढलं. ( खिशातून एक पत्र काढून ) चंदेरीनं मला फार सुंदर, स्वप्निल पत्रं लिहिली आहेत.

**बापूसाहेब :** ( आश्चर्यानं ) चंदेरीची पत्रं ? तिनं तुम्हांला लिहिलेली ?

**नानासाहेब :** साहेब, कलेक्टरसाहेब आले आहेत.

**बापूसाहेब :** हो, मला निघायला हवं. ( जातात. )

**वकील :** ( नीलशी हस्तांदोलन करीत ) अभिनदन ! हार्टी कॉन्ग्रॅच्युलेशन्स्.

**नील :** थँक यू.

**वकील :** आणि, नानासाहेब, तुमचंही अभिनंदन !

**नानासाहेब :** अहो, लग्न यांचं होणार आहे, माझं नाही.

**वकील :** तुमचं अभिनंदन एवढ्यासाठीच, की तुम्ही प्रत्यक गोष्ट अगदी वेळेवर पार पाडलीत. अगदी मिनिट टु मिनिट—त्या टाईमशीर नेने वकिलासारखी !

नील : हे कोण नेने ?

वकील : अहो, त्या कोर्टातल्या गमती आहेत. तुम्हांला कोर्ट म्हणजे काय माहीत असणार म्हणा ! (निरखून पाहात) मिस्टर सामंत, तुम्ही काय करता ?

नील : ( खेळकरपणे ) वकीलसाहेब, ओळखा बरं. मी कोण असेन, असं वाटतं तुम्हांला ?

वकील : मला वाटतं, तुम्ही प्रोफेसर नाही तर कवी असाल. पण तुम्हांला कोर्टातल्या गमती सांगायच्या, तर दिवसच्या दिवस पुरणार नाहीत. अहो, मी वकिली सुरू केली, तो पहिला दिवस मला अजून चांगला आठवतो. कोर्टाचा शिरस्तेदार त्याच दिवशी नेमला होता. त्याचा आणि माझा पहिलाच दिवस. काम सुरू करण्यापूर्वी कोर्टानं त्याला कडक शब्दांत सुनावलं—' मी कोर्टात आल्याबरोबर ' सायलेन्स ' म्हणून पुकारा करायचा आणि त्यानंतर कुणालाही एक चकार शब्द बोलू द्यायचं नाही ! ' त्या नवीन शिपायानं तो हुकूम तंतोतंत, अक्षरशः पाळला आणि आमची कंबक्ती केली.

नील : ती कशी काय, बुवा ?

वकील : अहो, मी केस चालवायला उभा राहिलो आणि ' माय लॉर्ड ' असं म्हणतो न म्हणतो, तोच त्या शिरस्तेदारानं हनुमानासारखी उडी मारली आणि माझं तोंड गच्च दाबून तो ओरडला, ' सायलेन्स ! एक शब्द बोलायचा नाही ! ' मी घुसमटून जाऊ लागलो, तेव्हा कोर्टानं त्याला हुकूम केला, ' अरे, वकील आहेत ते—' त्यावर त्यानं मला सोडलं आणि कोर्टाचंच तोंड दाबून धरलं आणि भीमगर्जना केली, ' सायलेन्स ! बोलायचं नाही इथं. कोर्ट आहे ! ' शेवटी चार-सहा लोकांनी त्याला ओढून काढला, तेव्हा कुठं माझी आणि कोर्टाची सुटका झाली ! ( सर्वजण हसतात. )

नानासाहेब : पण, वकीलसाहेब, तुमचा अंदाज चुकला. हे सज्जन आहेत, म्हणून वकील नाहीत, असं वाटलं असेल तुम्हांला. पण आश्चर्याची गोष्ट अशी, की मिस्टर सामंत हे सज्जनही आहेत आणि वकीलही आहेत ! मुंबईला हायकोर्टात प्रॅक्टिस करतात ते.

वकील : अरे, वाः वाः ! अलभ्य योगच म्हणायचा. ( हस्तांदोलन करीत ) मग पुन्हा कॉंग्रॅच्युलेशन्स् ! अहो, ( कार्ड देत ) हे माझं कार्ड ठेवा. माझ्याकडेही देत जा अधून मधून एखादी केस. मी महिन्यातून तीन-चारदा तरी येतो ना हायकोर्टात तुम्हांला आठवतं का—ती धनाप्पा यल्लू विरुद्ध कोंडाप्पा कल्लू केस ? अहो, स्टॅंडवरच्या खुनाची ? मीच चालवली ती. तर खून ही माझी

स्पेशॅलिटी आहे. बरं का—शिवाय अफरातफर, बलात्कार, दरोडा कुठलंही काम काढा. एका पायावर तयारी आहे माझी.

[ तिलोत्तमेचा आवाज : ‘ नानासाहेब... ’ ]

**नानासाहेब :** ( हळू आवाजात ) बाईसाहेब आल्याच.

[ तिलोत्तमा येते. वकील नमस्कार करतात. तीही नमस्कार करते. ]

**तिलोत्तमा :** नानासाहेब, लग्नाची सगळी व्यवस्था झाली ना ?

**नानासाहेब :** होय, बाईसाहेब. भटजी, वाजंत्री, पाहुणे... सगळं अगदी उत्तम. नवरा-नवरी आली, की—

**तिलोत्तमा :** ठीक, तुम्ही खाली मांडवात जा. मी पाठवते त्यांना.

**नानासाहेब :** होय, बाईसाहेब. ( जातात. )

**वकील :** इतके दिवस आपल्याला भेटायला पाहात होतो, पण आपण कामात होता.

**तिलोत्तमा :** आपण माझ्या मैत्रिणीच्या मुलीबद्दल कायद्याचा सल्ला दिलात. आभारी आहे मी. आपली फी—

**वकील :** छेः छेः ! बाईसाहेब, त्याबद्दल कसली आलीय फी ? पण पुढं काय झालं त्या मुलीचं, याची काळजी लागून राहिली होती मला. अहो, तुमचं जन्मातून एखादं काम आमच्याकडे येणार. ते फत्ते करून दाखवावं, एवढीच महत्त्वाकांक्षा.

**तिलोत्तमा :** हं, हं ! ते काम ना ? त्या मुलानं लग्न करायचं कबूल केलं, असं म्हणाली माझी मैत्रीण. त्यामुळं खरं तर तो प्रश्न विशेष कसलीच अडचण निर्माण न होता सुटला.

**वकील :** बाईसाहेब, पण तुमच्या मैत्रिणीला सांगा, ‘ अजून आशा सोडू नका. अहो, लग्न झालं, तरी परमेश्वराच्या कृपेनं उद्या डायव्होर्स होईल, पोटगीचा प्रश्न निर्माण होईल ’ – नाही, निर्माण करूच तो आपण.

**तिलोत्तमा :** मला वाटतं, माझी मैत्रीण एवढी आशावादी नाही. मुलीचा संसार सुखाचा चालावा, इतकीच माफक अपेक्षा आहे तिची.

**वकील :** बाईसाहेब, अशिलानंच हातपाय गाळले, तर वकील काय करणार ? पण जाता जाता एकच सांगतो – अहो, परमेश्वराविरुद्ध केस आली, तरी जिंकून दाखवीन मी !

**तिलोत्तमा :** ( हसून ) पण, वकीलसाहेब, परमेश्वरावर केस घालणार कोण ?

**वकील :** का नाही ? का नाही ? श्रीराम दशरथ अयोध्यापती विरुद्ध रावण लंकाधिपती अशी केस आली, तरी जिंकवून दाखवीन मी !

**तिलोत्तमा :** येईल, येईल, वकीलसाहेब ! आणि त्या केसमध्ये तुम्ही रावणाच्या बाजूनं निकाल सुद्धा लावून दाखवाल ! पण आधी मांडवात लग्न आहे, तिकडे लक्ष द्यायला हवं ना ?

**वकील :** बरोबर आहे. आधी लग्न कोंडाण्याचं—म्हणजे चंदेरीचं. पण बाई-साहेब, यावेळी माझा उपयोग झाला नाही, तरी पुढच्या वेळी तरी ही माझी एल्‌एल्‌.बी.ची डिग्री आपल्या कारणी पडावी, हीच इच्छा आणि बाई-साहेब, ते खुनाविनाचं काही जमत असेल, तर बघा.

**तिलोत्तमा :** चंदेरी, चंदा, झालं का तुझं ? ( आत जाते. )

**नानासाहेब :** ( प्रवेश करून ) अहो नवरदेव कुठं आहेत ? ( नील मुंडावळ्या बांधून येतो. ) अहो, जावईबापू , आता पंक्तीनंतर नाव घ्यावं लागेल. उखाणे वगैरे येतात ना ?

**नील :** ( हसून ) अहो...(वकिलाकडे बोट दाखवून) यांना माहीत आहे ना ! वकील लोक कोर्टात जातात, ते काय पक्षकारांची साग्रसंगीत नावं घ्यायला ? तिथं एकाच प्रकारची नावं घेतात—( कोर्टातला शिपाई पत्रकारांची नावं पुकारतो, तशा आवाजात ) गुंडाप्पा दुंडाप्पा पारपिल्लेवार हजऽऽर ?

[ बापूसाहेब प्रवेश करतात. ]

**बापूसाहेब :** हजर. ( तिलोत्तमा येते. ) आणि ( तिच्याकडे बोट दाखवून ) आणि आरोपीही हजर.

[ नील, वकील आणि नानासाहेब उजवीकडच्या खोलीत जातात. ]

**तिलोत्तमा :** ( बावरून ) मी काय, बाई, गुन्हा केला ?

**बापूसाहेब :** ह्या कोर्टाची पद्धत वेगळी आहे. आधी शिक्षा, मग आरोप. हा घ्या तुमच्या शिक्षेचा हुकूम ! ( विमानाची दोन तिकिटं देतात. )

**तिलोत्तमा :** काय आहे हे ?

**बापूसाहेब :** काश्मीरची दोन तिकिटं. आणि फक्त दोघांचीच. इथून मुंबई, मुंबईहून श्रीनगर—पुढं तुमचे बंधूराज ठरवतील, तो कार्यक्रम. एवढं भूमि-पूजन झालं, की कारखान्याला महिनाभर सुट्टी.

**तिलोत्तमा :** ( आनंदानं ) अय्या ! ही काय शिक्षा झाली ? हे तर पारितोषिकच !

**बापूसाहेब :** आणि ते कशाबद्दल, हे नाही विचारलं ?

**तिलोत्तमा :** कशाबद्दल ?

**बापूसाहेब :** मघाशी कपडे बदलताना मला माझ्या खिशात एक पत्र सापडलं.

**तिलोत्तमा :** ( घाबरून ) पत्र ?

**बापूसाहेब :** हो, पत्र. पाठवणाऱ्याचं नाव होतं, गुरुनाथ सामंत.

**तिलोत्तमा :** मीच ठेवलं होतं ते पत्र आपल्या खिशात.

**बापूसाहेब :** पण फोडून वाचायचं तरी, की नाही ?

**तिलोत्तमा :** लग्नात त्यांनी ऐन वेळी मोडता घालायला नको, म्हणून मी फोडलं नाही. काय होतं त्यात ?

**बापूसाहेब :** ( पत्र देत ) वाचा ना तुम्ही स्वतःच.

[ तिलोत्तमा पत्र वाचते. गुरुनाथचा आवाज : ]

' बापूसाहेब,

आपण पाठवलेलं नीलच्या लग्नाचं निमंत्रण मिळालं आणि त्याबरोबर पाठवलेला चाळीस हजार रुपयांचा चेकही मिळाला. तुमचे आभार कोणत्या शब्दांत मानू ? तुम्ही माझा मान राखलात आणि आपला शब्दही खरा केलात. नीलनं हेच निमंत्रण दिलं असतं, तर मी आनंदानं आलो असतो. वधूवरांना माझे शुभाशीर्वाद सांगा. '

[ नानासाहेब, नील आणि वकील येतात. ]

**तिलोत्तमा :** नानासाहेब, नवरा-नवरी थोड्या वेळानं गावातल्या देवदर्शनाला जातील आणि मग स्टेशनवर. त्यांच्या वाहनाची व्यवस्था केली आहे ना ?

**नानासाहेब :** होय, बाईसाहेब. राज्य–प्रतिनिधी चारही पायांवर तयार आहे.

**बापूसाहेब :** राज्य–प्रतिनिधी ?

**वकील :** हा कोण चार पायांचा राज्य–प्रतिनिधी ?

**नानासाहेब :** सांगतो. माझं खुद्द इंग्लंडचं इंग्रजी कोणाला कळत नाही, म्हणून संस्कृतमध्ये बोलत होतो. तेही कळत नाही. कळत नाही, म्हणून आता शुद्ध मराठीत सांगतो. ॲम्बॅसेडर गाडी तयार आहे.

**वकील :** सापडला ! सापडला ! खुनी सापडला !

**नानासाहेब :** मी कोणाचा खून केला, बुवा ?

**वकील :** एक नाही, दोन खून केले तुम्ही ! डबल मर्डर ! अहो, इंग्रजी भाषेचा आणि मराठी भाषेचा.

**नानासाहेब :** हे मात्र खरं. प्रत्यक्ष घोड्याच्याच तोंडून ऐकलं.

**बापूसाहेब :** नाना, गाई, म्हशी झाल्या... आता घोडा कोठून आला ?

**नानासाहेब :** ( वकिलाकडे बोट दाखवून ) अहो, राईट फ्रॉम द हॉर्सेस् माउथ !

**वकील :** अहो, आरोपी ! नवरा-नवरीला स्टेशनवर पोहोचवल्यानंतर त्या चार पायांच्या राज्यप्रतिनिधीतून मला घरी पोचवा.

**नानासाहेब :** अहो, वकीलसाहेब, तुम्हांला पोहोचवायला कोणालाही आनंदच वाटेल.

[ सर्वजण हसतात. नवरीच्या वेषात चंदेरी—यमुना व आक्कासाहेबांसह येते. सर्वजण जातात. फक्त बापूसाहेब थांबतात. ]

**तिलोत्तमा :** ( प्रवेशून ) अहो, थांबलात का ? कसला विचार करीत आहात ?

**बापूसाहेब :** तिलोत्तमा, मी विचार करतोय, तो ह्याचा, की आपली चंदेरी अशिक्षित, निरक्षर आहे, ह्याची नीलला कल्पना आहे का ?

**तिलोत्तमा :** का ? अशी शंका का आली मनात ?

**बापूसाहेब :** मघाशी नील म्हणत होते, आपल्या चंदेरीनं त्यांना चांगली सुंदर, सुंदर पत्रं लिहिली आहेत. पण हे कसं शक्य आहे ? काही तरी घोटाळा दिसतोय.

**तिलोत्तमा :** पण ह्याची चर्चा करण्याची ही वेळ आहे का ? खाली मांडवात मंडळी वाट पाहात आहेत.

**बापूसाहेब :** म्हणून म्हणतो, हे लग्न करण्यात आपण नीलवर अन्याय तर करीत नाही ना ?

**तिलोत्तमा :** न्याय ! अन्याय ! नियती कधी कधी आपल्यासमोर असे प्रश्न टाकते, की न्याय कोणता आणि अन्याय कोणता, हे आपलं आपल्यालाच समजत नाही. मी तुम्हांला वचन देते, हे मंगलकार्य सुरळीत पार पडू दे. तुमच्या सर्व प्रश्नांची मी उत्तरं देईन.

**आक्कासाहेब :** ( प्रवेशून ) अरे, बापू—तिलोत्तमा...

**बापूसाहेब :** आलोच आम्ही. चला.

[ सर्वजण जातात. काळोख. ]

## प्रवेश दुसरा

[ पहिल्या प्रवेशानंतर सुमारे तासानंतर बापूसाहेब व नील येतात. नील

मुंडावळ्या काढून ठेवतो. ]

बापूसाहेब : चला, आता कुठं आपल्याला जरा निवांतपणा मिळाला. लग्नाच्या त्या गर्दीत तुम्ही अगदी घुसमटून गेला होता. म्हणून तुम्हांला वर आणलं मी. पण, सामंत, या लग्नाला तुमचे काका आले असते, तर बरं झालं असतं.

नील : हो, ना. पण हे लग्न त्यांना फारसं पसंत नव्हतं. मी दौऱ्यावर असताना चंदाचं एक पत्र त्यांच्या हाती पडलं. तेवढ्या आधारावर ते इथं आले होते. मी हुंडा घ्यावा, म्हणून हट्टच धरून बसले होते ते. काकांनी माझ्यासाठी फार कष्ट घेतले. गरिबीचा संसार असतानाही त्यांनी पैसा खर्च केला. पण मी आता मिळवता झालो आहे. त्यांचा सगळा पैसा परत करणार आहे मी. पण त्यांचा या लग्नाला विरोध होता, म्हणून हे लग्न होणार आहे, असं कळवलंच नाही मी काकांना.

बापूसाहेब : पण, मिस्टर सामंत, तुम्ही पूर्ण चौकशी करूनच हे लग्न केलंत ना?

नील : होय. का ?

बापूसाहेब : नाही, म्हणजे तसं काही नाही. असे संसार सुखाचे होत नाहीत, असं नाही...पण लहानपणी ती मामाकडे होती ना, तेव्हा—

नील : तेव्हा काय झालं ?

बापूसाहेब : अहो, हिचा मामा काय, गांवढळच. त्यानं हिला योग्य वेळी शाळेत घातलं नाही. इथं आल्यावर हिनं शिकायचं मनावर घेतलं नाही. माझ्या बायकोनं हिला शिकवायचा फार प्रयत्न केला; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळं झालं काय, की एवढी गुणी, सुंदर पोर पण अशिक्षित राहिली, निरक्षर राहिली. ( नील चकित होऊन पाहतो. ) तिला निदान लिहायला वाचायला आलं असतं, तर तुमच्यासारख्या सुशिक्षिताचा संसार ती समान पातळीवरून करू शकली असती.

नानासाहेब : ( प्रवेश करून ) साहेब, कलेक्टरसाहेब जायला निघालेत.

बापूसाहेब : ( नीलला ) एक्सक्यूज हं. मी जरा जाऊन येतो.

[ नील अस्वस्थपणे फेऱ्या घालतो. 'ती अशिक्षित राहिली, निरक्षर राहिली' हे शब्द त्याच्या कानांवर वारंवार येतात. चंदेरी चोरपावलानं येते. त्याला मागून मिठी मारते ]

नील : ( तिचे हात बाजूला करून तिरसटपणानं ) चंदा—

**चंदेरी :** सगळ्यांचा डोळा चुकवून आले मी—माझ्या राजाचं तोंड गोड करायला. ( नील अजून फुरंगटूनच आहे. चुंबनासाठी आपले ओठ पुढे करते. )

**नील :** चंदा, मला तुला काही सांगायचं आहे, विचारायचं आहे.

**चंदेरी :** पण त्यासाठी आपल्यापुढं सबंध आयुष्य आहेच ना. आत्ताच कशाला त्याची घाई ?

**नील :** ( भानावर येत ) अं...तसं नाही. पण मी हे प्रेझेंट आणलं आहे तिलोत्तमाबाईंच्यासाठी...( खिशातून मोत्यांचा हार काढीत ) खऱ्या मोत्यांचा नाही, पण छान दिसतो ना ?

**चंदेरी :** ( आनंदानं ) हे छान केलंस हं तू. बाईंनी माझ्यासाठी इतका त्रास घेतला, इतकं सहन केलं—तुला त्याची कल्पनासुद्धा यायची नाही. मग मी देऊ का हार बाईंना ? की आपण दोघांनी मिळून द्यायचा ?

**नील :** ( गंभीरपणानं ) चंदा, मी काही सांगितलं, तर ऐकशील ?

**चंदेरी :** ( आश्चर्यानं ) का ? हा प्रश्नच का पडावा तुला, नील ? तुझ्यासाठी काय वाट्टेल ते करीन मी. आणि ही तर लग्नानंतरची तुझी पहिली आज्ञा सांग सांग. काय करू मी ?

**नील :** ( कागद आणि पेन तिच्याकडे देत ) हे घे आणि बाईसाहेबांना एक पत्र लिही.

**चंदेरी :** ( भेदरून ) पत्र ? पत्र कशाला हवंय ? इथंच तर आहेत त्या—खाली मांडवात.

**नील :** मी सांगतो, म्हणून लिही. ही भेट आपण त्यांना देणार आहोतच. त्याबरोबर तुझं एखादं गोड, सुंदर, कृतज्ञ पत्र त्यांना दिलं, तर तू मुंबईला गेलीस, तरी त्यांना ते पुनः पुन्हा वाचता येईल. ( चंदेरी अजून अविश्वासानं, भेदरून पाहते आहे. ) म्हणून म्हणतो, पत्र लिही. मला किती सुंदर सुंदर पत्रं लिहिली होतीस तू !

**चंदेरी :** ( कागदाजवळ पेन नेत ) पण ती गोष्ट वेगळी होती, ही—

**नील :** ( कठोरपणानं ) चंदा, पत्र लिही.

**चंदेरी :** ( डोळ्यांतलं पाणी आवरीत ) बरं. लिहिते.

[ कष्टाने एक एक अक्षर लिहू लागते. नील खिडकीजवळ जाऊन बाहेर पाहू लागतो. ]

**नील :** तुझ्या भावना तुला मनमोकळेपणानं कागदावर उतरता याव्यात, म्हणून मी मुद्दाम लांब उभा आहे. पत्र पूर्ण झालं, की मला बोलाव.

**चंदेरी :** ( दोन शब्द कसेबसे लिहून प्रयत्न सोडते. रडते. ) नील, नाही... नील, नाही लिहिता येत मला.

**नील :** ( जवळ येऊन तिच्या पाठीवरून हात फिरवीत ) असं काय करतेस, चंदा ? अग असं भावनावश होऊन कसं चालेल ? इतक्या वर्षांच्या सहवासानंतर बाईंना सोडून जाताना तुला फार फार दुःख होणं साहजिक आहे. ( चंदेरीनं कागदावर डोकं ठेवलं आहे, त्यामुळं तिनं काय लिहिलं आहे, हे त्याला दिसत नाही. ) मन आवर आणि आधी पत्र पुरं कर.

**चंदेरी :** ( अतिशय घाबरून वर पाहात ) नाही, हो. मला क्षमा करा, माफ करा. मला लिहिता येत नाही–मी ...मी शिकलेली नाही. ( नील कागद घेतो. तिनं लिहिलेली वेडीवाकडी अक्षरे पाहून त्याची खात्री होते. त्याचा चेहरा एकदम पडतो. ) पण मी शिकेन. मी शिकते आहे हो, साहेब...! ( ड्रॉवरमधली वही व पुस्तक दाखवीत ) हे पाहा. खारूताईचा धडा संपवून मी आता बाहुलीच्या धड्यापर्यंत आले आहे, हो.

**नील :** ( राग दावण्याचा प्रयत्न करीत, उपहासानं ) वा: ! वयाच्या मानानं खूपच प्रगती झाली आहे आणि खरोखरीचं लग्न म्हणजे तुला काय बाहुलीच्या लग्नासारखा खेळ वाटला ?

**चंदेरी :** ( भेदरून ) नाही, हो. मी चुकले. तुमच्याशी लग्न करायला मिळावं, म्हणून खोटं नाटं केलं मी.

**नील :** मग ती पत्रं कुणी लिहिली ?

**चंदेरी :** ती बाईसाहेबांनी लिहिली. मीच त्यांच्या हातापाया पडले, म्हणून मला वाचवण्यासाठी त्यांनी ती माझ्या नावावर लिहिली.

**नील :** बरं, आता असं कर. खाली मांडवात जा आणि बाईसाहेबांना पाठवून दे.

**चंदेरी :** ( खाली मान घालून ) हो. पाठवते. पण, साहेब, त्यांच्यावर रागावू नका हं. माझ्यासाठी.

**नील :** नाही रागावणार, चंदा...जा. तू पाठव बाईसाहेबांना.

**चंदेरी :** बरं. ( जाते. )

[ नील व्यग्र मनानं फेऱ्या घालतो. तिलोत्तमा येते. ]

**तिलोत्तमा :** आपल्याला उशीर तर नाही ना झाला ? गाडी तयार आहे.

**नील :** मी आपल्याला बोलावलं, ते ( मोत्यांचा हार काढीत ) ही लहानशी भेट आम्हां दोघांच्या वतीनं देण्यासाठी.

**तिलोत्तमा :** ( हार घेत ) थँक यू. पण आपण हा त्रास घ्यायला नको होता.

तुमचा संसार नव्यानं सुरू होणार. अशा वेळी तुम्ही हाच पैसा घरासाठी ठेवला असता, तर मला अधिक आनंद झाला असता.

**नील :** आपल्याविषयी कृतज्ञता ठेवणं आम्हांला अधिक मोलाचं वाटतं.

**तिलोत्तमा :** फार सुंदर आहे हा हार. पुन्हा एकदा आभार. आता चंदाचं सारं सामान भरून तयार आहे. जेवण झाल्यावर ( घड्याळाकडे पाहात ) सवडीनं निघा. वेळ आहे अजून. बरं, मी आता जाऊ ? ( जायला निघते. )

**नील :** थांबा. मला आणखी काही बोलायचं आहे. या छोट्याशा भेटीबरोबर चंदानं आपल्याला लिहिलेलं हे पत्र—

**तिलोत्तमा :** ( चमकून ) पत्र ? चंदाचं पत्र ? तिनं—तिनं लिहिलेलं पत्र ?

**नील :** हो. हे घ्या. ( पत्र तिच्या हाती देतो. दोघांनाही सत्य समजून चुकतं. तिलोत्तमा शरमेनं मान खाली घालते. ) आपली मदत नसल्यामुळं फक्त 'प्रिय बाईसाहेब 'यापुढं ती आपल्या मोडक्या अक्षरांत जाऊ शकली नाही.

**तिलोत्तमा :** मला...मला आपली क्षमा मागितली पाहिजे.

**नील :** मग...मला आलेली ती पत्रं—?

**तिलोत्तमा :** होय. मीच ती लिहिली होती.

**नील :** चंदानं त्यातलं काहीच लिहिलं नव्हतं ?

**तिलोत्तमा :** ती पोर काय लिहिणार ? तिला लिहायला येत नाही. आमच्या घरात वाढल्यामुळं तिचं बोलणं–चालणं शुद्ध आहे. एवढंच.

**नील :** त्या पत्रातल्या भावना—

**तिलोत्तमा :** त्याही...माझ्याच होत्या. त्या बिचारीला नुसतं रांगडं, सोपं प्रेम माहीत. नाजूक भावनांची गुंतागुंत तिच्या आवाक्यापलिकडची आहे.

**नील :** पण तुम्ही तरी माझ्यासारख्या परपुरुषाला अशी प्रेमपत्रं का लिहिलीत ?

**तिलोत्तमा :** खरं सांगू का तुम्हांला, नील ? मी त्या पत्रांत इतकी गुंतून जाईन, असं सुरुवातीला मला वाटलंच नव्हतं. एका अजाण मुलीला मदत करावी, या मानवी हेतूनं मी पत्र लिहायला सुरुवात केली.

**नील :** आणि मग ?

**तिलोत्तमा :** आणि मग ती त्यांत इतकी बुडून गेले, की तिला नकळत सुद्धा मी तुम्हांला पत्र लिहू लागले. तुमच्या पत्राची वाट पाहू लागले. तुमच्या पत्रांतलं प्रेमाचं इंद्रधनुष्य माझ्यासाठीच आहे, असं मी मानू लागले. अगदी खरं सांगायचं, तर चंदाचा प्रियकर माझ्या मनानं मीच बळकावून बसले.

**नील :** तसं करण्याचा आपल्याला काही अधिकार होता का ?

**तिलोत्तमा :** ( विषण्णपणानं हसते. ) अधिकार ! नील, ज्या व्यक्तीनं आयुष्यात प्रेम कधी अनुभवलं नाही, जिला मानवी जिव्हाळा कधी मिळाला नाही, जिला कुणाच्याही पुढे हृदय उघडं करायची कधी संधीच मिळाली नाही, ती व्यक्ती अधिकार मिळण्याची वाट पाहात नाही. मी तो अधिकार माझ्याकडे घेतला. प्रेम करण्याचा, प्रेम करून घेण्याचा अधिकार प्रत्येक लहान-मोठ्या व्यक्तीला आहे...ज्याचा त्यानं प्रीतीचा विषय शोधून अधिकार बजावायचा असतो...जो अनुभव मला आयुष्यात कधीही मिळाला नव्हता, तो या पत्रांनी मी घेतला आणि माझं जीवन सफल झालं, मी कृतार्थ झाले, धन्य झाले. नील, अखेर आपल्याजवळ काय राहतं ? जे प्रेम आपण दुसऱ्याला देतो, तेवढंच शेवटी आपल्याजवळ राहतं !

[ बापूसाहेब मागून येतात. चकित होऊन ऐकत राहतात. ].

**नील :** म्हणजे माझ्याजवळ राहील, ते तुमचं प्रेम. जे तुम्ही न मागता दिलंत. पण या प्रेमाचं भवितव्य काय, याचा विचार त्यावेळी आपल्या मनात आला नाही काय ? त्यामुळं दुसऱ्या कोणाच्या जीवनाची पडझड होईल, असं आपल्याला कधी वाटलं नाही का ?

**तिलोत्तमा :** प्रेम हे एक तुफान आहे. तुफान येतं, ते आपल्या दिमाखात, गर्वात येतं. आपल्या झपाट्यामुळं कोणतं झाड पडेल आणि कुठलं झोपडं उडेल, याचा विचार तुफान करीत नाही.

**नील :** तिलोत्तमा, ( या एकेरी संबोधनानं तिलोत्तमा दचकते. ) जगाची नाती काय वाटेल ती असोत, मी लग्न केलं, ते भावनेनं, मनानं...अंतिम अर्थानं तुझ्याशी केलं. तू माझी पत्नी आहेस !

**तिलोत्तमा :** ( चकित होऊन ) नील !

**नील :** मी प्रेमात पडलो, तो जत्रेच्या दिवशी अचानक भेटलेल्या एका खेडूत मुलीच्या नव्हे, तर एका परिपक्व, सुंदर, स्नेहल अशा व्यक्तिमत्त्वाच्या – तुझ्या प्रेमात पडलो मी, तिलोत्तमे ! इथं वय, दर्जा, व्यवसाय ही सारी निरर्थक आहेत. तिलोत्तमा, सत्याला एकदा तरी सामोरी जा. एकदा तरी स्वतःशी म्हण, ' मी माझी नाही, मी नीलची आहे ! ' (तिच्याजवळ जातो.)

**तिलोत्तमा :** नाही, नील. असं बोलणं पाप आहे. असं ऐकणंसुद्धा पाप आहे. मी दुसऱ्याची आहे...अपघातानं, योगायोगानं तुम्ही माझ्या जीवनात आलात. मी तुमची कृतज्ञ आहे—पण कृतज्ञ आहे, एवढंच. त्यापेक्षा

अधिक अपेक्षा करू नका.

नील : तिलोत्तमे...माफ करा, आता आपण पुन्हा व्यवहाराच्या जगात आलो आहोत. मी आपल्याला बाईसाहेबच म्हटलं पाहिजे. बाईसाहेब, आपण चंदेरीचं भलं चिंतलं, तिच्यासाठी एवढे कष्ट घेतलेत, ( चंदेरी हळूच येते. दोघांना पाहून थबकून उभी राहते. ) शेवटी जिद्दीनं तिचं कल्याण केलंत.

तिलोत्तमा : माझ्याकडून होईल, तेवढं मी केलं.

नील : तिची तुम्ही जेवढी चिंता केलीत, तिचा जेवढा विचार केला, त्यातला शतांश तरी तुम्ही माझ्या वाट्याला का दिला नाही ?

तिलोत्तमा : म्हणजे ? मी नाही समजले.

नील : ( छातीशी हात नेऊन ) बाईसाहेब, विचार करू लागलो, की छाती फाटून जाते. तुमच्या मोलकरणीचं भलं व्हावं, म्हणून तुम्ही माझ्यासारख्या सुसंस्कृत, सुशिक्षित, भावनाक्षम, तरुणाच्या गळ्यात एक खेडूत, निरक्षर पोर बांधलीत ? ( चंदेरी कपाळाला हात लावते. ) कधीच न तुटणारी साखळी तुम्ही घेतलीत आणि एक जनावर माझ्या गळ्याला कायमचं जखडून टाकलंत !

[ चंदेरी दुःखानं खाली कोसळते, रडते. नील व तिलोत्तमा यांचं तिच्याकडे लक्ष नाही. ]

तिलोत्तमा : नका, नका! असे घाव घालू नका ! माझ्याच्यानं हे सहन होत नाही. कुणावर नव्हे, एवढं मी चंदेरीवर, तुमच्यावर प्रेम केलं आणि तुमचंच जीवन उजाड करण्याचं पातक माझ्या हातून घडावं, हा दैवदुर्विलास आहे.

[ चंदेरी हुंदका देते. दोघेही दचकून पाहतात. तिच्याजवळ जातात. तिला आधार देऊन उठवतात. ]

तिलोत्तमा : ( चंदेरीला जवळ घेऊन ) काय झालं, चंदा ?

चंदेरी : ( रडून मिठी मारते. ) बाई ! मी स्वतःला वाचवायला गेले आणि तुमचा बळी दिला. माझ्यासाठी तुम्हांला खोटंनाटं करायला लावलं. ह्यांना ते सगळं समजलं. (तिलोत्तमा आणि नील एकमेकांकडे चमकून पाहतात.) आता कुठं जाऊ मी ?

तिलोत्तमा : चंदा, असं काय करतेस ?

[ तिच्या कपाळावरून हात फिरवते. जवळ घेते. ]

**चंदेरी :** ( एकदम मागे सरकून ) आपण मला हात लावलात...आधार दिलात ...पण, साहेब ?

**तिलोत्तमा :** त्यांना साहेब नाही म्हणायचं, चंदा. तुझ्या – त्यांच्यांत कसलंही अंतर नाही.

**चंदेरी :** ( त्याच्यापासून दूर होत ) असं कसं होईल, बाई ? माणूस आणि जनावर यांच्यांत फरक असणारच ! माणसाला प्रेम देतात. जनावरापुढं गवत टाकतात.

**तिलोत्तमा :** चंदा ! तू ते ऐकलंस ? ( चंदेरी मानेनंच होकार देते. )

**चंदेरी :** माझ्यासारखं अशिक्षित जनावर तुमच्याशी कायमचं जखडलं गेलं, हे दैवानं चांगलं नाही केलं. पण झालं–गेलं आता बदलता येत नाही. ( आवेगाने त्याच्या पायांशी पडून ) पण, साहेब, जन्मोजन्मी मी तुमच्याशी जखडून राहू नये, म्हणून मी एक करीन. मी आयुष्यात कधीही वट-सावित्रीची पूजा करणार नाही. म्हणजे ( तिलोत्तमेकडे पाहून ) पुढच्या जन्मी तरी तुम्हांला तुमच्या तोलामोलाची पत्नी मिळेल...

[ तिलोत्तमा हुंदका देते, तोंड झाकून घेते. ]

**तिलोत्तमा :** ( अश्रू दाबीत ) पाहिलंत ना ? ज्यांना प्रेमाची भीक मिळत नाही, त्यांचं जिणं अन्नाची भीक मागणाऱ्यापेक्षाही लाचारीचं असतं. कधी काळी परमेश्वर मला भेटला, तर त्याला एकच विचारीन, असं कोणतं पातक माझ्या हातून घडलं, की माझ्या मोलकरणीनंसुद्धा माझ्यावर दया करावी आणि आपल्या तोंडातला घास मला भरविण्यासाठी पुढं करावा ?

[ तिलोत्तमा आत जाते. ]

**चंदेरी :** मी तुम्हांला फसवलं. खोटेपणानं वागले. मी तुमची अपराधी आहे. आता माझं काय करणार तुम्ही ? मला टाकणार का, हो ?

**नील :** चंदा –

**चंदेरी :** या बाळासाठी तरी मला काही दिवस तुमची बायको म्हणून जगू द्या. मग मी त्याला घेऊन कुठंही जाईन. साहेब, सप्तपदीत नवरा पुढं असतो, बायको मागं असते. हिंदू पत्नी जन्मभर मागेच राहते, प्रत्येक वेळी नवऱ्याला पुढं जाऊ देते. आयुष्यात ती एकदाच नवऱ्याच्या पुढे जाण्याची महत्त्वाकांक्षा बाळगते – मृत्यूच्या वेळी ! आधी आपण जावं, एवढीच तिची मागणी असते. ती जगातली सगळी दुःखं पेलू शकेल, पण

नवरा गेल्याचं दुःख तिला पेलता येत नाही. म्हणून म्हणते, साहेब, तुम्ही कुठंही असलात, तरी मरताना तुमच्या नावाचं कुंकू पुसलं जाणार नाही, तुमच्या नावाचं मंगळसूत्र तुटणार नाही.

**नील :** ( तिच्या तोंडावर हात ठेवून ) अग, मंगळसूत्र घालून अजून तासभर-सुद्धा झाला नाही आणि असं अशुभ का बोलतेस ? ( तिच्या हातावर हात ठेवीत ) मी तुला वचन देतो, चंदा, तू शिकलेली नसलीस, तरी तू सदैव माझीच असशील ! तू आणि मी मनाशी जिद्द बाळगली, तर काय होणार नाही ? भगीरथानं खडतर तपश्चर्येनं गंगा पृथ्वीवर आणली, तू ज्ञानगंगेचे चार थेंब का मिळवू शकणार नाहीस ?

**चंदेरी :** हा आपला मोठेपणा. आपले जन्मभरचे उपकार आहेत. आपल्या पायांवर हात ठेवून शपथ घेते, की मी शिकेन, ज्ञानी होईन, तुमच्या बाळाला तुमच्यापेक्षाही मोठा करीन !

**नील :** वाः ! आता कशी शहाणी झालीस !

**चंदेरी :** न व्हायला काय झालं ? परिसाच्या स्पर्शानं लोखंडसुद्धा सुवर्ण होतं ना ?

**नील :** आता मुंबईला गेल्यावर रोज तीन तास अभ्यास करायचा. मी तुला शिकवीन. मग दर आठ दिवसांनी तिलोत्तमाबाईंना पत्र लिहायचं ?

**चंदेरी :** मी ? बाईंना वाटेल, तुम्हीच माझी पत्रं लिहिता, की काय ?

**नील :** ( हसून ) म्हणजे इतिहासाची उलटी पुनरावृत्ती होईल, म्हणतेस ? छेः, छेः ! तूच त्यांना पत्रं लिहायचीस.

**चंदेरी :** बरं, लिहीन. पहिल्या वर्षी बाळ खूप खूप झोपतं ना ? ते झोपलं, की मी अभ्यास करीन.

**नील :** बालसंगोपनाचा खूप अभ्यास केला आहेस की !

[ बापूसाहेब व तिलोत्तमा येतात. नील व चंदेरी त्यांना नमस्कार करतात. तिलोत्तमा चंदेरीला दागिन्यांचा डबा देते. ]

**नानासाहेब :** ( प्रवेश करून ) साहेब, राज्य-प्रतिनिधी—

**बापूसाहेब :** तयार आहे ना ? चला.

[ नील व चंदेरी नानासाहेबांच्यासह जातात. बापूसाहेब व तिलोत्तमा त्यांना निरोप देतात. ]

पडदा

म. ग्रं. ... ग्रंथालय शाखा.
वा. क्र. 98948 ... 6|12|109
दि. 07|12|09

IRBK-C118148
IRBK-0118148